# आनंद तरंग

अॅड. आनंद रा. देशपांडे



# आनंद तरंग.....

ॲड. आनंद रा. देशपांडे.

- **<u>आनंद तरंग.....</u>**

**ॲड. आनंद रा. देशपांडे.**

९१/अ, मुरारजी पेठ, सुपरमार्केटजवळ,

सोलापूर-४१३ ००१.

दूरध्वनी - ०२१७-२६२१३४९

दूरभाष - ९८२३२९१६४३

ई-मेल - anandvanbhuvan@gmail.com

- **© सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित.**

- **प्रथमावृत्ती :- १३ ऑगस्ट २०२१**
- मुखपृष्ठ व मलपृष्ठ:-

श्री. भास्कर सगर

- आतील चित्रे व प्रकाश चित्रे:-

श्री. पराग घळसासी व सोशल मीडियावरून साभार.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**प्रकाशन : १३ ऑगस्ट २०२१**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

अर्पणपत्रिका

**स्वर्गीय आईस,**

**अंतःकरणपूर्वक……**

# <u>ऋणनिर्देश</u>

**शिवशाहीर श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे**

**श्री मनोहर जोशी (शामराव जोशी)**

**ॲड. रामचंद्र नागेश देशपांडे**

डॉ. वीणा देव

सौ. मृणाल कुलकर्णी

श्री. विवेक घळसासी

श्री. उदयराव जोगळेकर

श्री. दिग्पाल लांजेकर

श्री. श्रीनिवास वीरकर

श्री. राजेंद्र टिपरे

श्री. विद्याधर रेणावीकर

श्री. पराग घळसासी

श्री. भास्कर सगर

# अनुक्रमणिका....


१) मनोगत
२) चंद्र होता साक्षीला
३) मावळत्या दिनकरा
४) पायरव
५) ये जीवन है।
६) मास्तर..गुरुजी...सर
७) असमंजस
८) उसंत
९) चंद्रछाया
१०) इक बंगला बने न्यारा
११) अडगळ
१२) विजिगीषू
१३) तेरी मेरी कहानी है
१४) छडी रे छडी
१५) नवरसपुरा
१६) उगीचच गुंतून पडतो आपण
१७) चाहूल

१८) स्वये सर्वदा, नम्र वाचे वदावे

१९) दिन ढल जाए हाय, रात न जाये।

२०) एक धुंद में जाना है।

२१) येथ कोणाचे काय गेले...?

२२) चुकलिया माये

२३) अचपळ मन माझे

२४) समर्पण

२५) एकच ठिकाण, दोन प्रसंग

२६) तिनकोंका बस, इक आशीयाँ।

२७) कभी खुदपें, कभी हालातपें

२८) याचसाठी केला होता अट्टहास

२९) जाने क्या बात है?

३०) युद्धाय कृत निश्चयः

३१) उगीचंच आपलं सहज

३२) कागजों की कश्ती

३३) सुंदरमठ

३४) अगा रायगडीच्या राया

३५) कारवाँ गुजर गया

३६) भय इथले संपत नाही

३७) स्वप्नांच काही खरं नसतं

३८) फिर वही रात है।

३९) स्पेस

४०) आप यूँ फासलों से गुजरते रहे....

४१) मेरा साया साथ होगा।

४२) करुणाष्टके

४३) सरत्या वर्षाचा हिशोब.

४४) नई सुबह

४५) एकाकी

४६) आहट

४७) तिन्हीसांजा

४८) विनवणी

४९) वो शाम कुछ अजीब थी।

५०) जाने क्या सोचकर?

५१) जुस्तजू

५२) हे पवित्र आत्म्यांनो!

# १. मनोगत.

चार जानेवारीला काही जनातलं, काही मनातलं या माझ्या तिसऱ्या पुस्तकाचे प्रकाशन झाले आणि वाटले की आता विचारांनी पूर्ण मोकळा झालो आहे. काही महिने तरी आता लिहायला काही सुचणार नाही. पण मग हे करोना पर्व सुरु झाले आणि सगळं जागतिक वातावरण ढवळून निघाले. धार्मिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक पातळीवर इतक्या वेगाने घटना घडू लागल्या की त्याचे पडसाद मनावर उमटणे क्रमप्राप्तच होते.

नुसतंच डोळे उघडे ठेवून या सगळ्याकडे बघणे शक्य नव्हते म्हणून मग व्यक्त व्हायला, लिहायला सुरुवात केली. भोवताली घडणाऱ्या घटनांची संख्या एवढी होती की जवळ जवळ रोज एक लेख लिहीत गेलो. त्यातून या सहा महिन्याच्या काळात दोन पुस्तके प्रकाशित झाली.

विवेक आपटे हे माझे जेष्ठ लेखक मित्र गंमतीने म्हणालेसुद्धा, "लेका, तुझी कुंडलिनी जागृत झाली आहे, लिहीत राहा." लिहीत राहीलो खूप डोळसपणाने सगळ्या अनुभवांकडे पहात राहिलो. व्यक्त होताना मात्र माझ्या

माझ्या कुवतीप्रमाणे व्यक्त होत राहिलो. केलेली निरिक्षणे, काढलेली अनुमाने ही सर्वस्वी माझी होती. त्यामुळे ती कदाचित इतरांच्या दृष्टिकोनातून चुकीचीसुध्दा असतील.

संपूर्णपणे अनभिज्ञ असलेले हे समस्यापर्व अजूनही संपलेले नाही. खूप दूरगामी परिणाम सगळ्या जगावर या आपत्तीमुळे घडून आले. अजूनही येत आहेत. घडणाऱ्या घटनांमधलं नाविन्य मात्र आता संपून गेलयं. या सगळ्या काळात माणसं त्यांच्या त्यांच्या व्यक्तिमत्वाप्रमाणे आणि संस्काराप्रमाणेच वागली. करोनाला माणसाची वृत्ती आणि उपजत अहंकार नाही संपवता आला. याही काळात भ्रष्टाचार, लबाडया, आर्थिक घोटाळे, लुबाडणूक होतंच राहिली. राजकीय आणि सामाजिक पातळीवर तर आत्ताइतकी धुळवड कधीच खेळली गेली नाही.

राजकीय, सामाजिक आणि कौटुंबिक पातळीवरही एक गोष्ट स्पष्ट झाली, अपघाताने एकत्र आलेली माणसे कधीच स्वतःच्या स्वार्थापलिकडचा विचार करू शकत नाहीत. एकमेकांना समजून घेऊ शकत नाहीत, एकत्र येऊन दुसऱ्याच्या, पर्यायाने समाजाच्या भल्याचा विचार करु शकत नाहीत. स्वतःच्या स्वार्थाला किंवा अहंकाराला जरा

धक्का लागायचा अवकाश की फणा काढून डसल्याशिवाय तो स्वस्थ बसू शकत नाही. काही सन्माननीय व्यक्ती आणि संस्था यांचे अपवाद सोडले तर माणूस म्हणून आपण वैयक्तिकरित्या, सामाजिकरित्या, जबाबदार राजकारणी म्हणून पूर्णपणे अपयशी ठरलो आहोत.

घरी-दारी, समाजात, रस्त्यावर सगळीकडे तेच चित्र आहे. मीही त्याला अपवाद नाही. त्यामुळे आता या एकसूरी, एककल्ली अनुभवांवर व्यक्त होण्याचा कंटाळा आलाय. काही करू नये शांत बसावं असं वाटतयं. सीमेवर लढणाऱ्या आणि शहीद होणाऱ्या जवानांची, या महामारीत काहीही चूक नसताना जीव गमावलेल्या अश्राप नागरिकांची, उघडयावर पडलेल्या कुटुंबांची, नोकरी गेल्यामुळे सर्वस्व गमावलेल्या अनेक कुटुंबांची आठवणही काढणे आपल्याला अडचणीचे वाटते आहे. इतके आपण दिवाळीच्या सणात गढून गेलो आहोत. वर स्पष्ट लिहील्याप्रमाणे मीही त्यातलाच. त्यामुळे आता काही काळ तरी आत्मचिंतन करीत गप्प राहण्याशिवाय पर्याय दिसत नाही. कोकणातली राजापूरला येणारी गंगा जशी ठराविक काळानंतर लुप्त होते, तशी

माझ्यातली लिखाणाची उर्मी आता लुप्त झाली आहे. ही राजापूरची गंगा आता आटली आहे. कळावे, लोभ असावा.



## २. चंद्र होता साक्षीला

पावनखिंड रिसॉर्टची एक पन्नास जणांची तुकडी सकाळी रायगड उतरून गेली, दुसरी मुंबईच्या क्षितीज ग्रुपची तुकडी दुसऱ्या दिवशी दुपारी यायची होती. जवळ जवळ चोवीस तास मी आता रायगडावर एकटा असणार होतो. दुपारी बाबूरावकडे तुडुंब जेवण करून, सूटवर येऊन छान ताणून दिली. अलीकडे सहा नंबरचा सूट वादळात पडल्यापासून मी तीन नंबरच्या सूटमधे उतरत असे. एक फायदा असा व्हायचा की सकाळी समजा लवकर उठायचा कंटाळा आला तर पूर्वेकडची खिडकी उघडली की पार राजगडापासूनचा प्रदेश दृष्टीस पडत असे. पडल्या पडल्या सूर्योदय पहाता येई. दुपारचा चहा घेतला अन एकटाच समाधीकडे निघालो. शक्यतो रायगडाच्या खेपा पौर्णिमा पाहूनच ठरवलेल्या असत.

त्यामुळे रात्री भरपूर चंद्रप्रकाश असायचा. आठवड्यातले मधले दिवस असल्याने गर्दीही फारशी नव्हती. समाधीचं दर्शन घेऊन शेजारच्या पायऱ्यांवर बसून राहिलो. हळूहळू पाठीमागे सूर्यास्त झाल्यावर, हा असा मोठ्ठा

चंद्राचा गोळा राजगडापाठीमागून वर आला. हळूहळू त्या चांदीच्या प्रकाशानं तो केवढा मोठा परिसर न्हाऊन निघाला. सावकाश परत निघालो, घाई कसलीच नव्हती. एक तर रायगडासारखं आवडीचं ठिकाण, सोबतीला कोणी नाही. निखळ मी एकटा. खूप वर्षांनी अशी संधी चालून आली होती.

बाबूला संध्याकाळची पिठलं भाकरी सांगून ठेवली होती. जेवण उरकलं, थोडा वेळ व्हरांडयात बसलो. बाबू म्हणाला, "शिवाला पाठवू काय सोबतीला? एकटेच आहात". मी म्हणलं, "मला कोण खातयं?" बाबू म्हणाला, "न्हाई, हल्ली उंदीर फार झालेत सूटमधे." मी म्हटलं,"एक काठी देऊन ठेव, अगदीच लागली तर असावी."

सूटमधे येऊन पूर्वेची खिडकी उघडी ठेवून पडून राहिलो. लाईट बंद केले तसे उंदरांचा धुम्माकूळ सुरु झाला. बाथरूमच्या खिडकीतून आत येत होते. कुठं साबण पाड, कुठं पाण्याचा मग पाड असे उद्योग सुरू होते. काठी आपटली की तेव्हढ्यापुरती पांगापांग होई, पुन्हा पाच दहा मिनीटांनी सुरु. कंटाळून थोडा वेळ सूटच्या पायऱ्यांवर येऊन बसलो. समोरचं रोपवेचं स्टेशन, पाठीमागचा

सिंहाच्या आकाराचा डोंगर, डाव्या हाताचा पोटल्याचा डोंगर, मधला खळगा, सगळं पौर्णिमेच्या दूधात नहात होतं. आत येऊन शाल अंगावर घेतली. सूटला कुलुप घातलं अन शेजारच्या खडकावरच्या नंदीच्या चौथऱ्याला टेकून बसलो. मनात आलं, काय नातं असेल या जागेचं अन माझं? वयाच्या एकविसाव्या वर्षापर्यंत इकडे फिरकलो पण नव्हतो आणि आता वर्षातून दोन वेळा येऊन गेल्याशिवाय चैन पडत नाही.

बरोबर नेहमी गोतावळा असतोच. असा एकांत कधीच सापडला नव्हता. मग तोपर्यंतच्या आयुष्याची खाते वही उघडली. सगळ्या नोंदी तपशीलवार तपासल्या, सगळे हिशोब बघितले, जुळलेले, चुकलेले. कधी मनापासून हसू आलं तर कधी डोळ्यांच्या कडा पाणावल्या. सगळ्या नोंदी तपासून, सगळे हिशोब जुळवून एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे जोडलेल्या माणसांशिवाय श्री शिल्लक शून्य होती. बराच वेळ बसून होतो. झुडुपातून वारा शीळ घालत होता. राणीवशाच्या पाठीमागून आणि अष्टप्रधानांच्या वाडयाकडून पानांच्या सळसळण्याचे आवाज कानावर येत होते.

एखादा सारीपाट मांडावा तसा आयुष्याचा सारीपाट मांडून बसलो होतो. दानेही मीच टाकत होतो, घरेही मीच मोजत होतो. हरतही मीच होतो, अन जिंकतही मीच होतो. खेळायलाच काय, बघायलासुध्दा दुसरं कुणी नव्हतं. फक्त डोक्यावर आलेला चंद्र होता साक्षीला ......



# ३. मावळत्या दिनकरा

देवळाशेजारचा टेप चढून मी आणि रवी माथ्यावर पोहोचलो. लांबवरचा समुद्र इथून नजरेच्या टप्प्यात येत होता. उजव्या हाताला नारळी पोफळींच्या दाटीत वसलेलं आटोपशीर हरिहरेश्वर, तेव्हा अजून ते फारसं नावारूपाला आलं नव्हतं. पुजाऱ्यांची, जंगमांची, कोळ्यांची अशी मिश्र वस्तीची पंचवीस तीस घरे होती. समोर समुद्रावर मासेमारी करून परतणाऱ्या नावा, शिडांचे तारवे दिसत होते. मध्यभागी एक मोठी घळ होती. त्यातून पायऱ्या थेट खाली प्रदक्षिणा मार्गापर्यंत गेल्या होत्या. सावकाश पायऱ्या उतरून आम्ही खाली पोहोचलो.

इथे समुद्र खूप खोल आहे. त्यामुळे भरतीच्या वेळी लाटांचा कल्लोळ उसळतो. पाणी पार पायऱ्यांपर्यंत येतं. भरतीच्या वेळी सगळा प्रदक्षिणा मार्ग पाण्याखाली असतो. लाटा खडकांवर धडका देत असतात. खाली उतरलं की विष्णुपद आहे, तिथून देवळापर्यंत प्रदक्षिणा मार्गाचा खडक पाण्यानं तासून निघाला आहे. ओहोटी असल्यामूळे

प्रदक्षिणा घालता आली. सूर्य जसजसा खाली येऊ लागला, तसतशी त्याची आभा मवारली.

हळूहळू आकाशानं रंग बदलायला सुरुवात केली. क्षितिजावरचं आकाश पूर्ण विरागी भगव्या रंगाचं झालं. तो तेजोनिधी लोहगोल हळूहळू पाण्याकडे सरकू लागला, तसं पाणी सोनेरी झालं. त्या गोलाकार बिंबासमोरुन जेव्हा एखादी होडी जातसे, तेव्हा दिसणारं दृश्य फार देखणं दिसे. जवळचा एखादा मोठा कालवं नसलेला खडक बघून मी आणि रवीने बैठक मारली. अनिमिष नेत्रांनी आम्ही तो सूर्यास्त पाहू लागलो.

जगाच्या आदिपासून ते अंतापर्यंत तो रोज असाच उगवणार आणि मावळणार. आत्तापर्यंत किती सूर्योदय आणि सूर्यास्त झाले असतील? पण रोजचं आकाश वेगळं, रोजचे रंग वेगळे, रोजची ढगांची रचना वेगळी. नेमक्या वेळेला उडत जाणाऱ्या त्या पक्षांच्या माळा, त्यांना लागलेली घरटयाची आस, हंबरत गोठयाकडे निघालेल्या गाई, त्यांना फुटलेला पान्हा, वासरांचं ताडताड उडया मारणं. रोजची संध्याकाळ अशीच असते पण आपल्याला हे सारं अनुभवायला जो वेळ द्यावा लागतो तोच आपल्यापाशी असत नाही.

देवळातून सायं आरतीचे सूर, घंटांचा नाद ऐकू येऊ लागला, तसे आम्ही उठलो. नारळी पोफळींच्या झावळ्यांतून अंधार जमिनीवर उतरत होता. काही मिनीटांत हरिहरेश्वर अंधारात गडप झालं. दुसऱ्या दिवशी कोजागिरी होती, रायगड गाठायचा होता तरीही रात्री उशिरापर्यंत आम्ही चंद्राच्या प्रकाशात गप्पा मारत बसलो होतो. मगाशी काळोखात बुडालेलं गाव आता दुधाच्या प्रकाशात न्हाऊन निघालं होतं. एक अवीट गोडीची संध्याकाळ पौर्णिमेच्या दुधात विरघळली होती.



# ४. पायरव

पौषाचा महिना, थंडीचे दिवस. आधीच सूर्य उशीरा उगवायचा, त्यात माझी जागा ही अशी पश्चिमेच्या खोबणीत. रात्री कधीतरी पसरलेल्या धुकटानं सारा आसमंत व्यापून टाकला होता. गडाच्या माथ्यापासून ते मध्यापर्यंत धुक्याची लांबच लांब चादर पसरली होती. मागचं टकमकसुध्दा अस्पष्ट दिसत होतं. ऊजाळ वाढला तसं एकटं दुकटं पाखरू बोलायला लागलं. वाडीतल्या कोंबड्यांनी एक सणसणीत बांग ठेवून दिली. समोरच्या उंबराच्या झाडावर बसून एक खंडया, बराच वेळ किरकिरत होता. एक शेपटीवाला कोतवाल, उगाचंच या करवंदीवरुन त्या तोरणीवर, या रामेठ्यावरून त्या गवतावर उड्या मारत होता.

अलीकडे माझ्याकडची वहिवाट कमी झाल्यापासून आसपास काही फडे निवडुंग माजले होते. नारायण चांगला कासराभर वर चढला, तसा माझ्या आजूबाजूचा उजेड वाढला. धुक्याची चादर विरळ होऊ लागली. मान वेळावून पाहिलं तर टकमकीच्या घळीत नारायणाचे दूत येऊन पोहोचले होते. मधल्या कपारीवरुन उगी एक पाण्याची धार

तुनूमुनू पडत होती. खालच्या खनाळातून ते पाणी चोरदरवाज्याशेजारच्या जंगितून खाली पडायचं, ते मधीच कुठंतरी मुरत होतं.

माझ्या आजूबाजूला झाडोरा बराच होता. पानापानांवरुन दवाचे थेंब खाली टपकायला लागले, तशी सगळ्या घळीत थेंबांची टपटप ऐकू यायला लागली. एक काळा मुठीएवढा पक्षी शीळ घालत, या फांदीवरुन त्या फांदीवर उडत होता, ते ऐकून चार दोन खारीही चुकचुकायला लागल्या. माझ्या आजूबाजूचा परिसर जागा झाला. महादरवाजाच्या आणि श्रीगोंद्याच्या टोकावरून आलेली किरणं घरंगळत घरंगळत माझ्या बाजूच्या झाडीत घुसली. पानगळीला सुरुवात झालीच होती. वाळलेल्या आणि गळलेल्या पानांचा ढीग वाटेवर साचला होता.

एकेकाळची गडावर जायची मुख्य वाट ही! पण अलिकडे ही एक पायवाट बनून राहिली होती. थोडया वेळानं पाचोळा तुडवल्याचा आवाज येऊ लागला. क्षणभर वाटलं वाडीतली पोरं गुरं घेऊन किंवा करवंद गोळा करीत आली असतील, पण या आवाजाची चाहूल वेगळी होती. थोडया वेळानं एक मध्यमवयाचा गृहस्थ हातातली काठी टेकीत

टेकीत माझ्यापाशी आला. अंगात पांढरी शुभ्र बंडी, कमरेला धोतर, पायात गमबूट, पाठीवर नेटकी घेतलेली पाठपिशवी, चौकस नजर, चष्म्यातूनसुद्धा समोरच्याचा ठाव घेणारी.

मला जरा वेगळं वाटलं, येता येता त्यानं बुरुजांच्या दगडावरून मायेनं हात फिरवला, माझ्या पडक्या रुपाकडे आणि शिल्लक कमानींकडे पाहून त्याच्या डोळ्यात एक वेगळीच करुणा भरून आली. पहिल्या कमानीच्या उंबऱ्यापाशी येताच त्यानं खाली बसून गुडघे टेकून, डोकं उंबऱ्यावर टेकवलं. डोळ्यातून गळालेले दोन अश्रूंचे थेंब, जमा झालेल्या मातीवर ठिबकले. त्यानं उजव्या हातानं ती माती कपाळी लावून घेतली आणि मग सावकाश उजवा पाय आत टाकून तो देवडीपाशी आला. पाठीवरची पिशवी त्यानं देवडीत ठेवून दिली. हातातली काठी भिंतीला टेकवून, दोन्ही हात कमरेवर ठेवून, तो अतीव कौतुकानं मला न्याहाळू लागला. त्याच तंद्रीत त्यानं देवडीच्या भिंतीला टेकून बैठक मारली. डोळे मिटून घेतले. त्याक्षणी त्याच्या मनात आणि माझ्या मनात विचारांचं वादळ घुमू लागलं. एक व्यक्ती आणि एक वास्तु. एक सजीव, एक निर्जीव. पण विचारांची जातकुळी एकच.

आजपर्यंत कोण कोण हा उंबरा ओलांडून आत आले असेल? आणि बाहेर गेले असेल? आणि किती वेळा? थोरले राजे, आऊसाहेब, राणीमंडळ, अष्टप्रधान, नेताजी, बाजी, तान्हाजी, येसाजी, गागाभट्ट, धाकले राजे, नारायण शेणवी, हेन्री ऑक्झिंडेन, किती किती नावं घ्यावीत? या सगळ्यांनी प्रत्येक वेळी बाहेर जाताना आणि आत येताना हाच उंबरा ओलांडला.

पुढं मग खूबलढयाकडची वाट सुरु झाली आणि माझ्याकडचा राबता मोडला. बराच वेळ असाच गेला, तो मशीद मोर्चाकडून हाका मारत लंगुटी घातलेला, हातात काठी घेतलेला, अवकीरकरांचा विठ्ठल दिसला, त्याच्या हाकांचा सपाटा सुरुच होता, "अप्पा .. अवो अप्पा .. अप्पा कुटं हाय तुमी?" ती हाक कानावर पडली तशी त्या गृहस्थाची समाधी भंगली. त्यानं उठून नीट कानोसा घेतला आणि साद घातली ... "ऊ ऽ ऽ '..... काय रे विठ्ठला, मी इथं आहे नाणे दरवाजात." आवाजाच्या दिशेनं विठ्ठल देवडीपाशी आला, त्यानं वाकून आप्पांच्या पायाला हात लावून नमस्कार केला. त्यांची पाठपिशवी खांद्यावर घेतली अन् म्हणाला, "तुमी हिकडून याल याचा अंदाजच नाही. मी

कवाधरनं चितदरवाज्यापाशी बसून होतो". बोलत बोलत मला उजवं घालून ते वाटेला लागले. किती दिवसांनी आज मला या वाटेला पायरव ऐकू आला. एकूण एवढं नक्की लक्षात आलं की कुणी थोरल्या राजांच्या वेळचा पवित्र आत्मा, पुन्हा या देशी त्यांच्या खाणाखुणा न्याहाळत हिंडतो आहे. जुन्या आठवणीत हरवतो आहे.



छायाचित्र : नाणे दरवाजा, श्री रायगड. सोशल मिडीयावरुन साभार.

## ५. ये जीवन है |

आयुष्यात काही गाणी ही आपल्या अंतरंगाच्या अगदी जवळ असतात. बालपणी, तारुण्यात, प्रौढपणी ते गाणं अखंड आपली साथ करतं. प्रत्येक वयात ते गाणं आवडण्याचं कारण वेगवेगळं असतं, त्याचा उमजणारा अर्थ वेगवेगळा असतो. असंच एक सर्वांच्या आवडीचं गाणं, 'पिया का घर' मधलं,

‘ये जीवन है, इस जीवनका,
यही है, यही है, यही है रंगरूप,
थोडे गम है, थोडी खुशियाँ,
यही है, यही है, यही है छाँव-धूप..’

अत्यंत साध्या सोप्या शब्दात जीवनाचं सार आनंद बक्षींनी सांगितलं आहे. किशोरचा लागलेला स्वर्गीय स्वर या गाण्याला एक वेगळीच उंची प्रदान करतो. शब्दांच्या वापराबद्दल काय बोलावं? एखादी गोष्ट ठासून सांगण्यासाठी आपण एखाद्या शब्दाची पुनरुक्ती करतो तसं इथं, यही है, यही है, यही है अशी पुनरुक्ती वापरून गीतकाराने हा अर्थ

मनावर ठसवला आहे. पहिल्या अंतऱ्यात तर शब्दांची कमाल आहे.

‘ये न सोचो इसमें अपनी
हार है के जीत है,
उसे अपनालो जो भी
जीवन की रीत है ..
ये जिद छोड़ो, यू ना तोडो
हर पल इक दर्पन है ...’

आयुष्यभर आपण काही तत्व, काही विचार, काही ध्येयं उराशी बाळगून उरापोटी धावत असतो. त्याच्यानुसार गोष्टी घडत गेल्या तर आपण समजतो की आपण आयुष्यात जिंकलो, काही विपरीत घडलं तर आयुष्यात हरल्याची भावना मनात घर करून रहाते. कवी म्हणतो या छोटया छोटया लढाया म्हणजे युध्द नव्हे. यात हार जीत चालायचीच. त्याहीपलीकडे जाऊन तो सांगतो, प्रत्येक लढाई मी जिंकलीच पाहिजे ही जिद्द, हा हट्ट सोडून द्या. असं होत नसतं.

प्रत्येक जिंकलेल्या लढाईच्या उन्मादात आणि हरलेल्या लढाईच्या दुःखात आपण पुढच्या आयुष्यातले

कित्येक सुवर्णक्षण हरवून बसतो. आयुष्यातल्या प्रत्येक क्षणाचं स्वतःचं असं एक वेगळं अस्तित्व आहे, महत्व आहे कारण एकदा का तो क्षण निघून गेला की काही झालं तरी तो परत येत नाही. त्यामुळे प्रत्येक क्षण आपण परिपूर्णपणे जगला पाहिजे. यासाठी कवीने दिलेली उपमा फार मस्त आहे.

तो म्हणतो, प्रत्येक क्षण म्हणजे एक आरसा आहे, तुमच्या हट्टापायी, जिद्दीपायी, तो आरसा तोडू नका, शांतपणे त्यात स्वतःला न्याहाळा, निरखून पहा, तो क्षण जगून घ्या. अशा प्रत्येक क्षणांचे आरसे झाले आणि आपण त्यात स्वतःला निरखून पाहिले तर आयुष्य किती सुंदर होईल? आपल्या चुका, आपले दुराग्रह, आपले हट्ट वेळीच लक्षात येतील, ते पुढच्या क्षणी टाळता येईल.

तरीही नियतीची, प्रारब्धाची, अनिश्चिततेची एक चौकट प्रत्येक क्षणाच्या आरशाला असेलच. त्या चौकटीतच तो क्षण जगावा लागेल. त्यात कधी ऊन तर कधी सावली असेल, कधी चढ तर कधी उतार असेल, कधी सुख तर कधी दुःख असेल. पण हीच तर खरी जीवनाची रीत आहे. याचा स्विकार करा. आणि हा सुंदर क्षणांचा आरसा तोडू

नका. परंतु पुन्हा तो बजावून सांगतो, या सगळ्यांसह एकत्रित आहे ते जीवन आहे आणि त्या जीवनाचं हेच, हेच आणि हेच खरं रुप आहे.

‘ये जीवन है, इस जीवनका,
यही है, यही है, यही है रंगरूप,
थोडे गम है, थोडी खुशियाँ,
यहीं है, यही है, यही है छाँव-धूप.’



## ६. मास्तर ... गुरुजी ..... सर ....

एकोणिसावं शतक ...

"बाळ्या, कसं अक्षर काढतोस रे? खळ्यात कोंबडी फिरल्यासारखं. नीट तीन बोटात पेन्सिल धरून पाटीवर टेकवावी". "रामा, बालकवींची औदुंबर कविता काढ. काय रे, सुताराचा गण्या का नाही आला अजून?"

रात्रीचे दहा वाजून गेलेले. संध्याकाळी कोसळलेल्या पावसानं हवेत जाम गारठा, तशात कदम मास्तरांच्या ओसरीवर शाळेतली पाच दहा पोरं कंदिलाच्या पिवळ्या भगभगीत उजेडात अभ्यास करत बसलेली. मास्तर बंडीतनं अडकित्ता काढून सुपारी कातरत कातरत एकेकावर लक्ष ठिवून होते. गारठयानं पोरं काकडून पेंगुळलेली. मास्तर मात्र एकेकावर वैयक्तिक लक्ष देत, त्यांचा अभ्यास करून घेत होते. पोरं अंथरूण घेऊनच यायची. कसबसं तासभर पोरांनी दम काढला. तासाभरानं मास्तरांनी झोपा म्हणून सांगितलं. पोरांनी पडत्या फळाची आज्ञा घेत शरीरं जमिनीवर लोटून दिली. मध्यरात्री मास्तर येऊन सगळ्या पोरांची विस्कटलेली पांघरूणं नीट करुन गेले.

विसावं शतक ....

शाळेच्या दुसऱ्या मजल्यावर सातवीच्या वर्गात कुलकर्णी गुरुजींचा इतिहासाचा तास सुरु होता. गुरुजी फळ्यावर पानिपतच्या लढाईच्या अपयशाची कारणं लिहून देत होते. मनानं सगळी मुलं, मुली पानिपतावर पोचली होती. इनामदाराचं कार्ट हळूच खाली वाकून डब्यातला बेसनाचा लाडू तोंडात कोंबत असताना गुरुजींचं लक्ष गेलं.

हातातला खडू गलोलीच्या खडयासारखा जाऊन टपकन पोराच्या डोक्यात वाजला, त्यासरशी पोरानं दचकून वर बघितलं. गुरुजी ओरडले, "काय दुष्काळातनं आला आहेस का? तिथं पानिपतावर सैन्य एक महिना उपाशी राहूनसुध्दा लढलं आणि तुला मधली सुट्टी होईपर्यंत दम निघेना?" पोराला काही बोलताच येईना. बेसनाचा लाडू टाळ्याला चिकटला होता. वर्गातल्या पोरांची हसून हसून पुरेवाट झाली.

एकविसावं शतक ....

सकाळी सात वाजल्यापासून आईनं हाका मारायचा सपाटा लावला, तेव्हा अर्णव नऊ वाजता उठला. साडेनऊ वाजता इंग्लिशचा ऑन लाईन तास होता. तोंडसुध्दा न धुता

त्यानं लॅपटॉप उघडला, वायफाय सुरू करून त्यानं सरांना झूम रिक्वेस्ट टाकली. सरांनी जॉईन करून घेतलं तसं त्यानं कॅमेरा बंद केला आणि शांतपणे उठून ब्रशवर पेस्ट घेऊन दात घासत सरांच लेक्चर ऐकायला सुरुवात केली. सर वर्डस्वर्थची कविता शिकवत होते, म्हणजे गाईडमधलं वाचून दाखवत होते. मधूनच ओरडत होते, "अरे, रेडिओ कुणाचा सुरु आहे? अर्पिता, तुझ्या घरातला  टीव्ही बंद कर."

तेव्हढ्यात वडिलांनी अर्णवला बसल्या जागी बोर्नव्हिटाचा मग आणून दिला. शांतपणे घुटके घेत, अर्णव वर्ड स्वर्थ ऐकू लागला. मधूनच आई येऊन खाणाखुणांनी नाश्त्याला काय करू म्हणून विचारून गेली. ऑफिसला निघताना निरोप घ्यायला आलेल्या वडिलांना दिसलं, अर्णव तिथंच गादीवर लुढकला आहे, त्याला छान झोप लागली आहे  आणि लॅपटॉपवर भूगोलाचे स्वामी सर वातावरणातील बदलांचा सजीवांवर होणारा परिणाम घसा खरडून सांगत आहेत.

ऊन, वारा, पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, साथीचे रोग काहीही असो, सदासर्वकाळ आपल्या विद्यार्थ्यांची चिंता वाहणाऱ्या

शिक्षक वर्गास आजच्या शिक्षक दिनानिमित्त विनम्र अभिवादन.



## ७. असमंजस

दोन तीन वर्षांपूर्वीची घटना आहे. मध्यरात्रीच्या सुमारास एका घाटातून उतरत होतो. पावसाळा ऐन भरात होता. धुक्याचे लोटच्या लोट उठत होते. पहावं तिकडं धुकं. गाडी, समोरचा रस्ता, सगळं काही धुक्यात हरवून जायचं. एवढे मोठे गाडीचे प्रखर लाईट, तेपण धुक्यावर आदळून परत यायचे. मधूनच वाऱ्याची फुंकर यायची. तो सगळा धुक्याचा पडदा दूर निघून जायचा.

पुढचं वळण, ओलाकच्च रस्ता, कडेने पडणारे धबधबे, गाडीच्या उजेडात चमकणारं गवत, रानफूलं, सगळं लख्ख दिसायचं. अंधारात हरवलेली वळणावळणाची वाट स्पष्ट दिसायची. पुढच्या क्षणी सगळं धुक्यात गुरफटून जायचं. जाणीव फक्त सोबत असणाऱ्या, गाडी चालवणाऱ्या मित्राची, त्याच्यावर असणाऱ्या विश्वासाची!

आयुष्याचं सध्या असंच झालयं. प्रवास सुरुच आहे. मधूनच निराशेचं गच्च धुकं दाटून येतं, काही म्हणता काही दिसत नाही, काही कळत नाही, पण प्रवास तर थांबवता येतं नाही. चाचपडत, धडपडत चालत रहायचं. मधूनच एखादी

सुखाची झुळूक येते. गैरसमजाचं, अनिश्चिततेचं धुकं पळून जातं, पुढचा मार्ग स्वच्छ दिसतो. आजूबाजूचं चैतन्य जाणवतं. काही काळ का होईना, मन हरखून जातं. पुन्हा एक धुक्याचा लोट. पुन्हा अंदाज, पुन्हा वाटचाल. प्रवास तर थांबत नाही, थांबवता येत नाही. मन इतिहासातून बाहेर येत नाही. शरीर वर्तमानात साथ देत नाही. बुद्धी भविष्याचे अंदाज सांगू शकत नाही. जाणीव फक्त हाताचं बोट धरून चालवणाऱ्या परमेश्वराची, त्याच्यावर असणाऱ्या विश्वासाची!
हिंदीत यालाच असमंजस म्हणतात आणि मराठीत कन्फ्यूजन आणि इंग्लिशमधे गोंधळ ... खरं नां?



# ८. उसंत

रात्री चांगलाच गारठा होता. स्वेटर घालून बसलो होतो तरी पोटात गुरगुरत होतं. बऱ्याच दिवसांनी मांगरला ( महाबळेश्वरजवळ ) मैफिल जमली होती. बरेच दिवस जमू जमू म्हणून आमचा वकिलांचा एक ग्रूप मित्राच्या बंगल्यावर जमला होता. महाभारतापासून शिवकाळापर्यंतच्या अनेक विषयांवर गप्पा झाल्या. अविचल शांततेमुळे रात्री बराच वेळ झोप आली नाही. उजाडायला सुरुवात झाली तशी समोरच्या झोपडयांतून कोंबडयाचं आरवणं कानावर पडलं.

मागच्या डोंगरावर एक हुप्प्या बराच वेळ हुप्प हुप्प करून ओरडत होता. समोरच्या रेलिंगवर दोन तीन बुलबुल टिवटिवाट करत होते. उठायची काहीच घाई नव्हती म्हणून हे सगळे आवाज ऐकत पडून राहिलो. थोड्यावेळाने खिडकीत येऊन बसकण मारली. समोर प्रतापगडापर्यंतचा सगळा परिसर धुक्यात गुरफटला होता. उजव्या हाताच्या महाबळेश्वराच्या डोगरांच्या कोरींवरून उन्हं घरंगळत घरंगळत खालच्या हिरव्या गर्दाव्यात उतरत होती.

गेल्या आठ नऊ महिन्यांपासून धास्तावलेलं मन थोडसं सुस्तावलं होतं. बऱ्याच दिवसांपासून हवी असलेली उसंत आज मिळाली होती. इतक्या दिवसांत एका भयाण सावटाखाली जगणारं जीवन थोडसं मुक्त झालं होतं. काल संध्याकाळी महाबळेश्वरच्या बाजारात फिरताना तर वाटत होतं की लोकांनी कोरोनाला या गर्दीत चेंगरून मारला आहे. चहाचा कप घेऊन खाली व्हरांडयात येऊन बसलो. मनात आलं, मला आज उसंत मिळाली पण या समोरच्या अफाट, असीम निसर्गाला कुठली आली आहे उसंत. त्याचं सृष्टिचक्र असंच वर्षानुवर्ष अखंड फिरत रहाणार आहे. त्याला ज्या दिवशी उसंत घ्यावी वाटेल किंवा तो घेईल त्या दिवशी सगळंच संपलं असेल.



# ९. चंद्रछाया

२००३ साल असावं, मी पहिल्यांदाच दिवेआगरला गेलो होतो. गावात पाऊल ठेवलं अन्  मी अक्षरशः त्या गावाच्या प्रेमात पडलो. झपाटून गेलो. गावाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत दोनच समांतर रस्ते. उजव्या हाताच्या रस्त्याच्या एका बाजूने कौलारू घरे, मागे वाडी, दोन रस्त्यांच्यामधे पुन्हा घरे, वाडी. डाव्या हाताच्या रस्त्यांच्या डाव्या हाताला मागे वाडी, वाडी संपली की समुद्राची पुळण, निम्म्या भागात दाट केवड्याचं बन, निम्म्या भागात सुरूच वन. चांगला प्रशस्त किनारा, खळाळणारा समुद्र. माझ्यासारख्या निसर्गवेडयाला प्रेमात पडायला आणखी काय पाहिजे?

मित्राने तिथल्या एका घरी उतरायची व्यवस्था केली होती. बघताक्षणी ते घर मनात बसलं होतं. टिपीकल कोकणी कौलारू घरं, मागं नारळी पोफळीची बाग, जांभ्या दगडाची बांधीव विहीर आणि विहीरीशेजारी पाटाजवळ दोनच खोल्या. पुढं स्वच्छ सारवलेलं अंगण, अंगणाला जास्वंदीचं कुंपण. मनात म्हटलं पुढच्यावेळी आलो की या

खोलीतच रहायचं. झालं! मग काय दरवेळी रायगड झाला की पुढचा मुक्काम दिवेआगर.

एकदा असाच दुपारच्या वेळेला दिवेआगारात पोहोचलो. तडक बापटकाकांचं घर गाठलं. गरम गरम उकडीचे मोदक, सोलकढी, डाळिंब्याची उसळ अशी तुडुंब पोटपूजा केली आणि त्या मागच्या खोलीत जाऊन छान ताणून दिली. संध्याकाळी केळकर काकूंकडे छान मूगाची खिचडी, कढी, मिरगुंड, खाराची मिरची असा आटोपशीर बेत हाणून, खूप वेळ गप्पा मारत बसलो.

संध्याकाळी त्यांच्या गड्याला सांगून, एक बाज मागच्या सारवलेल्या अंगणात नेऊन ठेवली होती. खोलीकडं जायची वाट ऐन वाडीतून म्हणजे नारळी पोफळीच्या बागेतून होती. काकूंनी गड्याला कंदील घेऊन सोबत दिलं. त्याच्या मागोमाग मी वाडीत शिरलो. त्या विहीरीचा पाट जांभ्या दगडांनी बांधून काढला होता. पाटावरूनच यायची जायची वाट होती. दिवसा देखणी दिसणारी वाडी, आत्ता अंधारात अंगावर येत होती. मनात म्हणलं, बरं झालं हा सोबतीला आला म्हणून. मागे खोलीपाशी जाऊन पहातो तो अंगणात मध्यभागी बाज, एक छानशी गोधडी त्यावर अंथरली होती.

पाण्याचा तांब्या अन हाताशी एक काठी ठेवली होती. हात उशाशी घेऊन आकाशाकडे बघत छान लवंडलो.

माडा पोफळींच्या झावळ्यांनी कोरलेलं निळभोर आकाश चांदण्यांनी लखलखत होतं. छान गार वारं सुटलं तसं त्या झावळ्या, त्या आकाशावर काळ्या रेघांची नक्षी काढू लागल्या. वाहणाऱ्या वाऱ्याबरोबर हलणाऱ्या झावळ्यांची ती नक्षी क्षणाक्षणाला बदलत होती. गावाला चांगला शिवकाळापासूनचा, किंबहुना त्याआधीपासूनचा इतिहास होता.

दहावीस वर्षांपूर्वी, इथं एका बागेत खणताना एका तांब्याच्या पेटीत चांगली दीड किलो सोन्याची मूर्ति दागिन्यांसह सापडली होती अन दिवेआगर एकदम महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावर आलं. दिवसाकाठी शे दोनशे माणसं गणपती पहायला येऊन जात. हळूहळू आगराचं रूपडं बदललं. एक किराणा दुकानसुध्दा ज्या गावात नव्हतं, काही आणायचं म्हटलं तर बोर्लीला जावं लागायचं तिथं, दहा पंधरा लॉज झाले, वीसेक हॉटेल्स झाली. ज्या बीचवर अनेक वेळा आम्ही चार पाचचं माणसं

असू, तिथं संध्याकाळी चार पाचशे माणसांचा धिंगाणा सुरु झाला. भेळवाले आले, नारळवाले आले,

थोडक्यात काय जत्रा भरायला लागली. अन एके दिवशी रखवालदाराचा खून पडून तो गणपती चोरीला गेला. गावाची कळाच गेली. इतक्या वेळेला इथे आलो होतो की राहायचं ठिकाण, बापटांचं जेवण सगळं ठरलेलं असायचं. असा विचारात हरवलो असताना, दणकन आवाज आला म्हणून चमकून पाहिलं तर माडाचा नारळ तुटून खाली वाडीत पडला होता. कबूल करायला हवं, एक क्षण छातीचा ठोका चुकला होता. मध्यरात्र व्हायला आली होती. चंद्राचा प्रकाश जाणवत होता आणि एका क्षणी झावळ्यांच्या काळ्या छायांनी कातरलेल्या त्या नक्षत्रसंपन्न निळ्या आकाशात तो चांदीचा गोळा मध्यभागी आला अन एक आश्चर्य घडलं, आत्तापर्यंत काळ्या काळ्या दिसणाऱ्या त्या झावळ्या रुपेरी दिसायला लागल्या आणि एका क्षणी त्यांची तशीच आभाळ कातरणारी सावली खालच्या जमिनीवर पडली. खालचं लख्ख सारवलेलं अंगण त्यांचा कॅनव्हास झाला आणि मगाशी आकाशात सुरु असलेला सावल्यांचा खेळ खाली अंगणात सुरु झाला. मी एका अंगावर होऊन, तो चंद्रछायांचा

खेळ पाहात होतो. कधी झोप लागली कुणास ठाऊक. भिकूच्या हाकेनं जाग आली. तो पाटावर उभा राहून ओरडत होता,

"दादानू च्या आनलाय, उठा, उन्हं वाडीत आली."



# १०. इक बंगला बने न्यारा

लहानपणापासूनच माणसाला स्वतःच्या अशा स्वतंत्र जागेचं आकर्षण असतं. कारण काहीही असो तो स्वतःची अशी एक खास जागा हुडकत असतो. कधी अभ्यासाच्या निमित्ताने असेल, कधी चिंतनाच्या निमित्ताने असेल, कधी रुसल्यावर, कधी हसल्यावर माणूस आपसूक त्या जागी जाऊन बसतो.

लहानपणी आम्ही रहायचो त्या घराला लागून एक गच्ची होती. त्या गच्चीला खालच्या घरात उजेड पडण्यासाठी तीन सवणी ( झरोके ) होत्या. त्याच्यावर झाकायचे पत्रे कडेला ठेवलेले असत. त्यातले दोन मोठे पत्रे भिंतीला टेकवून मी त्या छोट्या जागेत अभ्यासाला बसत असे. कधी वरच्या पत्र्यावर एक पिंपळाची फांदी आली होती, त्याखाली सतरंजी घालून बसत असे. उन्हाळ्यात एक चादर गच्चीवर चारी बाजूंनी बांधून, झालेल्या आडोशात उन्हाच्या झळा खात अभ्यास करत बसे. त्याकाळी अभ्यासाला अशा अनवट जागा खूप उपयोगी पडायच्या. त्याकाळी निम्म्या सोलापुरातली मुलं भुईकोट किल्ल्यात अभ्यासाला जायची. त्यांच्याही जागा ठरलेल्या असायच्या. त्या जागेवर दुसरं कुणी बसलेलं चालायचं नाही. भांडणं, मारामाऱ्या व्हायच्या.

सात आठ वर्षांपूर्वी मुलीने गॅलरीत अशाच चादरी बांधून स्वतःचे घर तयार केले होते. अभ्यास तिथेच व्हायचा, दुपारची झोप तिथेच. माझी आजी घराच्या एका विशिष्ठ कोपऱ्यात झोपायची. हे असं राखीव जागेचं वेडं माणसाला लहानपणापासूनच असतं. त्या जागेला त्या माणसाच्या आयुष्यातली सुखदुःख न सांगता कळतात. सुखाच्या क्षणी ती त्याला साथ करते. दुःखाच्या क्षणी त्याला कवेत घेते. माणसाची कितीतरी गुपितं, फक्त त्या जागेला माहित असतात.

आपण नेहमी जाणाऱ्या ठिकाणीसुद्धा अशा काही जागा आपण हेरून ठेवलेल्या असतात. रायगडावरल्या एमटीडीसीच्या कँटीन समोरची गॅलरी, सहा नंबर सूटसमोरचा मोठ्ठा खडक. अशा अनेक ठिकाणांशी आपण आठवणीने गुंतलेले असतो. लहानपणापासूनच्या आपल्या अशा खास जागा आठवून पहा, त्यामागच्या आठवणींची आठवणसुद्धा तुम्हाला एक नवा आनंद देऊन जाईल.

हे सगळं आज आठवायचं कारण म्हणजे हा फेसबुकवर आलेला फोटो. कुणा तरी हौशी बापाने आपल्या लाडक्या पिल्लासाठी हे वुडहाऊस बांधून घेतलेलं दिसतयं. माझी खात्री आहे ते पिल्लू घरापेक्षा या त्याच्या स्वतःच्या बंगल्यात जास्त रमत असणार. म्हणून सहज मी ही आठवणीत रमलो आणि गुणगुणलो.

# ११. अडगळ

"अगं हे टाकून देऊ का?"

"राहू दे हो, लागतं कधीतरी..." हा जागतिक आणि सर्वानुभवी कौटुंबिक संवाद आहे.

मराठी भाषा ही मोठी अर्थवाही आहे. अडगळ, गुंता असे शब्द अर्थाला बरोबर घेऊनच येतात. पूर्वी घर मोठी होती, माणसं सुटी होती. त्यामुळे त्या घरातून अडगळीची स्वतंत्र खोली असायची. कारणपरत्वे, सणासुदीला लागणाऱ्या वस्तू, भांडी तिथं ठेवली जायची.

घर लहान झाली तशी ही अडगळीची खोली नाहीशी झाली आणि ही अडगळ, खोली खोलीतून पसरू लागली. माळ्यावर, कॉटखाली, कपाटातून या अडगळीचंच साम्राज्य दिसून येऊ लागलं. घर लहान झाली तशी मनही लहान झाली. तिथंही मग ही अडगळ मनाच्या बाहेर डोकाऊ लागली. जुन्याचा सोस सुटत नाही आणि नव्याची हौस फिटत नाही. भरीत भर म्हणून भावनिक गुंते आणि आसक्ति यामुळे ही अडगळ आणखी वाढत जाते.

चांगल्या वापरातल्या तर सोडून द्या, पण न वापरातल्या तुटक्या वस्तूसुद्धा पटकन आपण कुणाला देत नाही. थोडं मोकळं व्हायला शिकलं पाहिजे. नकोशा वाटणाऱ्या, मनाला त्रास देणाऱ्या आठवणींसोबतच हव्याशा वाटणाऱ्या गोष्टीसुद्धा देऊन टाकता आल्या पाहिजेत. निदान पन्नाशी उलटल्यानंतर जेव्हा वानप्रस्थ आश्रमाला सुरुवात होते तेव्हा तरी थोडं सुटेपण अनुभवता आलं पाहिजे.

प्लास्टिकच्या पिशव्या, जुन्या बॅगा, खोकी, बोचकी, न वापरलेले कपडे, भांडी यांनी घरं ओसंडून वाहाताहेत पण वेळच्या वेळी या गोष्टी फेकून देणं किंवा गरजूंना देणं काही आपल्या हातनं होत नाही कारण मनाची दानत नाही. असूं दे आणि राहू दे या राहू - केतूंनी मनं आणि घरं ग्रासून टाकली आहेत. मनाइतकाच घराचाही उकिरडा करुन टाकलाय आपण. त्यामुळे नवीन विचारांना वाव नाही, नवीन अनुभवांना जागा नाही. दृष्टिसमोर कायम ओंगळ, धुळीनं भरलेली अडगळ आणि त्या पसाऱ्यात बसलेले आपण. अशी ही घरोघरची चित्रं आहेत.

नेहमीचे वापरात असलेले मोजकेच पण स्वच्छ कपडे, गरजेपुरती भांडी, मोकळेपणानं घरात फिरणारं वारं,

भरपूर सूर्यप्रकाश, दातृत्वासाठी उत्सुक असलेल मन, भोवताली माणसांचा, मित्रांचा, नातेवाईकांचा गोतावळा, संस्कार संपन्न पुढची पिढी  हीच पुढच्या काळातली श्रीमंती असणार आहे, पण त्या श्रीमंतीला घरात घेण्यासाठी आधी मनं आणि घरं, स्वच्छ आणि रिकामी केली पाहिजेत.



# १२. विजिगीषू

खूप वेळेला आपण एखाद्या शब्दाचा लौकिकार्थ माहित नसताना, केवळ शब्दार्थ जाणून घेऊन त्याचा वापर करत राहातो. एखादा प्रसंग, एखादी घटना, सभोवतालची परिस्थिती, मग एखाद्या क्षणी त्या शब्दाचा लौकिकार्थ सर्वार्थाने वर्णन करुन जाते.

राजेश खन्नाच्या 'सफर' चित्रपटामधे इंदीवर यांनी लिहिलेलं, कल्याणजी आनंदजी यांनी संगीत दिलेलं मन्नाडेंच्या आवाजातलं माझं एक आवडतं गाणं आहे,

नदिया चले चले रे धारा
चंदा चले चले रे तारा
तुझको चलना होगा
तुझको चलना होगा . ..

यातल्या पहिल्या कडव्यात कवी लिहीतो,

"जीवन कहीं भी ठहरता नहीं है आँधी से तूफाँसे रुकता नही है।"

मुळातच जीवनाबद्दल असलेली आसक्ती आपल्याला कधी थांबू देत नाही.

त्याजोडीला सोबत असलेल्या प्रत्येकाच्या जीवनाचं रहाटगाडगं इतकं वेगानं फिरत असतं की आपणही नकळत आपला वेग वाढवतो.  हे मानवी जीवनातच नाही तर इतर सृष्टीतही घडत असतं. पक्षी, प्राणी, फुलं, पानं, वृक्ष, वेली यांच्यापाशी असलेली जीवनेच्छा खूप चिवट असते. एकवेळ मानव हार मानेल, पण सृष्टीतला इतर कुठलाही घटक कधीच हार मानत नाही. आज बाबा उडायचा कंटाळा आलायं, म्हणून एखादा पक्षी दिवसभर एकाच फांदीवर बसून असल्याचे आपण कधी पाहतो का? वडाचे, पिंपळाचे बीज मोहरीहूनही लहान असते, पण त्यातून निर्माण होणारा वृक्ष, किल्ल्याच्या तटांना, बुरुजांनाही भेगा पाडतो.

ही प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहण्याची, वाढण्याची, मोठं होण्याची इच्छा म्हणजेच विजिगीषू वृत्ती! ही वृत्ती मुलतःच परमेश्वराने साऱ्या प्राणीमात्रांना प्रदान केलेली असते. आपण फक्त त्याचा वापर करायचा असतो. काही सन्माननीय अपवाद वगळता माणसे या शक्तीचा वापर करताना दिसून येत नाहीत. मानव सोडून इतर चराचर सृष्टी मात्र या दैवी देणगीचा वापर करून परिस्थितीशी लढत

राहाते, मोठी होते, टिकून रहाते. हेच या सोबतच्या फोटोत दिसते आहे.



या झाडाची जीवनेच्छा इतकी प्रबळ आहे की त्यापुढे कडेने घातलेली सिमेंटची फरशीही पराभूत झालेली दिसते. आपण मात्र बऱ्याच वेळा या वृत्तीचा विसर पडून निवांत बसून राहातो. तेव्हा कवी म्हणतो,

"तू न चलेगा तो चल देगी राहें
मंजिल को तरसेंगी तेरी निगाहें
तुझको चलना होगा ...
तुझको चलना होगा ......"

## १३.        तेरी मेरी कहानी है

दोन दिवस झाले, हिंदी चित्रपटसृष्टीतले विस्मृतीत गेलेले गीतकार संतोष आनंद यांनी इंडियन आयडॉल या कार्यक्रमाला दिलेली भेट सगळीकडे व्हायरल होती आहे. त्यांचं जीवन, त्यांची प्रतिभा, त्यांना भोगावं लागलेलं दुःख सगळंच कल्पनेच्या पलीकडचं आहे. पण तो आत्ता माझ्या ह्या लिखाणाचा विषय नाही!

मनोजकुमारच्या बहुतांश सिनेमातील गाणी त्यांनी लिहिली. त्यातल्या 'शोर' या सिनेमातील,

'इक प्यार का नगमा है
मौजोंकी रवानी है
जिंदगी और कुछ भी नहीं
तेरी मेरी कहानी है ....' या गाण्यातले मूळ कवितेतले दोन अंतरे त्यांनी म्हणून दाखवले, जे सिनेमात नाहीत. त्यातला एक अंतरा असा होता,

'जो दौर था कभी पहले
वो दौर ना अब आयेगा
इस दिल में तेरे सिवा

कोई और न आयेगा ...'

पुढच्या दोन ओळींनी मी चक्रावून गेलो, अंतर्मुख झालो, त्या ओळी होत्या ...

'घर फूँक दिया हमने
अब राख उठानी है
जिंदगी और कुछ भी नहीं
तेरी मेरी कहानी है ....'

माझ्या डोक्यात पहिला विचार आला क्रांतीकारकांचा, त्यातही सावरकर आणि भगतसिंगांचा. एवढं उत्कट, उदात्त आणि भव्य प्रेम होतं यांचं भारतमातेवर. एका ठिकाणी भगतसिंगानं म्हटलंय,

'इतनी वाकिफ है, मेरी कलम मेरे जज्बात से, कि इश्क लिखना भी चाहूँ तो ..... इन्किलाब .... लिखा जाता है।'

मनोजकुमारने काढलेला 'शहीद' हा अप्रतिम सिनेमा भगतसिंगाचं आयुष्य जनमानसावर कोरणारा होता. त्यातलं त्याचं दिसणं, संवाद, गाणी, शूटींग सगळंच एक जमून आलेलं गणित होतं. संसारी असूनही तपस्व्यासारखं आयुष्य जगलेले सावरकर आणि क्रांतीकार्यालाच आपला संसार मानणारा भगतसिंग हे दोघेही भारतमातेचे थोर सुपुत्र होते.

त्यांच्यासाठी हा संतोष आनंद यांनी म्हणून दाखवलेला अंतरा नेमका लागू पडतो,

'जो दौर था कभी पहले
वो दौर ना अब आयेगा
इस दिल में तेरे सिवा
कोई और न आयेगा
घर फूँक दिया हमने
अब राख उठानी है
जिंदगी और कुछ भी नहीं
तेरी मेरी कहानी है .....'

उमलत्या वयात मनोजकुमारच्या 'शहीद'ने मनावर एक जबरदस्त छाप सोडली होती. फाशी झाल्यावर भेटायला आलेल्या आईची समजूत काढताना भगतसिंग म्हणतो,

'तू न रोना, के तू है भगतसिंग की माँ ...
घोडी चढ़के तो
लाते है दुल्हन सभी,
हँसके हर कोई फाँसी चढ़ेगा नहीं,
हँसके हर कोई फाँसी चढ़ेगा नहीं,

.. घर फूँक दिया हमने,
अब राख उठानी है .....
जिंदगी और कुछ भी नहीं
तेरी मेरी कहानी है ....'



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

# १४. छडी रे छडी

सकाळी मित्राची वाट बघत कॉफी हाऊसमधे बसलो होतो. एफ्.एम.वर गाणं सुरु होतं, ‘छडी रे छडी, कैसे गले मे पड़ी.....’ 'मौसम'मधलं गाणं, गुलजारजींचे शब्द, आरडींचं संगीत, संजीवकुमार, शर्मिला टागोर ... एवढा तपशील माहिती होता. अंतरा सुरू झाला आणि मी अंतर्मुख झालो.

‘लगता है सासों में,
टूटा है काच कोई .....’

आपण नेहमी म्हणताना म्हणून जातो, तो तर माझा श्वास आहे. इतका तो श्वास जीवनासाठी महत्वाचा. शब्द होते, लगता है सांसोमें टूटा है काच कोई ... प्रत्येक श्वास घेताना आणि सोडताना तुटलेल्या काचेची बोचरी वेदना देणारं असं काय घडलं असेल आयुष्यात? प्रत्येक श्वासागणिक जाणवणारी ती खरखर कशामुळे निर्माण झाली असेल? अंतरंगात डोकावून पाहिलं तर काचांचा खच पडल्याचं दृश्य दिसण्याचीच शक्यता जास्त. आयुष्यात आलेली, आयुष्यातून निघून गेलेली माणसं, निघून जातानाही अंतर्मनाचा कब्जा न देता आपल्या खोलीला

कुलूप लावून गेलेली माणसं, आयुष्यभराची टोचणी लावून गेलेल्या घटना, त्यांची बोच. किती म्हणून काचांची यादी करावी? कुणाकुणाची म्हणून नोंद ठेवावी?

'चुभती है सीने में,
धीमीसी आँच कोई.....'

काळजाला लागलेले असे कितीक चटके, अंतर्मनात लागलेले असे कित्येक वणवे? हिरव्यागार डहाळ्यांचा झोडपा घेऊन ही आग कितीही झोडपून काढली तरी कुठेतरी एखादी ठिणगी रहातेच. लांबवर जिथे आपले हात पोहोचू शकत नाहीत तिथे ती ठिणगी धुमसत रहाते, धुराचे फरकाटे उठत रहातात, सगळ्या जगाला ओरडून सांगतात,

'चुभती है सीने में
धीमी सी आँच कोई ....
आँचल् से बांध ली है
आग की लडी ...'

हा तर आयुष्यातला आवडता खेळ. काही गरज नसताना, कधी सकारण तर कधी अकारण फटाक्याच्या माळा शेपटीला बांधल्यागत आगीच्या ज्वाळा आपणहून पदराला बांधून घ्यायच्या आणि आयुष्याची होरपळ करून

घ्यायची. पुन्हा माज एवढा की ते पोळलेले व्रण आयुष्यभर मिरवीत फिरायचे.

क्षणभर असं वाटून गेलं की हे सगळं तर क्रांतीकारकांनीपण केलं, पण ते स्वराज्यासाठी, भारतमातेसाठी. त्यांच्यापुढं आमच्या या मध्यमवर्गीय काचा कवड्यांची काय किंमत?

पण काही झालं तरी वेदना सर्वत्र सारखीच. ज्याची सहनशक्ति मोठी त्याच्या वाटयाला वेदना मोठी. जो तुमच्या माझ्यासारख्या सामान्य आहे त्याला त्याच्या आयुष्याची वेदना आभाळाएवढी मोठीच वाटणार.

मित्र समोर येऊन बसला होता, माझी पहिली संपलेली कॉफी बघून त्याने दुसऱ्या कॉफीची ऑर्डरही दिली होती. गरम गरम कॉफीच्या आलेल्या दुसऱ्या कपाच्या चटक्याने मी भानावर आलो.



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

# १५.	नवरसपूरा



मे महिन्याचा शेवटचा आठवडा. रणरणती दुपार, मी आणि अमोल विजापूरचं काम आटोपून परतत होतो. अचानक त्याला म्हणलं, "तुला नवरसपूरा बघायला आवडेल?" त्याने नाही म्हणायचा प्रश्नच नव्हता. गाडी तिकडे घेतली. पहिल्या मोठ्या कमानीतून पाऊल आत टाकलं आणि दोघेही भान हरपून गेलो. कोणतीही राजवट असो, जीतांची अगर जेत्यांची, ती स्थिर होते तेव्हा ती काही एक बरा वाईट वारसा ठेवून जाते. आदिलशाही सुस्थिर झाली तेव्हा, आज दिसते त्याच्या कमीत कमी दसपट सुंदर बीजापूर ज्याने घडवलं, तो होता या सर्व इमारतींचा निर्माता मलिक संदल. फार हौसेनं त्यानं बीजापूर नटवलं. इब्राहिम रोजाच्या उजव्या हाताला त्याची कबर आहे. विजापूरला आज त्याच्या नावाचं आर्किटेक्चर

कॉलेज आहे. त्यातलीच एक नितांत सुंदर वास्तू म्हणजे नवरसपूरा. पहिला इब्राहिम आदिलशहा कलासक्त होता. संगीत ऐकण्यासाठी त्यानं या वास्तूची निर्मिती करुन घेतली. पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हा इथे आलो होतो, तेव्हा बाबासाहेब पुरंदरे बरोबर होते, त्यांनी जे काही नवरसपूऱ्याचं चित्रं त्या दिवशी डोळ्यासमोर उभं केलं होतं ते तसंच्या तसं डोळ्यासमोर तरळायला लागलं.

त्या प्रचंड मोठ्या कमानीदार वास्तूच्या बाजूला गुलाबांचे ताटवे डोलू लागले. त्या भव्य कमानींवर रेशमी गोंडे अन् मोत्याच्या झालरी लावलेले पडदे हेलावू लागले. जागोजागी शमादानं तेवत होती. कनोजी धूपाचा दरवळ सर्वत्र वातावरणात फिरत होता. वेगवेगळी अत्तरे लावलेले सरदार दरखदार आपापल्या आसनावर येऊन बसत होते. त्यांच्या मनगटावर मोगऱ्याचे गजरे बांधले जात होते. मध्यभागी मोठया कमानीच्या आतल्या छतावर भले मोठे झुंबर लकाकत होते. हातात पेटते काकडे घेतलेले हुजरे जागोजागची झुंबरे, शमादाने प्रज्वलित करीत फिरत होते. जागोजागी हातात नंग्या तलवारी घेतलेले खोजे तांबारल्या डोळ्यांनी इकडे तिकडे पाहात होते.

इतक्यात आला हजरत आल्याच्या ललकाऱ्या झाल्या, सगळी कुजबूज थांबली, सगळे मान खाली घालून उभे राहिले. इब्राहिम आदिलशहा येऊन मुख्य कमानीत त्यांच्यासाठी खास तयार केलेल्या आसनावर बसले. समोरच्या गिर्दीवर सारंगिये, तबलजी आपापली वाद्ये जुळवू लागले. हुजूरांनी इशारा करताच, समोर बसलेल्या आरस्पानी सौंदर्याने जो काही स्वर लावला, क्षणभर आभाळातला द्वितीयेचा चंद्रही थबकल्यासारखा झाला.

पाच सहा बकऱ्या इतस्ततः चरत होत्या. त्यांना घेऊन शेजारची एक बूढी समोरच्या हौदातलं शेवाळभरलं पाणी पाजायला घेऊन आली. मैफिलीच्या रात्री ज्या हौदात अत्तरांच्या घागरी ओतल्या जायच्या, जिथलं कारंज आपला धुंद सुवास घेऊन नक्षत्रांना पोहोचवून यायचं, त्या पाण्यावर आता शेवाळं धरलं होतं. त्यादिवशी ढगांनी खूप आभाळ सजवून टाकलं होतं. दोघांनी खूप फोटो काढले. मन भरून भटकून झाल्यावर परत निघालो, तेव्हा संध्याकाळ होत आली होती. गाडीत बसताना वाटलं अगदी निघताना तरी सारंगीची एखादी आलापी काळजावर एखादा चरा उमटवून जाईल.

## १६. उगीचच गुंतून पडतो आपण

ह्याच्यात अन त्याच्यात ..
सरळ नसतं कुणाचंच आयुष्य,
कायम अनिश्चिततेच्या खुंटीला
टांगलेली सगळ्यांचीच भविष्य
घरचं झालं थोडं म्हणून की काय,
पाय घालतो दुसऱ्याच्या लोच्यात
उगीचच गुंतून पडतो ......

गरज पडली, आपण आठवतो
गरज संपली, मेसेज पाठवतो
भेटू परत कधीतरी
सध्या अडकलोय एका घोळात
उगीचच गुंतून पडतो ...

यश मिळताच म्हणतात
आधी माझं नाव सांग,
अपयशी ठरलो तर
लगेच होते पांगापांग,
बेसावध क्षणी अपकिर्ती

गाठते एकट्यालाच बोळात
उगीचच गुंतून पडतो .....
याला तिकीट मिळालं मग
त्याला का नाही?
तुझ्या घरी लेका,
मिठ मिरचीचा पत्ता नाही,
सत्ता मिळताच सगळे
पाय घालतात पायात
उगीचच गुंतून पडतो ....
मैत्री, आपुलकी, प्रेम, सोबत
सगळा वरवरचा दिखावा,
अडचणीचं नाव काढताच,
सगळे पाठ फिरवतात भावा,
समस्यांचे डोंगर
ज्याच्या त्याच्या ताटात ....
उगीचच गुंतून पडतो...
दिवस उगवतो, रात्र संपते
एकेका क्षणाने आयुष्य
उतरणीला लागते,

आठवणींची वाळू निसटून जाता
काहीच उरत नाही हातात
उगीचच गुंतून पडतो ....
किती गाड्या, किती बंगले
उंची अत्तरे, कपडे चांगले चांगले,
कितीही देखणं असलं तरी
कलेवर गुंडाळून ठेवतात
साध्या पंचात ...
उगीचच गुंतून पडतो ....
रोज कोण कुणाला
किती वेळ देणार?
रोज कोण कुणाची
कशाला आठवण काढणार?
ज्याच्या त्याच्या प्रश्नांचे साप,
ज्याच्या त्याच्या पायात ..
उगीचच गुंतून पडतो ....
कशाला दुसऱ्यासाठी,
मर मर मरावं,
अपेक्षांच ओझं बाळगत

जन्मभर फिरावं
वळूनसुद्धा बघणार नाहीत कोणी,
जर का अडकलो नशिबाच्या फेऱ्यात,
उगीचच गुंतून पडतो ...

खर सांगू,आपल्याला आवडेल तस
मस्त जगावं
शक्य असेल तर जरूर
दुसऱ्याच्या उपयोगी पडावं,
किती, कुणासाठी, काय केलं
सारं विसरून जावं
आपल्या आयुष्याचं गाणं
आपणच मस्तीत गावं
मिळालीच कुणाची साथ तर
तोही एक सोहळा
नाहीतर आपला मोक्ष
पांडुरंगाच्या पायात ......

# १७. चाहूल

परवा दुपारी कोर्टातून परत येत होतो, नानांच्या ( पुणेकर-कामठे ) रसपानगृहासमोर गर्दी वाढलेली दिसली. मनात म्हटलं, आला उन्हाळा! सोलापूरात उन्हाळ्याची चाहूल देण्याऱ्या अनेक गोष्टी आहेत. सकाळी बागेत फिरणाऱ्यांची संख्या वाढलेली दिसते. संध्याकाळी पोरं बाळं घेऊन बागेत डबे घेऊन आलेली कुटुंब दिसली की ओळखावं आला उन्हाळा.

हळूहळू दिवस मोठा होतो. पहाटे पाच साडेपाचलाच फटफटायला लागतं. संध्याकाळी चांगला साडेसातपर्यंत टक्क उजेड असतो. सकाळच्या आठच्या उन्हाकडं बघवत नाही. मार्च चांगला चाळीसच्या आसपास, एप्रिल चाळीस ते बेचाळीस आणि मे त्रेचाळीसच्या पुढं मागं असं तापमान असतं. लहानपणी मे महिन्यात एखादा दिवस त्रेचाळीस गाठलं की संध्याकाळी हमखास पाऊस. रात्री गच्चीवर अंथरुणावर जरा झोप लागायला लागली की हमखास पावसाची सर यायची. किती वेळा अंथरुण खाली वर ने आण करावी लागायची.

टरबूजाचा वास, हनुमान जयंतीची आणि सुंठवडयाची चव, रामनवमीची आठवण हमखास करून देई. काळ्या पाठीची, लालबुंद रवाळ कलिंगडं, त्यावेळी फक्त उन्हाळ्यातच मिळत. कितीही ऊन तापलं तरी खरा रांगडा सोलापूरकर कधीच टोपी अन गॉगल वापरणार नाही. या गोष्टी चाळीशी उलटल्यावर वापरायच्या असतात, असा एक सर्वमान्य समज आहे.

चाळीस वर्षांपूर्वी दारं खिडक्यांना वाळयाचे पडदे लागत. त्यावर पाणी मारलं की एक धुंद सुगंध घरभर पसरत असे. वीस वर्षांपूर्वी एअर कूलर ही चैन होती. आता एसी ही गरज होऊन बसली आहे.

दिवसा भुईकोट किल्ल्यात आणि रात्री गच्चीवर बल्ब लावून अभ्यास करणारी मुलं हे कॉमन दृश्य असे. दुपारच्या उन्हात रस्त्यावरचं डांबर वितळलं की ‘गारेगार’च्या काडीनं ते खरवडून त्याचं गष्टल ( नेम धरायची गोटी ) तयार करण्याचे उद्योग चालत.

पाच पैशात साधी आणि दहा पैशात दूधाची आईसकॅंडी देणाऱ्या 'सोलापूर आईस्क्रिम'च्या हातगाडया शहरभर फिरु लागत. वाडे, चाळी अजून नांदत्या होत्या.

त्यामुळे ठरवून एकेका घरची वाळवणं, पापड लाटले जात. संध्याकाळी पोरं आपापली ताटं घेऊन एखाद्याच्या घरी अंगत पंगत करीत. कैरीची वाटली डाळ आणि पन्हे, कांद्याची कोशिंबीर, कैरीची चटणी, दुपारच्या जेवणाला तळलेले सांडगे, पापड असा ठरलेला मेनू असे.

परीक्षा संपल्या की होम मैदानावर गल्ली गल्लीच्या क्रिकेट मॅचेस लागायच्या. पाच रुपये, दहा रुपयांची बक्षिसे ठरत. ऐन तळपत्या उन्हात, होम मैदानावर शे-दीडशे पोरं क्रिकेट खेळत असतं. बाजूला सरबताच्या आणि बर्फाच्या गोळ्यांच्या गाडया. आता उन्हाळ्याची चाहूल लागते एक दिवसाआड उठणाऱ्या अर्धशिशीने. बाकी फक्त उन्हाळ्यात मिळणाऱ्या सर्व गोष्टी, आता बाराही महिने मिळतात. वाडे पडले, अपार्टमेंट झाल्या. घराची सताड उघडी दारं बंद झाली. आता कोणी कुणाकडे जात नाही. दुपारी ऐकू येते ती कूलरची घरघर आणि एसीच्या आऊटर युनिटचा आवाज. गप्पांचे फड जमत नाहीत, अंगत पंगत होत नाही. ऐन गावभागातसुद्धा आता दुपारी शुकशुकाट असतो. एसीच्या थंडगार झोतात आता नातीगोती, शेजारधर्म, सळसळणारं तारुण्य असं सगळं घोरत पडलेलं असतं.

## १८. स्वये सर्वदा, नम्र वाचे वदावे

सध्या ज्याच्या त्याच्या अंगी पिसे भरल्यागत झाले आहे. अपेक्षेपेक्षा जास्त काळ लांबलेली ही महामारी, प्रत्येकाच्या ताटात वाढून ठेवलेले समस्यांचे डोंगर, अनिश्चितता, सर्वच बाबतीतली एवढी एकच गोष्ट सध्या सत्य आहे. बाकी आशेने परमेश्वराकडे पाहत रहाणे याच्याशिवाय कुणाच्याच हाती काही राहिले नाही.

या सगळ्या वातावरणाचा मुळातच संवेदनशील असलेल्या मनावर परिणाम होऊ नये म्हणून काही गोष्टी ठरवून बंद केल्या. एक एप्रिलपासून पेपर वाचणे, टीव्ही पाहणे, बातम्या ऐकणे पूर्णपणे बंद केले. व्हॉटस् ॲप व फेसबुक केवळ याच साठी सुरु ठेवले की अगदीच जगाचा संबंध तुटायला नको. पण त्यावरही अनेकांचे अनुभव, नवनवीन माहितीच्या नावाखाली त्याच त्याच गोष्टींचा केलेला भडिमार पाहून आणि ऐकून कान आणि मन विटून गेले आहे.

रोज संध्याकाळी सहा ते आठ वडिलांच्या ऑफिसला बसतो. एकदम आतल्या खोलीत वडिलांचा टीव्ही सुरु असतो. त्यांच्याशी बोलायला म्हणून गेल्यावर

पाच दहा मिनीटे जो काही आरडाओरडा ऐकायला मिळतो त्याने आधीच बिघडलेली मनःशांती पार मातीत जाते. मनाला प्रश्न पडतो की काय गरज आहे एवढं जीव खाऊन ओरडायची? बऱ्याच वेळा शंभर टक्के बरोबर असलेला मुद्दा केवळ चुकीच्या पद्धतीच्या मांडणीमुळे नाकारला जातो किंवा दुर्लक्षिला जातो. आपला मुद्दा ठामपणे, संयत शब्दात आणि अत्यंत आश्वासक देहबोलीतून मांडता येत नाही का? कल्पना करा की कुणीतरी तुम्हाला, तुमच्यासमोर, तू अत्यंत हुशार आहेस, विचारी आहेस, देखणा आहेस असे अत्यंत आक्रस्ताळेपणे ओरडून वारंवार सांगू लागला तर तुम्हालाही ती स्तुती असली, तरी या स्वरुपात ऐकायला आवडेल का?

कारण कळत नाही, पण अलिकडे हा कर्कश्यपणा हा या एकविसाव्या शतकाचा स्थायीभाव होऊन बसला आहे. सोसायटीत लहान मुले जरी खेळत असली तरी मिनीटात चार वेळा या गतीने ती किंचाळत असतात. काळ, वेळ याचं कुठलंही भान त्यांना नसतं. ती तरी काय करणार? जे त्यांना घरात, दारात, टीव्हीवर, मालिकांत, सिनेमांत, संगीतात दिसतं, त्याचं ते अनुकरण करत असतात. आपण तरी घरात

एकमेकांशी कुठल्या स्वरात बोलतो? पूर्वीच्या काळी, सगळ्या एकत्र कुटुंबात, सगळ्यांसाठी मरमर काम करणारी व्यक्ती जर फटकळ असली तर घरचा कर्ता माणूस म्हणत असे, "एवढं सगळयांसाठी मर मर करतोस तर बोलून का घालवतोस? अशाने केलेल्या गोष्टींची माती होते".

समाजकारणात, राजकारणात आपण हेच अनुभवत नाही का? साडेचार वर्ष जनतेसाठी झटून काम करणारा, अविश्रांत मेहनत घेणारा एखादा नेता निवडणूक लागली की शेवटच्या सहा महिन्यात अतिआत्मविश्वासाने आणि आक्रस्ताळेपणाने आपल्या साडेचार वर्षाच्या लोकप्रिय कारकीर्दीवरही पाणी फिरवतो आणि काहीच न केलेला एखादा नेता केवळ शांतपणे, संयतपणे बोलून भविष्याच्या स्वप्नांची केवळ आश्वासने देत बाजी मारून जातो. गेली तीस वर्ष कोर्टात काम करताना, आपला बरोबर असलेला मुद्दा, केवळ आरडाओरड करून मांडल्याने केस हरलेले अनेक वकील मी पाहिले आहेत.

याचा अर्थ आवाज कधीच चढवू नये असा होत नाही. पण त्या आवाज चढवण्याला संयुक्तिक कारण हवे. त्या आवाजाला नैतिक अधिष्ठान हवे, त्या स्वराला

परतत्वाचा स्पर्श हवा. मरगळलेल्या, चेतनाहीन समाजाला जागृत करायचे असेल तर घोषणा उच्चरवातच दिल्या पाहिजेत, मनातल्या मनात घोषणा देऊन स्फुरण चढत नाही. युद्ध असेल तर रणगर्जना केल्याच पाहिजेत, शंख वाजवलाच पाहिजे पण दैनंदिन पूजेसाठी मात्र मंजुळ आवाजात किणकिणारी घंटीच बरी वाटते. म्हणूनच समर्थांनी म्हटलय,

'स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे,
मना सर्व लोकांस रे नीववावे ....'



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

## १९. दिन ढल जाए हाय, रात न जाए |

सहा महिने झाले, सगळं जग या महामारीच्या वरवंट्याखाली पिसून निघतंय. एकही माणूस असा उरला नाही ज्याला काही समस्या नाही. माणसं अनेक, समस्या अनेकानेक, कारण मात्र एकच, महामारी! आर्थिक, सामाजिक, राजकीय सगळ्या सगळ्या आघाडयांवर समस्यांचे डोंगर उभे आहेत. माणसांची मात्र अवस्था फार बिकट होत चालली आहे. अस्मानी संकटं तर आहेतच, जोडीला सुलतानी संकटांचीपण काही कमी नाही.

याही काळात मढयाच्या टाळूवरचं लोणी खाणारी जमात आहेच. पेपर घ्यायचा बंद केला, बातम्या बघायच्या बंद केल्या तरी फेसबुकवर नुस्ती नजर टाकल्यानेसुद्धा येणारी नकारात्मकता काही कमी नाही. सगळं जग त्या लसीच्या आगमनाकडे डोळे लावून बसलं असताना, वैज्ञानिक प्रयत्नांची पराकाष्ठा करत असताना, आता एक सोडून दोन दोन लसी दृष्टिपथात असताना, अजून दोन वर्ष लस उपलब्ध होऊ शकणार नाही अशी बातमी जाणीवपूर्वक देणारे कोणत्या नीच मनोवृत्तीचे बनले असतील?

सगळा दिवस एका अदृष्टाच्या सावटाखाली जगताना कसा मनाच्या चिंध्या उडवत जातो? कुठले कुठले विचार येऊन मनाचा उकिरडा करुन जातात? हे जाणीवपूर्वक या नकारात्मक बातम्या पेरणाऱ्यांच्या ध्यानात कसं येत नाही? का जाणीवपूर्वक हे ही दहशत पेरतात? आधीच माणसं शारीरिक आणि मानसिक व्याधींच्या जात्यात भरडून निघताहेत. कबीरानं म्हटल्याप्रमाणे,

चलती चक्की देख के<br>
दिया कबीरा रोय।<br>
दो पाटन के बीच में<br>
साबित बचा न कोय॥

अशी अवस्था सगळ्यांचीच झाली आहे पण याही स्थितीत काही निर्लज्ज, कोडगे, राक्षस आपापला अजेंडा सेट करण्यात गुंतले आहेत. यांना माणसं तरी कसं म्हणावं? कलियुग असल्याने कर्माचा सिध्दांत यांना लागू होतो का नाही कोण जाणे?

दिवस सगळा आपला, आपल्या जवळच्या माणसांची काळजी करण्यात जातोय. संध्याकाळपासून सगळ्या काळज्या आभाळात ढग दाटून यावेत तशा दाटून

येतात. झडझडून पाऊस पडून आभाळ लख्ख मोकळं व्हावं तसं काही होत नाही. जिवाची आणि मनाची  घुसमट वाढत रहाते. आपण  उसनं हसू तोंडावर आणून वेळ मारून नेत रहातो. बेचव चाललेल्या मालिकांत आपलं मन रमत नाही. काम करणारांचही मन रमत नसावं. पोटासाठी करतात बिचारे.

वाचनाचा उत्साह कधीच संपून गेलाय. कंटाळून रात्री बाराच्या आसपास अंथरुणावर अंग टाकलं तरी डोळे टक्क उघडे रहातात. रात्री दोन अडीचच्या सुमारास कुठलं तरी कुत्रं सूर धरुन रडायला सुरुवात करतं. इकडं तिकडं भरकटत असलेल्या मनाला तोच भेसूर सूर धरून ठेवावासा वाटतो. पंखा बंद करावा तर घाम फुटतो. लावावा तर थंडी वाजते. चोंदलेलं नाक, खवखवणारा घसा नाही नाही त्या गोष्टींचे सिनेमे दाखवायला सुरु करतो. जरा विषयांतर करावं म्हणून मोबाईल हातात घ्यावा तर साठ सत्तर टक्के जण ऑनलाईनच असतात.

आता एवढया रात्री कुणाबरोबर गप्पा मारणार? आवाज बंद करुन फेसबुकच्या फेसावरून घसरत घसरत खाली यावं तर मधेच भूले बिसरे गीत या ग्रुप वर कुणीतरी

गाईडचं गाणं लोड केलेलं असतं. मी घाईघाईनं इयर फोन कानात खुपसून आवाज सुरु करतो. रफीचा मधाळ स्वर आणि देव आनंदचा गहिरा अभिनय मनात उतरू लागतो,

‘दिन ढल जाए,

हाय! रात न जाए .........’



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

# २०. एक धुंद में जाना है |

लहानपणापासून दोन गोष्टींचं आकर्षण खूप होतं. एक समुद्र आणि दुसरं धुकं. आयुष्यातली पहिली वीस वर्ष सोलापुरातच गेल्याने, पुढं सह्याद्रित हिंडायला सुरुवात झाल्यावर या दोघांशी जवळून परिचय झाला. त्यात समुद्राला खेव देणं काही शक्य न्हवतं, पण धुक्यात मात्र भरपूर विरघळलो. रायगड, राजगड, पन्हाळा, पावनखिंड, वरंध्याचा घाट, अंबेनळीचा घाट, शिवथर, प्रतापगड, कोकणातले रस्ते, विशाळगड किती किती ठिकाणी धुकं अंगावर घेतलं.

समुद्राचा धाक वाटतो, पण धुक्याशी मैत्री होते. धुकं आपल्या जिवश्च कंठश्च मित्रासारखं आपल्या गुणदोषांसह आपल्याला सामावून घेतं, समजावून घेतं, घट्ट मिठी मारतं. आपल्यातलं आणि त्यातलं व्दैत विरघळून जातं. आपण आपलं अस्तित्व विसरतो. धुक्याशी होणारी मैत्री ही खूप पर्सनल (वैयक्तिक) असते कारण, धुकं आपल्याला खेव (आलिंगन) देतं ना, त्यावेळेला तिथं फक्त आपण दोघेच असतो. आपल्याभोवतीचं सारं विश्व, आपला अहंकार,

आपला व्देष, आपला लोभ, आपला मत्सर एवढंच काय, आपलं अस्तित्वपण एका क्षणात नाहीसं करण्याची किमया, फक्त धुकं करू शकतं. म्हणूनच मला ते समुद्राइतकंच प्रिय आणि जवळचं वाटतं.

मृत्यूबद्दलचं माझं एक स्वप्न आहे. चालता बोलता माणूस धुक्यात गडप व्हावा तसा मृत्यू यावा. वेदना नाही, भय नाही, आजारपण नाही, माणूस सावरकरांसारखा आपणहून मृत्यूला सामोरा जावा.  मागे राहाणाऱ्यांना त्याच्या हसतमुख आस्तित्वाची जाणीव राहावी. जाणाऱ्याला एकदा धुक्यात शिरल्यावर सगळ्या गोष्टींचा विसर पडावा. त्याचं अस्तित्व धुक्यात विरघळून जावं. सहज १९७३ सालच्या धुंदमधलं गाणं आठवलं,

संसार की हर शै का,
इतनाही फसाना है
एक धुंद से आना है
एक धुंद में जाना है।

ये राह कहाँ से है
ये राह कहाँ तक है
ये राज कोई राही
समझा है न जाना है ...
एक धुंद से आना है
एक धुंद में जाना है ...

## २१.  येथ कोणाचे काय गेले ...?

बालपणाची बारा वर्ष, बारा वर्ष गायत्री मंत्राचं पुरःश्चरण, नंतरची बारा वर्ष, संपूर्ण भारतभर पायी भ्रमण करुन, एक तपस्वी एके दिवशी कृष्णेच्या तीरावर येऊन उभा राहिला, त्यावेळेस अवघा महाराष्ट्र पारतंत्र्यात आणि गुलामीत होरपळून गेला होता. मरण येत नाही म्हणून माणसे जगत होती. हे चित्र बदलायचे असेल तर शक्तीच्या उपासनेशिवाय तरणोपाय नाही हे या तपस्व्याच्या लक्षात आले.

त्याक्षणापासून सुरु झालेला राष्ट्र निर्मितीचा यज्ञ, पुढं आनंदवनभुवन निर्माण होईपर्यंत सुरु राहिला. दोन तपे या विराग्याने देव मस्तकी धरून हलकल्लोळ केला. काय नाही शिकवलं? प्रपंच, परमार्थ, राजकारण, समाजकारण. सामाजिक जीवनाचं एक अंग असं शिल्लक राहिलं नाही, ज्यावर समर्थांनी भाष्य केलं नाही. देशभर रामदासी मठांची परंपराच्या परंपरा उभी राहिली.  गावोगावी तालमी उभ्या राहिल्या. एका महत्वाकांक्षी माऊलीने पाहिलेल्या आणि एका श्रीमंत योग्याने प्रत्यक्षात आणलेल्या, एका

लोकहितकारी स्वराज्याचे स्वप्न पूर्णत्वाला गेले. श्रींचे आशीर्वादे करोन अवघे मनोरथ सिद्धिस गेले. साडेतीनशे वर्ष उलटली, काळ बदलला, वृत्ती बदलल्या, कलीची पाऊले आणखी पुढे पडली.

"जाति न पूछे साधूकी
पूछ लिजो ग्यान,
मोल करो तलवार का
पडा रहने दो म्यान ....." हे जाणीवपूर्वक विसरलं गेलं.

हे दुर्भाग्य समर्थांच्या वाट्यालाही आलं. यात नुकसान झाले ते महाराष्ट्र धर्माचे. समर्थ वाङमय हे समर्थ होते म्हणून तर ते एवढी वर्ष टिकले. त्या विरोधातील भाष्य किती काळ टिकतील? त्यानं कुणाचं भलं होईल? अपरिमित नुकसान तर झालंच आहे, अजूनही होईल. त्याला समर्थ आणि समर्थ परंपरा तरी काय करणार? समर्थांनीच म्हणून ठेवलयं,

"लोह परिसावरी रुसले,
तेणे सोनेपणासी मुकले
येथ कोणाचे काय गेले ....?
**जय जय रघुवीर समर्थ ...**"

## २२. चुकलिया माये

नऊ मार्च २०१९ ला 'फत्ते शिकस्त'च्या संहितेचं पूजन करून आणि संहिता शिवसमाधीसमोर आशीर्वादासाठी ठेवून रायगडावरून परतलो. त्यानंतर मागच्या वर्षभरात रायगडला जाता आलं नाही. नंतर हे वादळ! राहून राहून सारखी माहेराची आठवण यायची. मग या तीन चार महिन्यात नवीन पुस्तकाचं लेखन झालं. त्यातले साताठ लेख रायगडावर लिहीले. त्यानिमित्ताने मग मनाने साताठ वेळा रायगडावर जाऊन आलो.

अलीकडचा गर्दीत हरवलेला, घोषणा, जयघोषांनी दुमदुमून गेलेला, रोपवे झाल्यानंतरचा रायगड ज्यांनी पाहिला, त्यांना आम्ही पाहिलेल्या, आम्ही अनुभवलेल्या, आम्ही जगलेल्या रायगडाची कल्पनाही करता येणार नाही. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा तीनही ऋतुत आम्ही रायगडाची लेकरे त्याच्या अंगाखांद्यावर बागडलो आहे. दिवस म्हणू नये, रात्र म्हणू नये, ऊन म्हणू नये, पाऊस म्हणू नये, मनात आलं की उठावं आणि समाधीकडे चालू लागावं.

रात्री अपरात्री वारा झुडुपातून शीळ घालत असायचा, लख्ख चांदिणं पडलेलं असायचं.

जे काय दो-चौजण बरोबर असतील, त्यांना घेऊन समाधीला जायचं आणि दर्शन घेऊन समाधीच्या आसपास फतकल मारून बसायचं. काळाचं भान नाही, वेळेची चिंता नाही. संपूर्ण घरात आई ज्या खोलीत असेल, तिच्या भोवती भोवती पोरं जशी खेळत रहातात तसं समाधीच्या आसपास बसून असायचं. हे झालं अलीकडच्या दहा पंधरा वर्षातलं. त्याच्या आधी म्हणजे साधारण दोन हजार सालापर्यंत आमचा मुक्कामचं जगदीश्वराच्या देवळात असे.

जे काही तीन चार दिवस गडावर रहात असू, तितके दिवस आमच्या सॅक देवळाच्या एका कोपऱ्यात ठेवून आम्ही गडभर भटकत असू. सकाळी उठून तोंड धुवायला बारा टाक्यावर, मग वसंताकडे चहा नाष्टा, मग बादल्या हातात घेऊन शाही स्नानासाठी काळा हौद, दुपारी जेवायला बाबुरावकडे एमटीडीसीला, रात्री वसंताच्या झोपडीसमोर कुडाच्या छपरात गरम गरम भाकरी अन पिठलं. थंडी असेल तर मुक्काम देवळात कोपरा पकडून, नाहीतर जगदीश्वराच्या नगारखान्यात. अफाट तारकांचं नक्षत्रमंडळ अंगावर पांघरून

झोपून जायचं. सकाळी धनगरवाड्यातले कोंबडे आरवू लागले की जाग यायची. किती प्रसंग, किती आठवणी?

सिंहासनासमोर मशाली लावून दिलेली व्याख्यानं, नीरव शांततेत मध्यरात्री जगदीश्वराच्या रंगशिळेवर बसून म्हटलेले अभंग, कधी एकटे दुकटे तर कधी शंभरसव्वाशे विद्यार्थी बरोबर घेऊन रात्री सिंहासन ते समाधी काढलेल्या मूकयात्रा, पौर्णिमेच्या चांदण्यात टकमकीच्या टोकावर पालथं पडून निरखलेला रहाळ, सूर्यास्ताच्या वेळेस हिरकणीच्या टोकावर बसून अनुभवलेली आभाळातली रंगपंचमी, हाताच्या अंतरावर आभाळात स्थिरावलेला ससाणा आणि मग त्याचं बाणासारखं जमिनीकडे झेप घेणं.

रोपवे सुरु झाला तशी आमच्या माहेरची गर्दी वाढली. भारलेपण हरवलं. ऐकू येऊ लागल्या त्या तारस्वरात दिलेल्या घोषणा, मोबाईलवरची कर्कश्श गाणी. जाणवत होतं या बदलाला सामोरं जावं लागणार, आपल्या सवयी बदलाव्या लागणार. बुध्दिला पटत होतं पण मनाची तयारी होत नव्हती.

पूर्वी गड उतरून निघताना शेवटी समाधीच दर्शन घ्यायची वेळ यायची तेव्हा ह्रुदयात कालवाकालव व्हायची,

गळ्यात आवंढा दाटून यायचा, वाटायचं आता पुन्हा कधी माहेरी आईकडे यायला मिळणार? पायाला मणामणाची ओझी बांधल्यासारखे जड पायांनी एकेक पायरी उतरत असू. महादरवाजाचा उंबरा ओलांडून वळून उंबऱ्यावर डोकं टेकवलं की डोळ्यातून दोन तरी टिपं उंबऱ्यावर गळल्याशिवाय रहायची नाहीत. खाली चितदरवाजापाशी एस.टी. उभी असे. मुद्दाम खिडकी पकडून बसायचो. कोंझर येईपर्यंत रायगड वेगवेगळ्या कोनातून दिसत रहायचा. तुकोबांनी वर्णन केलेल्या अभंगासारखी अवस्था व्हायची,

'कन्या सासुऱ्यासी जाये,
मागे परतोनि पाहे ..
तैसे झाले माझ्या जीवा,
केव्हा भेटसी केशवा ....?'

वर लिहीलं तसं या सहा महिन्यात आठवून आठवून या माहेरच्या आठवणी लिहील्या. आता मात्र धीर धरवेना झालाय. त्याच अभंगात म्हटल्याप्रमाणे,

'चुकलिया माये बाळ हुरहुरू पाहे,
जीवनावेगळी मासोळी,
तैसा तुका तळमळे .....'

असं झालयं. शक्य असतं तर ती भवानी तलवार हातात घेऊन त्या चीनचा कोथळा बाहेर काढला असतां .. पण ........




फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

# २३.        अचपळ मन माझे

एखादं लहान मूल असावं, तसं झालयं मनाचं. इकडे जाऊ नको, तिकडे जाऊ नको म्हटलं की तिथेच जायचा हट्ट धरून बसतंय. एखादी गोष्ट करू नको म्हटलं की करायला धावतंय. एखादी  किंवा एखाद्याची आठवण काढू नको म्हटलं की त्याच्याभोवतीच घोटाळत रहातंय.

मी काही जन्मजात ट्रेकर नाही किंवा निसर्गप्रेमी नाही. प्रसंगा प्रसंगाने निसर्गाच्या, डोंगरांच्या, समुद्राच्या, जंगलाच्या, किल्ल्यांच्या प्रेमात पडत गेलो. पण म्हणून काही दरवर्षी न चुकता एखाद्या किल्ल्यावर, एखाद्या जंगलात जातोच असेही नाही. दरवर्षी रायगड आणि प्रतापगडावर एक व्रत म्हणून जाण्याचा एक कालखंड  होता, तो तितक्याच निष्ठेने सांभाळला.

पण यंदा मात्र सलग पाच महिने घरात कोंडून पडल्याने या जीवलगांची, त्या किल्ल्यांची, त्या घाटवाटांची, समुद्राची अनावर आठवण होत आहे. कोसळणारा पाऊस, बहरत जाणारा निसर्ग, फूल - वेलींच्या तोरणाने नटलेले किल्ले, कडयावरून कोसळणारे धबधबे, गवतांचे गालिचे,

या सगळ्यांची फेसबुकवर येणारी प्रकाशचित्रे, हे घरबसेपण असह्य करताहेत. सलग तीन चार महिने माणसाचा वावर नसलेला निसर्ग, आपल्या अनाघ्रात सौंदर्याने मुसमुसतोय आणि त्याचा विरह न साहवून इकडे मीही मुसमुसतोय, डोळे पुसतोय. किती जोडलेले असतो आपण निसर्गाशी? कसं परमेश्वराने आपल्याला एकमेकांशी बांधून ठेवलंय. घरातल्या कुंडीत आलेलं साधं गोकर्णीच फूलसुद्धा आपल्याला आनंद देऊन जातं. तिथं हजारो फुलांनी फुललेले डोंगर, घाट, किल्ल्यांचे तट, पठारं, माळरानं  आपलं आयुष्य किती सुखी आणि अर्थपूर्ण करत असतील?

सहजीवनाचा केवढा सुंदर नजराणा आपल्यासाठी घेऊन येत असतील? याचा आपण कधी विचार केला आहे? दुर्दैवाने आपण सगळे प्रवासात एक तर झोपा काढतो, नाही तर वचावचा खात बसतो. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कमीत कमी वेळात पोहोचणे याला आपण प्रवास म्हणतो. त्यासाठी माझा स्पीडचा काटा कधी एकशे वीस, एकशे चाळीसच्या खाली असत नाही यातच आपला पुरुषार्थ! किती सुंदर असतो प्रवास. पुणे मुंबई एक्स्प्रेसवेवर असावं, ऐंशी नव्वदचा स्पीड, मस्त जुनी गाणी, पहिल्या

टोलनाक्यानंतरचे उजव्या हाताचे हिरवेगार डोंगर, कोसळणारे धबधबे, लोणावळ्यातलं धुकं, 'दत्त'चा गरमागरम बटाटेवडा, जिरे घातलेलं अधमुरं ताक, ती वळणं, ते बोगदे, बोगद्यात टपावर कोसळणारे पाण्याचे थेंब, घुमणारे हॉर्न... अहाहा!! याऐवजी दोन ते अडीच तासात दादर गाठलं. काय म्हणावं या कर्मदरिद्रीपणाला. पश्चिम महाराष्ट्रच नाही तर अख्खा मराठवाडाही मी असाच हिंडलो आहे.

हिंगोलीजवळच्या नॅशनल ढाब्यावर एकदा जेवत होतो, समोर ढाब्याचा मालक ताजी हिरवीगार मेथी निवडत होता. मला राहवलं नाही, म्हणालो,"थोडी कच्चीच तोंडी लावायला द्या." त्यानं अख्खी पेंडीच समोर आणून ठेवली. म्हणाला,"खाओ बादशाहो, तुसी भी क्या याद करोगे?" टेंभूर्णीच्या पलिकडच्या सरदारजीच्या ढाब्यावरली काली दाल. काय काय अन किती सांगू. मनाला अन शरीराला घरात बांधून घातलंय, पण मन केव्हाच सुळकन सुटून बाहेर पळालंय आणि शरीराला सारखं वाकुल्या दाखवतयं.

म्हणून म्हटलं, अचपळ मन माझे, नावरे आवरिता.

## २४. समर्पण

उजाडलं तरी सुर्यदर्शन व्हायची काही चिन्हं नव्हती. रात्रीपासूनच पावसाची घुम्मड चालू होती. पुण्यात मित्राकडे मुक्कामाला होतो. आषाढी एकादशीचा दिवस. चहा पिता पिता शिवथरला जायचा बेत ठरला. पुढच्या तासाभरात मॅटेडोर भरून, आम्ही आठ-नऊ जण भोर ओलांडून वरंध्याच्या घाटात शिरलो. पावसाला खळ नव्हता. पडत्या पावसात कुडकुडत वाघजाईला चहा घ्यायला थांबलो, तो समोरच्या घळीत दोन अजस्त्र धबधबे खालच्या दरीत कोसळत होते. अंतर खूप असल्याने आवाज ऐकू येत नव्हता, पण पाण्याची धार वेगाने दरीत कोसळताना दिसत होती.

वाटेतल्या धबधब्यात भिजत मस्ती करत दुपारी शिवथरला पोहोचलो. माझी शिवथरला यायची पहिलीच वेळ. खूप ऐकलं आणि वाचलं होतं शिवथरविषयी. पायऱ्या चढू लागलो तसं आजूबाजूच्या वातावरणातलं पावित्र्य मनावर ठसायला लागलं. शांतपणे पायऱ्या चढून वर

आल्यावर, समोर भली थोरली घळ दिसत होती. समोरच पाण्याचा दोदाणा खडकावर आपटत होता.

त्यामुळे उडणारे पाण्याचे तुषार पायऱ्यांपर्यंत अंगावर येत होते. वाटेकडेच्या भिंतीवर पावसानं भिजलेली, गारठलेली माकडं किचकिचत होती. काही खायला मिळेल या आशेनं टकामका आमच्याकडं पहात होती. तसेच भिजल्या अंगाने घळीत शिरलो. आत एक वेगळीच शांतता जाणवत होती. धबधब्याचं अस्तित्व जाणवत होतं पण आवाज येत नव्हता.

सह्याद्रित असे शेकडयांनी धबधबे, त्यातले काही पुढच्या काळात पाहिले सुद्धा, पण शिवथरच्या धबधब्याची सर कुणालाच नाही, कारण त्याचं वर्णन खुद्द समर्थांनी आपल्या प्रवाही भाषेत करुन ठेवलेलं ...

गिरीचे मस्तकी गंगा,
जेथोनी लोटली बळे,
धबाबा लोटती धारा,
धबाबा तोय आदळे ॥
गर्जतो मेघ तो सिंधू,
ध्वनी कल्लोळ उठिला,

कडयासि आदळे धारा,
वात आवर्त होतसे .....।।

तेव्हाच मनात नक्की केलं होतं की कधीतरी इथं मुक्कामाला यायचं. समर्थाची आवडती जागा ती, एका अलौकिक ग्रंथाचं जन्मस्थान, परीक्षा पाहिल्याशिवाय कसा योग जुळून येणार? तब्बल पंचवीस वर्षांनी इ. स. २०१५ साली तो योग जुळून आला. एक समानधर्मा मित्र घेऊन संध्याकाळी पाचच्या सुमारास घळीत पोहोचलो. धबधबा सुरु होता पण ऐन पावसाळ्यातला जोष नव्हता.

साधारणतः एक तृतीयांश धार पडत होती. रात्रीची आरती, प्रसाद झाल्यावर धबधब्याशेजारच्या कट्ट्यावर येऊन बसलो. आम्हा दोघांव्यतिरिक्त तिथं कुणीही नव्हतं. घळीतून पाझरणारा मंद प्रकाश, एका लयीत पडणारी पाण्याची धार, सभोवतालचं दाट जंगल, वर नक्षत्रांनी गच्च भरलेलं आकाश. काही बोलावसंच वाटत नव्हतं. साऱ्या वातावरणातलं पावित्र्य ब्रह्मरंध्रातून देहात उतरतंय असं वाटत होतं.

इ. सन १६५४ ते १६७४ तब्बल वीस वर्ष समर्थ या ठिकाणी वास्तव्यास होते. समोरच्या झाडाच्या ढोलीत

बसलेला एक पिंगळा फडफड करीत धबधब्याच्या वरच्या दिशेला उडून गेला. माझं मनं समोर पडणाऱ्या पाण्याच्या धारेचा विचार करु लागलं.

या पंचवीस वर्षातल्या किमान दहा भेटीत मी हा धबधबा वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या रुपात पाहिला. पृथ्वी, आप, तेज, जल, वायू या पंचमहाभूतांपैकी प्रत्येक गोष्टींशी या धबधब्याचा जवळचा संबंध होता. आकाशातून प्राप्त झालेला पाण्याचा थेंब अन् थेंब गोळा करुन, तो पृथ्वीला अर्पण करीत होता, आणि वायुपूत्र हनुमानाचं आराध्य दैवत म्हणून पूजन करणारं समर्थरुपी तेज याच्या सान्निध्यात वीस वर्ष रहायला होतं.

समर्पणाचा खरा अर्थ शिकावा धबधब्याकडून. गोळा होणारा पाण्याचा थेंब अन् थेंब पृथ्वीला समर्पित केल्यावर तो कोरडा ठक्क होतो. स्वतःकडे काहीही ठेवून घेत नाही. जणू पावसाळ्यात याच्या अंगा खांद्यावरून वाहणारं जळं हे उन्हाळ्यात मृगजळ वाटावं. त्याच्यावरचं शेवाळं वाळून जातं, गवताचे ठोंब सुकून जातात. खालच्या डोहात शिल्लक राहिलेलं पाणीदेखील आटून जातं, शिल्लक राहाते ती वाहून गेलेल्या पाण्याची खूण. पुन्हा ढग दाटून येतात,

पुन्हा वादळवारे वाहू लागतात, वीजांचं नर्तन सुरू होतं. आकाशातून सहस्त्रधारा बरसू लागतात, डोंगरमाथ्यावरच्या वहाळातून पाण्याचे ओहोळ वाहू लागतात. ओहोळ धारेला मिळतो, धार झऱ्याला मिळते, झरा नाल्याला मिळतो, नाला ओढयाला मिळतो, ओढा खळाळत नदीला येऊन मिळतो, नदीचा उगम प्रवाहित होतो. ती झेपा टाकत, उड्या मारत, खळाळंत कडयाच्या टोकाशी येते ... आणि तिचा धबधबा होतो. कडयावरून तिचा कडेलोट डोहात होतो, डोह भरला की नदी वाहू लागते.

मी किती वेळ झाला त्या डोहात डुबक्या मारत होतो कुणास ठाऊक? मित्राच्या हाकेने भानावर आलो, "चल, सकाळी काकड आरतीला लवकर उठायचेय." खोलीत जाऊन अंथरूणावर अंग टाकलं, पण मन मात्र तिथंच धबधब्याच्या धारेपाशी रेंगाळत राहिलं होतं.



फोटो : सोशल मिडियावरून साभार.

# २५. एकच ठिकाण, दोन प्रसंग.

पसरणीचा घाट चढून गाडया पाचगणीत पोहोचल्या, तोपर्यंत सूर्य पश्चिमेकडे कलला होता. आता इथून महाबळेश्वर अठरा किलोमीटर. माझ्याबरोबर शाळेची सव्वाशे मुलं होती. महाबळेश्वर, प्रतापगड, रायगड, दिवेआगर असा भरगच्च पाच दिवसांचा कार्यक्रम होता. महाबळेश्वरात घुसतोय, तोपर्यंत कुणीतरी बॉम्बे पॉईंटला जाऊन सूर्यास्त बघण्याची टूम काढली. मग गाडया सरळ तिकडेच घेतल्या. एमटीडीसीशेजारच्या अरुंद रस्त्यावरून गाडयांचा जणू ओघ तिकडे चालला होता.

प्रचंड गर्दीमुळे एसट्या एक दीड किलोमीटर अलीकडेच उभ्या कराव्या लागल्या. मी सावकाश चालत जाऊन एका खांबाला टेकून उभा राहिलो. नुस्ती जत्रा भरली होती तिथं. हजारभर माणसांचा गोंगाट, मक्याची कणसं विकणारे, फुगे विकणारे, आईस्क्रिम विकणारे, घोडेवाले, भज्यांचे स्टॉल सगळा गोंधळ सुरु होता. रायगडावरून इतक्या वेळा निवांत सूर्योदय, सूर्यास्त

पाहिलेले असल्यानं, त्या गर्दीत मला रस नव्हता. एकदा आभाळाकडं नजर टाकली.

क्षितिजावर एवढं धुकं होतं की कुणालाच सूर्यास्त दिसणार नव्हता, पण जो तो टाचा वर करकरुन पश्चिमेकडे पहात होता. मी लांब उभा राहून सगळी गंमत बघत होतो. अखेर माझा अंदाज खरा ठरला. सूर्य कधी बुडाला कुणालाच कळालं नाही. जशी येतानाची घाई, तशीच परत जातानाची. आरडाओरड, गाडयांचे हॉर्न, घोडयांच्या टापा, अर्ध्या तासात सगळा बाजार उठला. सगळ्या गाडया गेल्याशिवाय एसट्या वळवणं शक्य नव्हतं म्हणून सगळयात शेवटी आम्ही. मी मनोमन ठरवून टाकलं, पुन्हा एवढी जत्रा घेऊन कधी इकडं यायचं नाही.

एक घुमारदार वळण घेऊन सचिनने गाडी बॉम्बे पॉईटच्या टोकावर नेऊन उभी केली. दुपारचे अडीच वाजले होते. परिसर सगळा निर्मनुष्य. पावसाची एक मोठ्ठी सर नुकतीच पडून गेली होती. गच्च धुकं भरलं होतं. गाडी थांबवली आणि काचा खाली केल्याबरोबर भसाभस धुकं गाडीत घुसलं. पानांवरून टपटपणाऱ्या पावसाच्या थेंबाचाच काय तो आवाज. एक काळ्या रंगाचा कोतवालासारखा पक्षी

शीळ घालत इकडे तिकडे उडत होता. खाली उतरून सूर्यास्त बघायच्या कट्टयावर चढून दरीत वाकून बघितलं. हातावरचंसुद्धा दिसत नव्हतं, इतकं धुकं दरीत भरून राहिलं होतं. सतत दोन अडीच महिने कोसळलेल्या पावसानं, पायाखाली कुजलेल्या पानांचा चिखल झाला होता. त्याक्षणी लक्षात आलं, शांततेलाही एक आवाज असतो. मला गुलजारांच 'मौसम' मधलं गाणं आठवलं,

‘बर्फिली सर्दियो में,
किसी भी पहाडपर,
वादी में गुँजती हुई,
खामोशियाँ सुने .....’

आत्तापर्यंत गाणं फक्त ऐकलं होतं, आज ते अनुभवत होतो.

रस्त्याच्या एका टोकाचा, कोपऱ्यावरचा फॅमिली सूट घेतला होता. परत येऊन गरम गरम चहाचे घुटके घेत पुण्याच्या मित्राला, मागच्या वेळेसच जत्रा पुराण आणि आज दुपारचा अनुभव मोबाईलवर सांगत पायऱ्यांवर बसलो होतो. धुकं तसंच गच्च भरून होतं. शेजारी कुणीतरी येऊन बसल्याचं जाणवलं. फोन संपला, सचिनला मागच्या वेळची सगळी गंमत सांगितली, त्या पार्श्वभूमीवर आज दुपारचा

अनुभव केवळ अलौकिक होता ना असं विचारलं? त्याचा काहीच प्रतिसाद येईना, एवढ्यात धुक्याची चादर हलली आणि एकदम वीतभर अंतरावर शेजारी बसलेलं वान्नर दिसलं. त्याच्याऐवजी मीच टणकन उडालो. हसतच सूटमधे शिरलो तर सचिन निवांत कॉटवर पहुडलेला. त्याला समजेचना, मी का पळत आलो ते!



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

## २६. तिनकोंका बस, इक आशियाँ |

इ.स. १९५० ते १९९० हा इंग्रजी राजवटीनंतरचा कालखंड खऱ्या अर्थाने मध्यमवर्गीय मानसिकतेचा कालखंड होता असे म्हणावे लागेल. या काळातले हिंदी चित्रपट, नट, नटया, कथानके हे सगळे याच मध्यमवर्गीय मानसिकतेभोवती म्हणजेच समाधानी जीवनशैलीभोवती फिरत होती. नट नटयांना सायकलवरून फिरत गाणी म्हणायला काही कमीपणा वाटायचा नाही. महाबळेश्वरपेक्षा किंवा

माथेरानपेक्षा जास्त लांब शूटींगसाठी कुणी जात नसे. अपवाद काश्मिर आणि उटीचा. संवादात, कथेत, गाण्यात एक उच्च अभिरुची, तत्वनिष्ठ जगण्याचा अभिमान डोकावत असायचा.

असंच एक गुलजारांच  चिरतरुण, समाधानी मानसिकतेच गाणं, चित्रपट : सितारा ( १९८० ) संगीत अर्थातच आर.डी. नायक मिथुन, नायिका जरीना वहाब भल्या मोठया पाषाणखंडांवर फिरत फिरत भविष्याची स्वप्न रंगवताहेत त्यावेळचं हे गाणं,

थोडीसी जमीं, थोडा आसमाँ,
तिनकोंका बस इक आशियाँ ..

घरटं असावं, तेपण काडया काडयांच, हीच इच्छा. अगदी एक महल हो सपनों का म्हटलं तरी महल स्वप्नातच. वास्तवात, तिनकोंका बस इक आशियाँ. अंतऱ्यात ती म्हणते,

“माँगा है, तुमसे जो
ज्यादा तो नहीं है ....” तो उत्तरतो,
“देने को तो जाँ दे दे,
वादा तो नहीं है......” यावरचं तिचं उत्तर फार खट्याळ आणि मार्मिक आहे, ती म्हणते,
“कोई तेरे वादेपे जीता है कहाँ?”
स्वप्न तसंच पुढं सरकतं, तो म्हणतो,
“मेरे घरके आँगनमें,
छोटासा झूला हो ...” ती तेच स्वप्न पुढं नेते ....
“सौंधी सौंधी मिट्टी होगी
लेपा हुआ चूल्हा हो ....
थोडी थोडी आग होगी
थोडासा धुआँ ..”

मला शेवटचा अंतरा फार आवडतो. तो तिला विचारतो,

“रात कट जायेगी तो
कैसे दिन बिताऐंगे ..?” तिचं उत्तर फार मजेशीर आहे, ती हसत म्हणते,

“बाजरे के खेतों में कौए उडाऐंगे”

ही ओळ म्हणताना लताबाई ज्या हसल्या आहेत त्याला तोड नाही.

काळ बदलत गेला. सिनेमा रंगीत झाला. तशी स्वप्नही रंगीत झाली. जमिनीवरचे पाय सुटले. लाखा लाखांच्या गाड्या, करोडोंचे बंगले, विमानं, हेलिकॉप्टर्स, कोटयावधी रुपयांची मानधनं, परदेशांच्या वाऱ्या .... जितकी म्हणून समृध्दी वाढत गेली, तितकी नैतिकता खाली खाली गेली. नैतिकतेनं तळ गाठला तेव्हाचं गाणं होतं,

“कभी मेरे साथ कोई रात गुजार,
फिर सुबह तक मैं करु प्यार ...”

या नैतिकतेच्या गाळात असे अनेक तिनकोंके आशियाने बुडून गेले. आपल्या हाती उरले शब्दांचे बुडबुडे .....

## २७.        कभी खुदपें, कभी हालातपें |

“रोना आया, बात निकली तो,
हरइक बातपें, रोना आया ........”

उजाडणारा प्रत्येक दिवस एक नवी समस्या, एक नवे आव्हान, एक नवी उमेद, एक नवे स्वप्न, एक नवी निराशा, एक नवी इच्छा अशा सगळ्या संमिश्र भावना घेऊन जन्माला येतो आहे. हे संकट सुरू झाल्या झाल्या लोकांना याचे गांभीर्य लक्षात आले नसेल म्हणा किंवा याची व्याप्ती आणि याच्या कालखंडाचा अंदाज आला नसल्याने म्हणा, प्रत्येकाने आपापल्या पातळीवर याचा मुकाबला करुन इतरांना शक्य तेवढी मदत करण्याची भूमिका ठेवली होती. दिवसागणिक जेव्हा या संकटाने भीषण रुप धारण केले, तेव्हा लोकांनाही वाटायला लागले, किती दिवस आणि कुणाकुणाची मदत करणार? एक दिवस मदत करणाऱ्यालाच मदत मागायची पाळी येऊ नये म्हणजे मिळवली.

काळ व्यापक होत गेला, तसतसे प्रत्येकाचे वैयक्तिक हेतू ( अजेंडे ) बाहेर येऊ लागले. राजकारण्यांना यात राजकारण दिसू लागले, समाजकारण्यांना जातीचे ध्रुवीकरण

दिसू लागले, डॉक्टरांना हताशपणे मरणाऱ्यांचे मरण दिसू लागले आणि पैसे खाणाऱ्यांना हिरवेगार कुरण दिसू लागले. जो तो आपल्या कामाला लागला. हळूहळू माणसे बनचुकी होत गेली. डोळ्याखालचे मास्क नाकाखाली आले, नाकाखालचे हनुवटीखाली आणि मग पुन्हा पिचकाऱ्या सुरू झाल्या. पहिले महिना दोन महिने, जिथे एकही पेशंट नव्हता, तिथे पहिला पेशंट सापडताच आकडे हा हा म्हणता फुगत गेले.

जणू लागण झालेले पेशंट विष अमृत खेळत प्रत्येकाच्या डोक्यावर हात ठेवत होते. एका ठराविक कालखंडानंतर सरकारनेही हतबुध्द झाल्यासारखे सुटकेचे सगळे दोर कापून टाकले. घरात बसून रहायचं तर खावं काय? आणि बाहेर पडावं तर जगावं कसं? करावी लागतीये ती जिवंत रहाण्याची, टिकून रहाण्याची धडपड. राजकीय हव्यासापोटी माणसे किती खालच्या थराला जाऊ शकतात हे सगळ्या जगाने पाहिले.

मी मागं एका लेखात म्हटलं होतं, करोनाला फक्त एका गोष्टीत पराभव पत्करावा लागला. त्याला माणसातला अहंकार नाही मारता आला, उलट याही स्थितीत तो

वेगवेगळ्या स्थितीत प्रकट होताना पाहून त्यालाही थक्क व्हायला झाले असेल. तुम्ही आम्ही सगळे मध्यमवर्गीय, म्हणजे थोडक्यात सज्जन गोविंदराव, निरुपद्रवी प्राणीमात्र रोज मनातल्या मनात या परिस्थिती समोर कुढतो आहोत, मनातल्या मनात रडतो आहोत. खेद तर कुठल्या कुठल्या गोष्टींचा मानायचा? राग आला तर कुणावर काढायचा? आत्ता एका मित्राचा फोन होता, बोलता बोलता सहज वर लिहीलेलं गाणं आठवलं. आजच्या परिस्थितीला किती परफेक्ट फिट आहे, समर्पक आहे, विदारक असलं तरी सत्य आहे.

“कभी खुद पें, कभी हालात पें रोना आया
बात निकली तो, हरईक बात पें रोना आया .....”



## २८.        याचसाठी केला होता अट्टहास.

आत्ता नेमकं आठवत नाही कधी आऊसाहेबांनी हाती तलवार दिली ते, पण सारं आयुष्यंच एक रणांगण बनून गेलं. पाचव्या सहाव्या वर्षी घोडयावर टाकलेली मांड शेवटपर्यंत उतरलीच नाही. नवव्या, दहाव्या वर्षी त्या उजाड जहागिरीत पाऊल टाकले आणि माझ्या लक्षात आले की आपले बालपण हरपले . अचानकच पोक्त झालो. एका पत्रात म्हणून गेलो, "हे राज्य व्हावें ऐसे श्रींचे मनात फार आहे, कुणी सवंगडयाने विचारले की सांगत असे श्री म्हणजे मातोश्री, पिताश्री, श्री आदिशक्ती तुळजाभवानी आणि श्री शंभु महादेव."

माझ्या दृष्टीने हे चौघेही एकच होते. त्यांचं फार दिवसांपासूनच हे स्वप्न होतं, जे मला पूर्ण करायचं होतं. सुरुवात  पुरंदरावरोन झाली आणि मग उसंत कशी ती मिळालीच नाही. रोज नवा मुलुख, रोज नव्या कल्पना, नवी माणसे, नवे शत्रू, नवनवीन रणांगणे आणि  ऊराशी बाळगलेली नवनवीन स्वप्ने. या स्वप्नांना आकार दिला आऊसाहेबांनी आणि ही स्वप्ने साकारणारे हात होते

शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे आणि इथल्या मातीवर आणि संस्कृतीवर अफाट प्रेम करणाऱ्या भूमिपुत्रांचे!

किती फिरलो या उण्यापुऱ्या पन्नास वर्षात? आगऱ्यापासून ते जिंजीपर्यंत आणि सूरतेपासून ते बंगळूरापर्यंत. घोडयावरचं जीन हेच घर झालं होतं. काही स्वप्ने पूर्णत्वाला गेली, काही अपूर्ण राहिली. शेवटी नव्या पिढीच्या कर्तृत्वाला काहीतरी ध्येय शिल्लक ठेवावंच लागेल ना? काय म्हणालात? काही हौस मौज जमली का करायला? हौस एकच होती नवनवीन किल्ले बांधण्याची. ती मात्र पुरती फेडून घेतली. एकशे अकरा किल्ले नव्याने बांधले, काही जुने दुरुस्त केले अशी तीनशेसाठ किल्ल्यांची फौजच उभी केली.

मौज वाटायची ती उभ्या केलेल्या आरमारातून सागरी स्वारी करताना. या सगळ्या प्रवासात अखंड साथ लाभली ती .. ती भवानीची. ती पहा ती शेजारच्या मंचकावर विराजमान आहे. परवा रायगडी परतल्यावर प्रकृतीस अस्वास्थ्य आले, तेव्हा कमरेची सोडून तेथे ठेवली होती. जणू विचारते आहे, आता पुढची मोहीम कुठली? आता ही शेवटची मोहीम, मोहीम कसली महायात्राच. पण .. पण इथे

तुला सोबत नेता येणार नाही. तुला इथेच थांबावे लागेल, राहावे लागेल आपण गाजवलेल्या लढायांची साक्षी होऊन.

खूप दूरवरून घातलेल्या हाका कानी येताहेत. कधी तो आवाज आऊसाहेबांचा वाटतो, कधी महाराज साहेबांचा, कधी तान्हाजीरावांचा तर कधी बाजीप्रभूंचा, एक अस्पष्टशी हाक ऐकू येते राणीसाहेबांची. या आपण, अर्ध्यावर सोडलेला डाव पुरा करू म्हणताहेत. येतो आहे. आवरलेच आहे सगळे. तर मग मंडळी,

“आम्ही जातो आमुच्या गावा,
आमुचा रामराम घ्यावा,
हेचि तुमची आमची भेटी,
येथेनिया जन्मतूटी ....”

“बा रायगडा, या अखेरच्या क्षणी मी तुझ्या कुशीत असावं हा केवढा भाग्ययोग आहे, एक करशील? उद्या वाहणाऱ्या वाऱ्यासवे एक निरोप राजगडाला दे. म्हणावं, राजधानीचा मान तुला मिळाला तरी अखेरच्या क्षणापर्यंत मी त्याला विसरलो नव्हतो. जोपर्यंत या पृथ्वीतलावर तुम्ही दोघे उभे असाल तोपर्यंत जग मला विसरणार नाही.
दिंडी गेली पुढे, येतो आम्ही देवा,



**याचसाठी केला होता अट्टहास,**

**शेवटचा दीस गोड व्हावा .......'**

**दि. ३ एप्रिल, श्री शिव पुण्यतिथी.**

**मुजरा ... राजे त्रिवार मुजरा.**

चित्रकार .. पराग घळसासी.

## २९.        जाने क्या बात है?

“जाने क्या बात है।

नींद नही आती, बडी लंबी रात है ॥“

या मनाचं काही समजेनासं झालयं. आज वर्ष होऊन गेलं, जसा जसा मी घरात कोंडला जातोय, तसतसं हे जास्त उन्मुक्त होत चाललयं. कुठल्या गोष्टींचा विचार करावा, कुठल्या गोष्टींचा करू नये याचा काही धरबंद उरलेला नाही. सारं जग एका अदृश्य सावटाखाली जगत असताना, हे लेकाचं बिनधास्त सगळीकडं उंडारतय. त्याला कुठलाच विषय त्याज्य नाही. वर्षभरात त्याला शिस्त लावायचे हजार प्रयत्न करून झाले, पण याचे मात्र पहिले पाढे पंचावन्न.

चांगलं हाताला धरून एका जागी बसवायला जावं तर लेकाचं सुळकन हातातून सुटून जातं. दिवसभर कुठंतरी वर तोंड करून फिरत असतं. कधी कुठल्या किल्ल्यावर तर कधी मित्रांच्या कट्ट्यावर. कधी समुद्र किनारी तर कधी कोकणच्या सडयावर. कधी कुणाच्या वाडयावर तर कधी राजकारणाच्या उकिरडयावर. दिवसभर हुडकून हुडकून आपण दमून जावं तेव्हा तिन्हीसांजेला सगळीकडं लोळून,

खेळून, बरबटल्या अंगानं घरी येतं. आपण वाट बघून थकून गेलेले असतो आणि ही स्वारी नको नको त्या विषयांच्या माळा घेऊन घरी येते. त्या सगळ्या माळा, त्याच्या गळ्यातून काढून त्याला स्वच्छ करण्यात संध्याकाळ निघून जाते. स्वच्छ झाले तोवर रात्र झालेली असते, मग पुन्हा याला उजाडतं. दिवसभरातले सगळे अनुभव एकेक करून समोर मांडून, रडून, भांडून, ते आपला जीव नकोसा करून टाकतं. अंगावर येणारी रात्र मग जास्तच मोठी वाटू लागते.

मी विचार करु लागतो. का लेकाचं आपण सगळ्या जगाचा विचार करत बसतो? आपल्या ताटात काय कमी गाढवं पडलीत काय? तरी हे बेणं दिवसभर हिंडून सगळा कचरा गोळा करून समोर आणून ओततं आणि आपण मग कचरा वेचणाऱ्या बाईसारखं, हातातल्या काटकीने ते चिवडत बसतो.

टिटव्यांचं ओरडणं, कुत्र्यांचं रडणं, ॲम्ब्युलन्सचे कर्कश्श आवाज. आजूबाजूला शांत झोपलेली दुनिया आणि आपलं डोळे टक्क उघडे ठेवून जागत बसणं. आजूबाजूचा अंधार जास्तच दाट होत जातो आणि मी पहाटेची वाट बघत बसतो. तासामागून तास जात राहातात, नको नको ते विचार

मेंदू कुरतडून खात रहातात. बुद्धि हतबुद्ध होते. एव्हाना पहाटेचे साडेतीन, पावणेचार झालेले असतात. कुठूनतरी कावळ्याचा आवाज येतो, ती पहाटेची चाहूल असते. मग थोडया वेळाने साळुंक्या, मग बुलबुल, मग भारव्दाज. आता थोडं फटफटायला लागतं. त्या उजेडाचा आधार वाटायला लागतो.

लोकांचे फिरायला जायचे गजर वाजायला लागले की थकून भागून माझं शरीर झोपून जातं. मनाचं काय? ते नव्या उत्साहाने माझ्या झोपण्याचीच वाट पहात असतं. मी झोपेच्या स्वाधीन झालो की हे परत बाहेर पडतं नव्याने, पण जुनेच उकिरडे फुंकायला. गेलं वर्षभर आपल्या सगळ्यांच हे असंच चाललंय. कुणी सांगतं, कुणी सांगत नाही. ज्या दिवशी हे अरिष्ट टळेल, त्यादिवशी मी आणि आपण सगळेच रात्री दहा वाजल्यानंतर मनाला कुशीत घेऊन घोरत पडलेले असू.



## ३०. युद्धाय कृत निश्चयः

आज गीता जयंती. एखाद्या ग्रंथाची जयंती साजरी करण्याचे हे जगातील एकमेव उदाहरण असावे. हा ग्रंथ निर्माण होऊनही आता जवळपास पाच हजार वर्षे उलटून गेली. या पाच हजार वर्षात अनेक आक्रमकांची आक्रमणे या भरतभूमीने झेलली, परतवली, पचवली याच एकमेव अंतस्थ प्रेरणास्थान होतं गीतेचं तत्वज्ञान.

मूलतः आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे गीता सांगितली गेली युद्धभूमीवर आणि तीसुध्दा हताश झालेल्या अर्जुनाला युद्ध प्रवृत्त करण्यासाठी.

त्याआधी अर्जुनाने श्रीकृष्णाला सांगितलेले सर्व विचार हे आजच्या पुरोगाम्यांच्या आणि निधर्मीवाद्यांच्या तोंडी शोभून दिसणारेच आहेत. म्हणून तर आजकाल घरोघरी दिसणारे गीतासार नावाचे विचार हे असेच सदगुण विकृतीने भरलेले, अकर्मण्यवादी आणि निराशावादी आहेत. अर्जुनाने सांगितलेले विचार ऐकल्यावर श्रीकृष्णाने त्याला, "तू तर एखाद्या प्रज्ञावान विदुषीसारखं निरुपण करतो आहेस की रे" म्हणून त्याची खरडपट्टी काढली आहे. तो सगळा

अध्यायच मुळातून समजून घेण्यासारखा आहे. पण मूळ मुद्दा असा की त्याला युध्दप्रवृत्त करताना श्रीकृष्ण म्हणतात,

हतो वा प्राप्यसि स्वर्गं,
जित्वा वां भोक्षसे महीं।
तस्माद् उत्तिष्ठ कौंतेय,
युध्दाय कृतनिश्चय : ॥

"या युद्धात तू वीरगतीला प्राप्त झालास तर तुला स्वर्गाची प्राप्ती होईल, जिंकलास तर साऱ्या पृथ्वीचे राज्य उपभोगशील. तेव्हा ऊठ आणि युद्धाला तयार हो" असा रोखठोक आणि पुरुषार्थी उपदेश श्रीकृष्णाने केला आहे. श्रीज्ञानेश्वर माऊलींनी याचं वर्णन करताना दुसऱ्या अध्यायात,

हृदयाचे ढिलेपण
एथ निकयासी नव्हे कारण
हे संग्रामी पतन जाण
क्षत्रियांसी ॥२८ ॥ अ . दु . असं अत्यंत मर्म स्पर्शी भाष्य केलं आहे. अलिकडच्या काळात मनोहर कवीश्वरांनी यावरच्या कवितेत म्हटलं आहे,

शस्त्रत्याग तव शत्रुपुढती,

नच शोभे तुजला।
कातर होसी समरी,
मग तूं वीरोत्तम कसला?
घे शस्त्राते सूधीर होऊन,
उमज खऱ्या वेदार्था।
कर्तव्याने घडतो माणूस,
जाणून पुरुषार्था ... असं अत्यंत समर्पक वर्णन केलेलं आहे.

त्यामुळे मुळात भगवद्गीता ही युध्दप्रवृत्त करण्यासाठी केलेला उपदेश आहे हेच आपण अलिकडच्या काळात विसरून गेलो आहोत की काय याची शंका येते? पाच हजार वर्षांपूर्वी झालेले हे युद्ध धर्मयुध्द असले तरी त्याचा कर्ता करविता भगवान श्रीकृष्ण होता. त्यामुळे घातपाताने अभिमन्यूचा वध झाल्यावर, जयद्रथवध, द्रोणवध, कर्णवध आणि नरो वा कुंजरो वा अशी प्रकरणे त्याने घडवून आणली. भीष्म आटोपत नाहीत असं लक्षात आल्यावर आपली प्रतिज्ञा मोडून तो रथचक्र घेऊन त्यांच्या अंगावर धावून गेला.

गेल्या हजार वर्षात आणि प्रामुख्याने स्वातंत्र्यानंतर आपण गीता फक्त पारायणापुरती आणि कोर्टात शपथ घेण्यापुरती मर्यादित करुन ठेवली. त्यामुळे हे अव्दितीय तत्वज्ञान जिथं जन्माला आलं, ती भूमी निधर्मीवाद्यांची आवडती भूमी बनून राहिली. इथला धर्म, इथल्या परंपरा, इथले मानबिंदू हे चेष्टेचा, उपहासाचा विषय बनून राहिले. पण काळ सारखा बदलत असतो. हे तत्वज्ञान जगलेले आणि जागवलेले पुरुषार्थी नेतृत्व राष्ट्राला प्राप्त झाल्यावर, भारत पुन्हा एकदा जगाच्या नकाशावर आपल्या दैवी तेजाने तळपू लागला आहे. पुन्हा युद्धभेरी



वाजताहेत, पुन्हा शंखनाद होत आहेत, पुन्हा शत्रूला कापरे भरते आहे, ही सारी सुचिन्हे नव्हेत काय? खऱ्या अर्थाने गीता जयंती साजरी होते आहे. खरे ना?

चित्रकार : पराग घळसासी.

## ३१.        उगीचंच आपलं सहज.

चला आता थोडंस, पाप करून बघूया ...
धूळ साचलेल्या मनाला,
थोडं साफ करुन बघूया ..........
खूप चांगलं वागून पाहिलं,
आयुष्य काही घडलं नाही,
सुखात ऐषारामात जगणाऱ्याचं,
पुण्यावाचून काही अडलं नाही,
आपल्याला झेपेल तेव्हढी,
चैन आपणही करूया,
चला आता थोडंस पाप करून बघूया ॥

समाजकारण करीत,
सगळं आयुष्य गेलं,
अर्थकारणाचं डबोलं मात्र,
राजकारण्यांनी नेलं,
सतरंज्या घालत काढत,
कार्यकर्ता झालो,
देणग्या, अनुदानं गोळा करीत,

जन्मभर फिरलो,
आता थोडसं आपणही,
राजकारणी नेता बनूया ..
चला, आता थोडंस पाप करुन बघूया ॥

मध्यमवर्गीयाला कसलं आलंय,
पुण्य न् पाप?
उपास तापास अन् कर्मकांड,
हेच आपले आईबाप,
तो ही उभा राहतो मुकुट घालून,
श्रीमंतांच्या देवळात,
झोळीत तुमच्या पडतयं, दुःख, दैन्य, आणि व्याप ताप,
त्यालाही एखाद्या नवसाची,
लाच देऊन बघूया,
चला आता थोडंस पाप करुन बघूया ॥

सत्ययुगाची गोष्ट,
आता झाली शिळी,
कलीयुग आहे हे,
इथे बळी तोच, कान पिळी,
इथे प्रत्येकाला आहे,

स्वैराचाराची मुभा,
जो तो एकमेकाच्या नरडयावर,
पाय देऊन उभा,
आपणही एखादं पाऊल,
बंडखोरीचं टाकूया,
चला, आता थोडंस पाप करून बघूया ॥

अरेरे, काय बोलतोस हे?
जग काय म्हणेल?
जिवंतपणीच आत्मा तुझा,
नरकात जाऊन पडेल.
सरळमार्गाने जगणाऱ्या,
सगळ्यांचेच वांदे,
भ्रष्टाचारी मात्र रोज,
नाकानं सोलतात कांदे,
हातून काहीच घडणार नाहीए,
पण विचार तर करुया,
चला, आता थोडंस पाप करुन बघूया ॥

धूळ साचलेल्या मनाला,
थोडं साफ करुन बघूया ॥

## ३२. कागजों की कश्ती

आज खूप महिन्यांनंतर सकाळी बागेत फिरायला गेलो. थंडी सुरु झाली की लोकांचे व्यायाम सुरू होतात, माझं उलटं आहे. थंडी संपत आली की मी बाहेर पडतो, कारण आमच्याकडे दोनच ऋतु, एक कमी उन्हाळा आणि दुसरा जास्त उन्हाळा. त्यामुळे आम्हाला थंडी सहन होत नाही.

बऱ्यापैकी गारठा होता. फिरणाऱ्यांची संख्याही तुरळक होती. आयपॉड सेट केला, सगळी गाणी रिशफल केली आणि चालायला सुरुवात केली. दिवसाची सुरुवात गुलजारजींच्या गाण्याने झाली.

“ओ माँझी रे, अपना किनारा, नदीयाँ की धारा है ...”

किल्ल्याच्या तटाच्या कडेकडेने जाणारा वॉकिंग ट्रॅक, मी एकटाच तंद्रीत आणि कानावर पडणारं खुशबूमधलं माझं आवडतं गाणं. हल्ली पन्नाशी उलटल्यापासून गाणंसुद्धा हळूहळू अंतरात झिरपत झिरपत ऐकायला छान वाटतं. कधी शब्दांशी खेळता येतं, कधी सूरांबरोबर पळता

येतं. त्यातही गाणारा किशोर असेल तर मग तो चटकन उचलून नव्या दुनियेत नेऊन ठेवतो.

अंतरा सुरु झाला, एका लयीत पावलं पडत होती...

“साहिलों पे बहनेवाले,
कभी सुना तो होगा कहीं
कागजोंकी कश्तियों का
कहीं किनारा होता नहीं
ओ माँझी रे......”

झालं, आमचं मन भैराटलं,

आजूबाजूच्या वावरणाऱ्या जगात अशी शेकड्यांनी माणसं बघायला मिळतात, ज्यांना बघून वाटतं, नेमकं कशासाठी परमेश्वराने यांना जन्माला घातलं असेल? यांच्या आयुष्याचा उद्देश काय? कुठंतरी रस्त्याच्या कडेला, खोपटात, फूटपाथवर, झोपडपट्टीत केवळ दोन वेळ पोटाची खळगी भरण्यासाठी जगत असलेली माणसं पाहिली की वाटतं यांच जगण्यामागचं प्रयोजन काय? का केवळ मागच्या जन्मीचे राहिलेले भोग भोगण्यासाठी परमेश्वराने यांना जन्माला घातलं? या सगळ्या कागज की कश्ती च असतात. जन्मापासून मरेपर्यंत जीवनाच्या प्रवाहात वाहत रहातात.

कागद भिजला, होडी तिरकी झाली, त्यात पाणी भरलं की बुडून जातात. यांच्या नशिबात किनारा नाहीच. गंमत बघा ही अशी मंडळी गरिबातच असतात असं नाही, आयुष्याचं प्रयोजन न समजलेली, कशीतरी उखरवाखर चालणाऱ्या नांगरासारखी, वरवरचं आयुष्य जगणारी श्रीमंत माणसंसुध्दा खूप पहायला मिळतात. यासुध्दा कागदी नावाच. इनका भी कोई किनारा नहीं होता. पण शेवटी किनारा, किनारा म्हणजे तरी काय? कुणाच्या आयुष्याचं सार्थक कशात असावं हे आपण कोण ठरवणार? यातही खूप मतभेद असणार. अर्थात ज्यानं जन्माला घातलं, त्यानं त्याचं उत्तर ठरवूनच जन्माला घातलेलं असतं, पण ते कळेकळेपर्यंत नांव तिरकी होते, त्यात पाणी शिरतं. पुढच्या ओळीत गुलजारजी मात्र त्याचं चपखल उत्तर देऊन टाकतात,

“कोई किनारा, जो किनारे से मिले, वो अपना किनारा है..”

आता याचे किती अर्थ काढता येतील? दुसऱ्याच्या आयुष्याचं कल्याण करण्यातच आपल्या आयुष्याचं सार्थक मानणाऱ्याला पण किनारा गाठणारा म्हणता येईल, आपल्या आयुष्याचं सार्थक ओळखून ते गाठणाऱ्यालापण किनारा गाठणारा म्हणता येईल, पाण्याच्या धारेबरोबर वाहात राहून

म्हणजेच जीवनप्रवाहात वहात राहून आपसूक किनाऱ्याला लागणाऱ्यालापण किनारा गाठणारा म्हणता येईल.

नादानादात चार फेऱ्या मारुन झाल्या. एका बाकावर टेकलो. मनात सहज विचार आला, आपला किनारा कुठला? त्याचं उत्तर पुढच्या कडव्यात होतं,



‘पानीयोमें बह रहे है
कई किनारे छुटे हुए
रास्तोमें मिल गए है
सभी सहारे छुटे हुए
कोई सहारा जो
सहारे सें मिले वो
अपना सहारा है .....
ओ माँझी रे.’

# ३३. सुंदरमठ

झांजांच्या खणखणाटात आरती झाली. गरम गरम भात, आमटी, पोळ्या, कारळाची चटणी, ताक असा महाप्रसाद झाला. सगळी असलेली मंडळी झोपायला निघून गेली. मी आणि सुनिल घळीबाहेरच्या कट्ट्यावर येऊन बसलो. सप्टेंबरचा महिना होता. घळीबाहेरचा धबधबा पूर्ण ताकतीने कोसळत होता. दो बाजूंच्या डोंगरांच्या घळीतून दिसणारे आकाश नक्षत्र चांदण्यांनी झगमगलेले. एका लयीत पाण्याच्या  कोसळण्याचा आवाज येत होता.

एकोणीसशे नव्वद साली आषाढी एकादशीला पहिल्यांदा शिवथरघळीत गेलो होतो. ऐन भरातला पावसाळा, सर्द हवा, धुक्यात हरवलेली घळ, आतलं शांत वातावरण. भारून गेलो होतो. पुढं मग रायगडाच्या वाऱ्या सुरु झाल्या तशा शिवथरघळीच्या खेपाही सुरु झाल्या. तेव्हापासूनची इच्छा होती घळीत मुक्काम करण्याची. तब्बल पंचवीस वर्षांनी योग जुळून आला होता म्हणण्यापेक्षा, समर्थांनी परवानगी दिली होती असं म्हणावं लागेल. सांगोल्यातल्या माता बालक मंदिरातल्या शिक्षकांचा ग्रुप

दुसऱ्या दिवशी रायगडावर पोहोचणार होता म्हणून मी आणि सुनील बिडकर एक दिवस आधी घळीत मुक्कामाला आलो होतो. सकाळी उठून रायगड गाठायचा होता.

एकविसाव्या शतकात, दोन हजार पंधरा साली, इथे एवढी भयाण शांतता आहे तर साडेतीनशे चारशे वर्षांपूर्वी,समर्थ तिथे रहात असताना काय अवस्था असेल? त्यांनी म्हटलंय,

“गर्जती श्वापदे पक्षी,
नाना स्वरे भयंकरे,
गडद होतसे रात्री,
ध्वनी कल्लोळ उठती ..”

साधारण इ. स. १६५४ च्या सुमारास समर्थांनी घळीत दासबोधाच्या लिखाणाला सुरुवात केली, तेथून राज्याभिषेक होईपर्यंत म्हणजे जवळजवळ वीसेक वर्ष तरी समर्थ घळीत रहावयास होते. दासबोधासारख्या अलौकिक ग्रंथाचे ते जन्मस्थान तितकेच अलौकिक. खूप वेळ गप्पा मारत बसलो होतो. पुन्हा पहाटे काकड आरतीला उठायचे म्हणून नाईलाजाने झोपायला गेलो. नेहमीच्या सवयीने सुनील उठला, मग मी ही. थंडगार पाण्याने आंघोळी केल्या,

आवरून काकडयाला येऊन बसलो. शुध्द तुपात भिजवलेला काकडा ( कापसाची मोठी वात ) टाळ, शंख, छान काकडा आरती झाली. साखर घातलेला हा एवढा मोठा लोण्याचा गोळा प्रसाद म्हणून मिळाला. सगळे मिळून आम्ही सताठ जणच होतो.

पुन्हा एकदा घळीत जाउन समर्थ दर्शन घेतले आणि रायगडाची वाट धरली. साधी घळीत मुक्काम करण्याची इच्छा पूर्ण होण्यासाठी पंचवीस वर्ष वाट पहावी लागली. योग यावा लागतो, नव्हे नव्हे आणावा लागतो. काही काही ठिकाणी तर मला असे वाटते की त्या ठिकाणचं बोलावणं आल्याशिवाय जाताच येत नाही. ते उत्तरेकडे म्हणतात ना, बुलावा आना चाहिए, तसं काहीसं. नाहीतरी घळीबाबत समर्थांनीच म्हणून ठेवलयं,

“विश्रांती वाटते तेथे,
जावया पुण्य पाहिजे ..
**जय जय रघुवीर समर्थ.**”



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

## ३४. अगा रायगडीच्या राया

कालपासून शिवजयंतीचा उत्साह नुसता उतू जातोय. करोनाच्या पार्श्वभूमीवर सरकारी बंधने लादली गेल्याने सगळयांचाच थोडा हिरमोड झाला आहे खरा, पण व्यक्त होण्यातली तळमळ लपून राहिली नाही. या सगळ्यात आपल्याला काहीच का वाटत नाही? मनापासून काही उमाळून का येत नाही? या विचाराने दिवसभर अस्वस्थ होतो. आपली भक्ती कमी पडती आहे का? का महाराजांनी आपल्यावरची माया पातळ केली? या विचारांनी डोक्यात गोंधळ उडाला होता.

शांतपणे विचार केल्यावर माझ्या लक्षात आलं, एखादा विषय, एखादी व्यक्ति आपल्या हृदयाच्या जितकी जवळ असते तितकं त्याच्याविषयी व्यक्त होणं अवघड होत जातं. सकाळ-संध्याकाळ, दिवस-रात्र आपण थोडेच आई वडिलांना, पोराबाळांना, माझं तुझ्यावर कित्ती कित्ती प्रेम आहे असं थोडंच सांगत फिरतो?

त्यांच्याविषयीचं प्रेम, जिव्हाळा, आपुलकी ही एक मनाची अवस्था असते आणि ती अखंड असते. त्याचं दर्शन

घ्यायचं असतं, प्रदर्शन मांडायची गरज उरत नाही. तिथे औपचारिकपणाची गरजच रहात नाही. माझं, आपलं श्रीशिवछत्रपतिंबरोबर असलेलं नातं खरं तर असं हृदयस्थ नातं आहे. त्याचं वर्णन शब्दात होणं अशक्य.  श्री तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे,

"प्रेम ना ये दाविता, ना बोलतां, ना सांगता .....
अनुभव चित्ता, चित्त जाणे ....."

परंतु त्यांच्याबरोबर अशा जवळकीच्या नात्यात रहायचं असेल तर आपली पातळी आणि पात्रता दोन्ही सांभाळावी लागते. वारंवार तपासून घ्यावी लागते. हातून प्रत्यक्षरित्या किंवा मनातून अप्रत्यक्षरित्या काही विपरीत घडलं तर त्याची टोचणी मनाला लावून घ्यावी लागते, प्रायश्चित घ्यावं लागतं, तर आणि तरच हे नातं तसं अभंग आणि जिवंत रहातं.

मागच्या महिन्यात असाच इरेला पडून रायगडला जाण्यासाठी बाहेर पडलो. काही ना काही गोष्टी, अशा घडत गेल्या की महाबळेश्वरपासून परत फिरावं लागलं. तिथंच लक्षात आलं, आपली पात्रता कमी पडतीय, गडावरून परवानगी नाही. आता पुन्हा स्वतःला कसाला लावावे

लागणार, पुन्हा आत्मपरिक्षण, पुन्हा आपल्या वागण्याचं परीक्षण ... तर आणि तरच पुन्हा बोलावणं येईल. त्यांच्या मनातल्या पात्रतेला उतरण्यासाठी पुन्हा प्रयत्न करावे लागणार. चला आजच्या दिवसाच्या निमित्ताने एवढी जाणीव झाली तरी पुरे आहे.



## ३५. कारवाँ गुजर गया

दोन हजार वर्ष उलटून गेली. समृध्द भारतवर्षाचा व्यापार समुद्रमार्गे साऱ्या जगाशी चालत असे. पश्चिम किनाऱ्यावरील चेऊल (चौल), श्रीस्थानक (ठाणे), महाहाट (महाड) ही बंदरे व्यापाऱ्यांनी आणि त्यांच्या गलबतांनी गजबजलेली असत. इथे उतरणारा माल लमाणांचे प्रमुख सार्थवाह बैलांवर लादून घाटवाटांनी देशावरच्या जुण्णनगर (जुन्नर), तगर (तेर), प्रतिष्ठान (पैठण) या संपन्न बाजारपेठांपर्यंत पोहोचवत असत. या घाटवाटांचे संरक्षण करण्यासाठी, त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी, सातवाहनांनी दुर्ग बांधले.

पुढं आलेल्या प्रत्येक राजवटींनी, राष्ट्रकूट, कदंब, शिलाहार, भोज, चालुक्य, यादव यांनी त्याच्यात भरच घातली. कळस चढवला छत्रपति शिवरायांनी. स्वतः बांधलेल्या एकशेअकरा किल्ल्यांसह, हजरतीस तीनशेसाठ किले आहेती, एकेक किल्ला एकेक वर्ष लढला तर औरंगजेबाला दख्खन जिंकायला तीनशेसाठ वर्ष लागतील, एवढं त्याचं आयुष्य तरी आहे का? असं महाराज मोठया

अभिमानाने म्हणत, म्हणजे इ.स. पूर्व २५० ते इ. स.१८१८ म्हणजे इंग्रजांनी किल्ले उध्वस्त करेपर्यंत जवळजवळ दोन हजार वर्ष हे दुर्गवैभव महाराष्ट्रात नांदत होतं. विनाशकारी क्षेपणास्त्र घेऊन पहिलं विमान ज्या दिवशी अवकाशात झेपावलं त्याक्षणी किल्ल्यांच सामरिक महत्व संपलं. ते इतिहासजमा झाले आणि मग त्यांच्या वाटेला आली उपेक्षा, अवहेलना, दुर्लक्ष आणि पावित्र्यभंगाची वागणूक.

ज्या दरवाजातून कधी सोन्याचांदीने लादलेले बैल चढले उतरले असतील.

ज्यांच्यासमोर कधी शृंगारलेले हत्ती झुलत असतील, ज्या चिऱ्यांना, ज्या कमानींना कधी छत्रपतिंचा पदस्पर्श झाला असेल त्यांची अवस्था फोटोतल्या कुठल्या एका किल्ल्याच्या दरवाजासारखी झाली. तो प्रतिनिधी आहे, मागं घडून गेलेल्या काळाचा, तो प्रतीक आहे आमच्या उपेक्षेचा. कसाबसा तग धरून राहिलेला त्याचा ढाचा मनात म्हणत असेल का .....?

‘और हम झुके झुके
मोडपर रुके रुके
उम्र के चढाव का

उतार देखते रहे ...
कारवाँ गुजर गया,
गुबार देखते रहे ...' (नीरज )

फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.



## ३६. भय इथले संपत नाही

लस यायला अजून दोन वर्ष लागतील.

लसीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या चाचण्या सुरु.

पंधरा ऑगस्टला पहिली लस लाँच होईल.

घरात मास्क वापरायची गरज नाही.

हा विषाणू हवेतूनही पसरू शकतो.

फेस कव्हरचा काही उपयोग नाही.

शाकाहारी व्यक्तिंना या विषाणूचे भय नाही.

हा सगळा औषध कंपन्यांनी मांडलेला बाजार आहे.

या रोगावर औषधच नाही मग बील साडेआठ लाख रुपये कशाचे?

इथून पुढे लॉक डाऊन नाही.

पंधरा दिवस कडक लॉकडाऊन.

जिल्हाधिकारी कार्यालय सायं ४ वा. आदेश.

जिल्हाधिकारी कार्यालय सायं ६ वा. नवीन सुधारीत आदेश.

जिल्हाधिकारी कार्यालय रात्रौ ८ वा. अति सुधारीत आदेश.

आज उजव्या बाजूची दुकाने उघडी.

आज डाव्या बाजूची दुकाने बंद.

आज सगळंच बंद, फक्त दूध सुरु.

आज फक्त मेडिकल सुरू.

आज फक्त किराणा दोन वाजेपर्यंत सुरु.

संध्याकाळी सात ते सकाळी सात कडक संचारबंदी.

फक्त कारखाने सुरु.

फक्त बँका सुरू.

लॉक डाऊनची कडक अंमलबजावणी, फक्त सब रजिस्ट्रार ऑफिस सुरु.

फक्त दोनच कोर्ट सुरु.

आशिलांनी कोर्टात यायचे नाही.

अत्यंत अति महत्वाची फक्त दोनच प्रकरणे घेणार.

खरेदी विक्रीचे व्यवहार सुरू, परिक्षा घेणार .

परिक्षांना परवानगी नाही.

सरकार परिक्षेसाठी कोर्टात.

जज पॉझिटिव्ह, कोर्ट बंद............. बंद ......... सुरु ....... गुन्हा दाखल ..... सगळं सुरु ......... सगळं बंद.

......????????......????

अति झालं अन हसू आलं, असं झालंय आता सगळं. ते पडोसनमधे मेहमूद विचारतो ना,

“ये क्या रे गोडा, चतुरा, गोडा, चतुरा ... एक पे रहना, या तो गोडा बोलना, या तो चतुरा बोलना .. गा ...”

सगळ्या गोष्टींचं हसं झालंय.

डिझास्टर मॅनेजमेंटचंच डिझास्टर झालय. घरात बसूनही लागण होतीय, बाहेर जाऊनही लागण होतीय .. नक्की काय करायचं?



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

## ३७.		स्वप्नांच काही खरं नसतं

स्वप्नांच काही खरं नसतं,
ती आपली पडत असतात,
आयुष्यातल्या गोष्टी मात्र,
त्याच्या विपरीत घडत असतात ।
	लहानपणची स्वप्नं,
	त्यांचा आधार गरजांचा,
	तिथे नसतो हिशोब मुळी,
	वजाबाकी अन् बेरजांचा ..।
तरुणपणातली स्वप्नं,
उंचच उंच असतात,
ज्यांना शक्य असतं,
ते इंद्रधनुष्याला टांगताता।
	अनुभवांचे चटके मग,
	स्वप्नांना जमिनीवर आणतात,
	परसबागेतल्या फुलझाडांसारखी,
	स्वप्ने मग मातीत रुजतात ।

स्वप्नातले महाल, स्वप्नातल्या माडया,
एखादं दोन बंगले आणि चारचाकी गाडया,
काही स्वप्ने अभंग,
काही मात्र दुभंगतात।

काळाच्या पडद्याआड मग,
आठवण होऊन विसावतात,
येतो दिवस जातो दिवस,
वय सारखे वाढत रहाते।

दिवसेंदिवस स्वप्नांचे,
स्वरूप भीषण होत रहाते,
स्वप्नातले साप, स्वप्नातली भूते,
इच्छा नसताना येत रहातात।

धास्तावलेल्या झोपेचे,
तुकडे करून खात रहातात,
पहाटेचे चांगले स्वप्न,
कधी खरे होत नसते।

अमंगळ स्वप्नांना मात्र,
निमंत्रणाचीही गरज नसते,
काय असतं स्वप्न?

गेलेला भूतकाळ का उद्याचं भविष्य?
स्वप्न पाहण्यात मात्र निघून जातं आयुष्य ।

वर्तमानाचं कधी स्वप्न पडत नाही,
आता याला काय म्हणावं?
रोज घडणाऱ्या आयुष्याला,
प्राक्तनाचं नाव द्यावं ।

स्वप्न तुमचं, स्वप्न माझं,
याचा कधीच बसत नाही मेळ,
ज्याचं त्याचं स्वप्न हा,
ज्याच्या त्याच्या विचारांचा खेळ ।

बाकीच्या स्वप्नांचं होवो काहीही,
एक स्वप्न जिवंत राहू दे,
हे डोळे मिटण्याआधी,
अखंड भारत पुन्हा पाहू दे,
अखंड भारत पुन्हा पाहू दे ॥

## ३८.		फिर वही रात है |

अजून अर्ध्या तासाने राज्य शासनाचा कड्डक्क लॉकडाऊन लागेल आणि एक वर्तुळ पूर्ण होईल. मागच्या वर्षी असाचं लॉकडाऊन लागला आणि स्वच्छंद फिरणारी पाखरे घरात बंद झाली. घरात बंद झाल्याने निदान ती सुरक्षित तरी राहिली. मधल्या काळात पिंजऱ्याचे दरवाजे उघडले, सगळ्यांनी यथेच्छ फिरुन घेतलं आणि तो नकोसा झालेला पाहुणा परत आला. पाखरं परत घरात कोंडली गेली. काही पाखरं घराबाहेर पडलेली, परस्परच देवाघरी गेली. त्यांच्या आठवणी तेव्हढ्या मनात राहिल्या. काही पाखरं धड ना आभाळात, ना धड घरट्यात, अशी रस्त्यावरच तडफडून मेली, मरताहेत, असो. ही त्याचीच, सर्वेश्वराची इच्छा.

आता पुन्हा मागच्या वर्षीचाच, तोच प्रश्न आ वासून उभा राहिला म्हणून मग वरचं गाणं आठवलं. पुन्हा एकदा गुलजार, पंचम आणि किशोर असं भन्नाट कॉम्बिनेशन. आता पुन्हा सुरू होतील त्याच निर्मनुष्य, शांत, भयाण वाटणाऱ्या, न संपणाऱ्या रात्री. पुन्हा गडबडीने उघडया

डोळ्यांसमोर दिसणारी स्वप्ने दाटीवाटीने येऊन उभी राहतील. त्यात या वर्षभरातील अनेक कडू गोड ( गोड कमीच, असलेच तर टेन्शनने वाढलेल्या शुगरचे ) आठवणींचे किस्से असतील.

कुणीतरी आठवणीने काढलेल्या आठवणी, कुणीतरी जाणीवपूर्वक केलेलं विस्मरण, कुणीतरी काळजीने केलेला फोन, रात्री उशिरापर्यंत शांत झोपलेल्या मुलांकडे बघून त्यांच्या भविष्याची आणि आपल्या अस्तित्वाची केलेली चिंता, थोरामोठ्यांची केलेली काळजी, काहींचे अंतर्धान पावलेले आशीर्वाद. काय काय नी काय काय? येणाऱ्या या शांत रात्री आणि इकडं रांग लागलेली स्वप्नं दिसतात तेव्हा वाटतं क्षणभर तरी डोळे मिटायला मिळणार की नाही? या स्वप्नांचं स्वरूप पाहिलं की या गाण्याचं गुलजारांनी लिहीलेलं दुसरं कडवं आठवतं, जाणवतं, भावतं,

“काँच के ख्वाब है,
आँखो में चुभ जायेंगे ...
पलकोमें लेना इन्हें,
आँखोमें रुक जायेंगे ...
ये रात है ख्वाबकी,

ख्वाबकी रात है ....”

बस भाई, अब इतनाही तय करना है के कौन से ख्वाबोंको पलकोमें लेना है और किन्हे भूल जाना है? और जब ये सपनों का कारवाँ चलेगा तब नींद कहीं गुम हो गयी होगी, हो सकता है हम भी कहीं गुम हो गये हो. तो बस इतना करना है के अपने दिलको इस गाने के पहले अंतरे की याद दिला के रखना है,

“मासूम सी नींद में
जब कोई सपना ( अपना ) चलें
हमकों बुला लेना तुम
पलकोंके परदे तले ....
ये रात है ख्वाबकी ..
ख्वाबकी रात है ...
फिर वहीं रात हैं ....”



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

# ३९. स्पेस

आमच्या कायद्याच्या भाषेत सॉलिटरी कनफाईनमेंट नावाची शिक्षा असते. थोडक्यात म्हणजे एकांतवासाची शिक्षा. एखाद्या गुन्हेगाराला सर्वांपासून वेगळे एकटे ठेवले जाते. तिथे त्याला भिंतीशिवाय काही दिसत नाही, काही ऐकू येत नाही. प्राणी नाही, पक्षी नाही, झाडे नाही, माणूस तर नाहीच नाही. जेवढा काळ मनाची ताकद तग धरू शकते, तेव्हढा काळ संपला की माणूस वेडा होतो, नाहीतर सरेंडर होतो, शरण येतो, कबूली जबाब देतो.

नेमकी याच्या उलट शिक्षा सध्या निसर्गाने माणसाला दिलेली आहे. घरात राहण्याची, आपल्या म्हणवणाऱ्या माणसांत राहण्याची. तुम्ही म्हणाल याला शिक्षा कसे म्हणता येईल? पण हाच मुद्दा जरा आपल्या मनाशी पडताळून पहा. मग समजेल, मी याला शिक्षा का म्हणतोय ते! गेले सहा साडेसहा महिने आपण खऱ्या अर्थाने, मोकळेपणाने घराबाहेर पडलोच नाही. मित्र नाही, प्रवास नाही, नातेवाईक नाही आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे निसर्गाशी खरा संपर्क नाही.

त्यामुळे घराघरातली शांतता आता संपत चालली आहे. काहीही झाले तरी प्रत्येक माणसाची स्वतःची अशी एक स्पेस असते, ऑरा असतो, त्याच्या परिघात अन्य कुणीही, होय कुणीही, अगदी आई वडील, पत्नी / पती, मुले, मुली कुणीही आलेले त्याला खपत नाही. तिथे सर्वस्वी अहंकाराचे साम्राज्य असते. गेले सहा महिने प्रत्येकाची ही स्पेस डिस्टर्ब झालेली आहे. कायम अंगावर अंगावर, पायात पायात येणारं मूल असलं तर आईसुद्धा चिडते म्हणते," मेल्या, जरा सुटा हो की".

इतर वेळी आपण आपल्या कामाच्या निमित्ताने, व्यवसायाच्या निमित्ताने, अन्य कारणांनी दिवसातले आठ दहा तास तरी घराबाहेर असतो, त्याला जोडून झोपेतले आठ तास मोजले तर कसेबसे सहा आठ तास आपण घरच्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात असतो. त्यामुळे घरातून जाताना, बाहेरून आल्यावर, “लव्ह यू डॅड, लव्ह यू मॉम” म्हणून गळ्यात पडले जाते. गेले सहा महिने सगळेच घरात एकत्र असल्याने हे आपुलकीचे, मायेचे, काळजीचे  पापुद्रे किती वरवरचे, तकलादू आणि नाटकी होते हे आता सगळ्यांनाच कळून चुकलंय. त्यामुळेच एखाद्या रंग दिलेल्या

वस्तूवर ओरखडा उठला की जसे त्याचे खरे स्वरूप बाहेर येते, तसे घरातल्या सगळ्यांची खरी स्वरूपे बाहेर येऊ लागली आहेत.

एकमेकांना न आवडणाऱ्या, न रुचणाऱ्या किती गोष्टी आपल्या आणि आपल्या घरच्यांच्या स्वभावात आहेत याचे यथार्थ दर्शन सध्या प्रत्येकाला घडते आहे. हे तुम्ही मान्य करा अथवा करु नका पण ही वस्तुस्थिती आहे. अडचणीच्या, संकटाच्या काळात, आजारपणात आपण किती एकटे असतो हे या एकत्र राहाण्याने सिध्द केलं आहे. घराघरातला संवाद संपला आहे. विसंवाद वाढतो आहे. अपेक्षा वाढताहेत, आवाज चढताहेत, शरीराने एकत्र असलेली माणसे, मनाने मात्र दूर दूर जात आहेत, गेली आहेत.

एक निसर्गच  एकमेव असा असतो जो आपल्यावर निरपेक्ष प्रेम करतो. त्याला फक्त देणे ठाऊक आहे, घेणे नाही. झाडांची पालवी, फुलांचे ताटवे, गवतांचे शेले, धुक्याची चादर, पावसाच्या थेबांचं नर्तन, धबधब्यांचं कोसळणं, सागराची गाज, वेगवेगळ्या ऋतूंमधला वेगवेगळा साज, सगळं सगळं तो आपल्यासाठी घेऊन येतो आणि मुक्त

हस्ताने वाटतो कोणत्याही मोबदल्याशिवाय. त्या पार्श्वभूमीवर, गेल्या सहा महिन्यातले माणसांचे अनुभव तपासून पहा.

'स्पेस' चा मराठी अर्थ आहे जागा! या करोनाच्या निमित्ताने निसर्गाने माणसाला त्याची जागा दाखवून दिली आहे नपेक्षा या सृष्टीत तुला कुठलीही जागा नाही, तुझ्याशिवाय ही सृष्टी परिपूर्ण, सुंदर आणि आश्वस्त आहे हेच जणू निसर्गाने आपल्याला दाखवून दिले आहे. आपण मात्र अजूनही पूर्वीच्याच तोऱ्यात, मस्तीत, माजात जगण्याचं नाटक करतो आहोत. एकटे आहोत तरी एकत्र असल्याचं नाटक करतो आहोत. गरज आहे ती निसर्गाने दिलेली शिक्षा ओळखून सरेंडर होण्याची, कबूली जबाब देण्याची! की होय, आम्ही तुझ्याशिवाय अपूर्ण आणि अर्थहीन आहोत. तसे झाले तर तो कदाचित आपली स्पेस आपल्याला परत देईल, नाहीतर आपली जागा स्पेसमधे.( ढगात!)

## ४०. आप यूँ फासलों से गुजरते रहे..... |

परवा रात्री लता मंगेशकरांच्या वाढदिवसादिवशी सारेगम कारवाँ ऐकत पडलो होतो. गायकाचा आवाज, गाण्याची चाल, संगीत यासोबतच मला त्या गाण्याचे शब्द आणि त्याचा अर्थ शोधत गाणं ऐकायला आवडतं. हे गाणं सुरु झालं आणि विचारांची एक नवी मालिकाच डोक्यात सुरू झाली. दैनंदिन आयुष्यात आपण कितीतरी आवडीच्या गोष्टी रूटीन म्हणून करत असतो. मित्र मैत्रिणीच्या भेटी, गप्पा, सुख दुःखाचे शेअरींग, प्रवास, ट्रेकिंग, हॉटेलिंग त्यातही एखाद्या हॉटेलातला आवडणारा एखादा विशिष्ट पदार्थ, ठराविक दिवशी ठराविक देवळात जाणं, आपल्या आवडीची ठिकाणं, एक ना अनेक.

रोजच्या धबडग्यात या सगळ्या गोष्टी अनायास घडून येतात. त्याची विशेष दखल घेतली जात नाही. सध्या मात्र या सगळ्याच गोष्टींवरती बंधने आल्यामुळे या गोष्टींच्या आठवणी ठळकपणे होत आहेत. त्यांचा अभाव जाणवतो आहे. या गोष्टींच आपल्या आयुष्यातलं महत्व ठळकपणे अधोरेखित होत आहे. रात्री अंथरूणावर पडलं की या

गोष्टींची मालिकाच डोळ्यासमोर सुरु होते, एकेक व्यक्ती, एकेक आठवण, एकेक ठिकाण, एकेक पदार्थ, एकेक सवय अशी डोळ्यासमोरून तरळत जाते. सध्या त्यांच्यात आणि आपल्यात असलेलं अंतर मनाला अस्वस्थ करतं,

त्या सगळ्या गोष्टी आपल्या भावविश्वाशी किती जवळच्या, किती महत्वाच्या होत्या हे नव्यानं आणि प्रकर्षानं जाणवत रहातं. आणि मग त्या रात्री मला या गाण्याचा एक नवीन अर्थ उलगडत गेला. या सगळ्या गोष्टी माझ्या डोळ्यासमोरुन अप्रत्यक्षपणे तरळत गेल्या तरी त्याचा प्रतिसाद, त्याची ओढ अंतःकरणातून प्रत्ययाला येत होती, जाणवत होती, अस्वस्थ करीत होती, कानावर शब्द पडतच होते ..

“आप यूँ फासलोंसे गुजरते रहे
दिलसे कदमोंकी आवाज
आती रही ...
आहटों के अंधेरे चमकते रहे
रात आती रही, रात जाती रही”

## ४१. मेरा साया साथ होगा |

**परमआदरणीय, श्रध्देय लतादीदी, विनम्रतापूर्वक चरणस्पर्श ....**

सगळं जग आज आपला एक्क्याण्णव्वा वाढदिवस साजरा करीत आहे. आपल्या अब्जावधी चाहत्यांपैकी मीपण साधा चाहता. आपल्या गाण्यांविषयी म्या पामराने काय बोलावे? हे म्हणजे रस्त्यावरच्या खापराच्या एकतारीने सरस्वतीच्या हातातील रुद्रवीणेविषयी बोलण्यासारखे होईल म्हणून मी ते धाडस करणार नाही. पण आपला स्वर नसता तर आयुष्यातल्या अनेक उदास, एकटेपणाच्या क्षणी, माऊलींच्या मायेने, तुकोबांच्या आर्ततेने आणि आईच्या प्रेमाने कोणी आमची समजूत काढली असती? संभवामि युगे युगे, या श्रीकृष्णाच्या वचनाइतकंच, तू जहाँ जहाँ चलेगा, मेरा साया ( स्वर ) साथ होगा । हे आपण आम्हाला दिलेलं वचन आहे. हे वचनच आम्हा करोडो भारतवासियांची सावली आणि उमेद बनून राहिले आहे.

इ. स. एकोणीसशे पंच्याण्णव साली बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या पंचाहत्तरीच्या कार्यक्रमात आपण केलेले अभ्यासपूर्ण भाषण हा आपल्या व्यक्तिमत्वाचा एक वेगळाच पैलू होता.

इ. स. एकोणीसशे सत्त्याण्णव साली अमेरिकेतील बॉस्टनच्या बृहन महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात समारोपाच्या कार्यक्रमात सादर होणाऱ्या 'जाणता राजा' या महानाटयातला शाहीर मी सादर करत असताना, आशाताईंव्यतिरिक्त तुमच्यासकट सगळे मंगेशकर कुटुंब समोर बसलेले होते. प्रयोग संपल्यानंतर मा. बाबासाहेबांनी आपल्याला माझी ओळख करून दिली," हे आमचे शाहीर!" त्यावेळी त्या जगद्विख्यात कंठातून कौतुकाचे स्वर बाहेर पडले,

"तुम्ही खूप छान नाचता ....."

माझ्यासारख्या सामान्य कलाकाराला आयुष्यात आणखी काय हवे असते? आपल्याशेजारी दोन मिनीटं उभे राहता आले, आपल्याकडून कौतुकाचे चार शब्द ऐकायला मिळाले, आयुष्याचे सार्थक झाले.

आज तुमचा वाढदिवस, पुढच्या वर्षी आपण मा. बाबासाहेबांचा शतकपूर्ती सोहळा साजरा करणार आहोत त्या वेळेस तुम्ही हजर असणारच, पण नऊ वर्षानी जेव्हा तुमची शतकपूर्ती सारं जग साजरं करेल, त्या वेळेस मा. बाबासाहेब पण त्या कार्यक्रमात आपल्याला हवे असणार याविषयी आमच्या मनात खात्री आहे. आपणां दोघांना जगदंबेने उदंड आयुष्य आणि आरोग्य प्रदान करावे हीच प्रार्थना.



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

## ४२. करुणाष्टके

मध्यरात्रीनंतर कधीतरी पाऊस सुरु झाला असावा. ढग येतील तसतशी सर पडून जात होती. जागा नवीन असल्याने झोप येतच नव्हती. सर आली की पत्र्यावर वाजायची, मग पागोळ्यांचा आवाज. मी उगीचच त्यात मन गुंतवून लोळत पडलो होतो. एका बाजूला बाबासाहेब झोपले होते. त्यांची झोप मोडायला नको म्हणून तसाच पडून होतो. १९८८ चा जुलै महिना,

'जाणता राजा' मधल्या सगळ्या कलाकारांना बाबासाहेब सहलीसाठी सज्जनगडला घेऊन आले होते. मंदिराशेजारच्या ओवरीतल्या एका खोलीत मी, बाबासाहेब, प्रतापराव आणि आणखीन दोन चार जणांची व्यवस्था होती. घडयाळ्यात पाहिलं तर पावणेपाच झाले होते, झोप उडालीच होती. हळूच उठून खोलीच्या बाहेर आलो. पाऊस येत जात होता. समोरच्या खांबावर असलेल्या दिव्याच्या पिवळसर प्रकाशात मंदिराचा परिसर काही वेगळाच भासत होता.

एवढयात, उजव्या बाजूच्या कोपऱ्यातून एक गोरापान दाढीधारी रामदासी खांद्यावर भली मोठी घागर घेऊन उच्चरवाने मनाचे श्लोक म्हणत देवळात गेला. मी ओढल्यासारखा त्याच्यामागे गेलो. समर्थांच्या समाधीवरची वस्त्रे काढून त्याची पूजेची तयारी सुरु होती. सगळं पहात नुस्ता बसून होतो. काय आखीव रेखीव आयुष्य होतं समर्थांच! पहिली बारा वर्ष घरी जांबेस वास्तव्य, भरपूर खोडया, दंगामस्ती, मग मांडवातून पलायन. पुढची बारा वर्षे टाकळीला गायत्रीच पुरश्चरण, त्यानंतरची बारा वर्ष संपूर्ण भारतभर पायी भ्रमण.

महाबली हनुमंताच्या आज्ञेनुसार दक्षिणेस महाराष्ट्रात शक्तिची उपासना. निर्माण होऊ घातलेल्या स्वराज्यासाठी समाजाची मानसिक आणि शारीरिक तयारी, त्या स्वराज्यासाठी निर्माण केलेलं भगवंताच अधिष्ठान, शिवथरसारख्या एकांतस्थळी वास्तव्य, दासबोधाची रचना. शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकानंतर सज्जनगडावर केलेले वास्तव्य. केवढया विपुल साहित्याची निर्मिती, हा माणूस काळाच्या पुढे तीनशे वर्ष पहात होता म्हणून तर आजही दासबोधातले सर्व सामाजिक आणि राजकीय संदर्भ

आजच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीशी तंतोतंत जुळतात.

या पार्श्वभूमीवर कसे जगतो आपण? गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास. काही नेम नाही, व्रत नाही, ध्यान नाही, जप नाही, घंटीच्या आवाजाने भानावर आलो. आरती सुरू झाली होती.

आजसुद्धा मागं वळून पहाताना वाटतं, समर्थांनी करुणाष्टके आपल्यासाठीच लिहीलीत.

'चपळपण मनाचे मोडिता मोडवेना,
सकळ स्वजनमाया सोडिता सोडवेना.
घडी घडी बिघडे हा निश्चयो अंतरीचा,
म्हणवूनी करुणा हे बोलतो दीन वाचा' ..




फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

## ४३. सरत्या वर्षाचा हिशोब.

जरी जानेवारी ते डिसेंबर ही कालगणना आपली नसली तरी सारं जग हीच कालगणना मानते म्हणून या वर्षाच्या सरत्या दिवसात हा थोडासा गेल्या वर्षाचा मागोवा. खरे तर वर्षाची सुरुवात इतर वर्षासारखी उत्साहातच झाली होती. पण याच्या पोटात काय भयंकर दडले होते हे कुणास ठाऊक होते? वर्षाच्या सुरुवाती सुरुवातीला काही जणांची भाकितं यायला सुरुवात झाली होती पण नेहमीप्रमाणेच सगळ्यांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं.

मार्चपासून सगळं जग ज्या संकटात वेढलं गेलं तो वेढा आत्ता कुठे थोडा सैल होताना दिसतोय. मधल्या काळात अनेक घटना घडल्या. ज्याच्या नोंदी ठेवणेसुद्धा अवघड झाले आहे. कुठले कुठले ग्रह कुठल्या कुठल्या ग्रहांना भेटले, कोण कुणाच्या घरात राहून गेले यापेक्षा यांनी सगळ्यांनी मिळून किती जणांना बेघर केले हा हिशोब भयंकर आहे. लॉकडाऊन झाले, माणसं घरात कोंडली गेली, पशुपक्षी निर्भयपणे हिंडू लागले, वातावरणाची हानी भरून निघाली, निसर्गाचा ढळलेला समतोल काहीसा

साधला गेला पण माणसाचा ढळलेला तोल काही सावरायची चिन्हे नाहीत.

कुणाला आयती ताटे वाढून मिळाली, कुणाला भरल्या ताटावरून उठवले गेले, कुणाच्या तोंडचे घास पळवले गेले, कुणाच्या मुखी अनायासे चार घास भरवले गेले. ज्यांच्या घरची माणसे या महामारीत हकनाक दगावली त्यांच्या दुःखाचा हिशोब कोण ठेवणार? स्वतःला आणि घरच्यांना सांभाळता सांभाळता अनेकांच्या नाकी नऊ आले. नियतीने हे सारे का घडवून आणले याचे उत्तर कधीच मिळणार नाही कारण नियतीच्या दृष्टिकोनातून हा एक नेहमीचा खेळ होता. प्रश्न एवढाच आहे की आपण याच्यातून काय शिकलो? ज्यांनी मृत्यू जवळून पाहिला, त्यांना जीवनाचे महत्व पटले का? ज्यांनी भूक जवळून अनुभवली, त्यांना जेवणाचे महत्व पटले का? जे कायम मस्तीत जगले, त्यांना माणुसकीची ओळख पटली का? प्रेम, आपुलकी, समाधान, मदत, समजूतदारपणा, कारुण्य, संवेदना, सहवेदना या शब्दांची खरी ओळख आपल्याला पटली का?

जी मंडळी याही काळात अहंकाराला धरून पाशवी वृत्तीने वागत राहिली, त्यांच्या नीचपणाचे हिशोब नियती त्यांच्या पदरात घालेल अशी आशा करुया.

एक गोष्ट मात्र नक्की की या विश्वात कोणतीही गोष्ट अकारण कधीच घडत नाही. प्रत्येक घटनेची एक कारणमीमांसा असते, कार्यकारण भाव असतो, कुणीतरी निमित्त होतो आणि हे स्थित्यंतर घडून येते. असं एक नियतीचं स्थित्यंतर आपल्याला अनुभवायला मिळालं पण खरा प्रश्न शिल्लक उरतोच तो म्हणजे आपण यातून काय शिकलो?



याचं उत्तर सकारात्मक आणि विधायक असेल तर आपण उत्तीर्ण झालो आणि नकारात्मक आणि विघातक असेल तर मात्र आपण अशाच विनाशकारी घटनांना आमंत्रण देत रहाणार एवढं नक्की.

## ४४.        नई सुबह

नई सुबह की नई किरने
हरेहरे पात, फूट पड़े झरने ॥
हो रहा सारे दुखों का अंत
उग आई, नई आशाएँ अनंत ॥
फैली धूप हुआ उजियारा
तम विनाश का रोशनी से हारा ॥
खग उड़ान भर घर से निकले
टूटे बंधन ताले निकले ॥
पकडकर एक दूसरे का हाथ
चलना है अब तो साथ साथ ॥
परमात्मा की पूर्ण हुई परीक्षा
मानव ने ली मानवता की दिक्षा॥
नए साल की नई दृष्टि
माता अपनी है यह सृष्टि ॥
मन में रखकर यहीं आत्मभान
करना है हर प्राणी का सम्मान ॥
तभी जिवीत हम रह पाएँगे

काले बादल छट् जायेंगे ॥

सुख की वर्षा, संतोष का सपना

यहीं होगा फिर जीवन अपना ॥



# ४५. एकाकी

इ. स. २०१६ सालचा सप्टेंबर महिना. माझ्या मित्राने नळदुर्गचा किल्ला दत्तक घेऊन दोन वर्ष झाली होती. दोन वर्षात खूप सुधारणा झाल्या होत्या. दोनअडीच कोटी रुपये खर्च झाले होते. ते सगळे पाहात आम्ही किल्ल्यात हिंडत होतो. किल्ल्यावर किल्लेदाराचा एक मोठा वाडा आहे, समोर कारंजे, चारही बाजूला चार दरवाजे असं सगळं वैभवशाली पण आत्ता उध्वस्त झालेलं बांधकाम पाहात फिरत होतो.

अचानक वाडयाच्या या दरवाजासमोर आलो आणि थबकलो. किती राजवटी पाहिल्या या दरवाजाने? बाराव्या शतकातील यादवांच्या, पंधराव्या शतकातील बहामनींच्या, नंतरच्या काळातील इंग्रजांची राजवट. मधला काही काळ निजामशहाचा एक मोठा सरदार साबाजी अनंत इथे वास्तव्यास होता. कोणी कोणी या दरवाजाचा वापर केला असेल? प्रचंड पसरलेल्या किल्ल्यावर हा दरवाजा एका बाजूला आहे. दरवाजासमोरही काही नाही आणि मागचा वाडयाचा संबंध तुटलेला. इतिहास हरवलेल्या आणि

भविष्याची वाट चुकलेल्या हतभागी वर्तमानासारखं, त्याचं एकाकी अस्तित्व पाहून खूप खिन्न वाटलं. जेव्हा जेव्हा मी किल्ले फिरतो, तेव्हा तेव्हा जुन्या वैभवशाली इमारतींपेक्षा या अशा एकाकी, दुर्लक्षित इमारती माझ्याशी जास्त जवळीक साधतात.

त्यांचा वर्तमानातला दोस्त व्हायला मला आवडतं. इतिहासाचा विद्यार्थी असल्यामुळे, इतरांपेक्षा थोडं काळाच्या मागं जाऊन मला पाहता येतं. त्यात मग अनेक घटना, अनेक व्यक्तिमत्व दिसू लागतात. कधी जय दिसतो, कधी पराजय. कधी बांधकामं दिसतात, कधी त्या वास्तूत रंगलेल्या मैफिली दिसतात. कधी त्या राजाची मिरवणूक दिसते, कधी एखाद्या सज्जातून सारंगीचे सूर ऐकू येतात, कुठे तबल्याची थाप ऐकू येते, कुठे घुंगरांची किणकिण ऐकू येते. माझ्या मनाला वाटतं, माझ्या अभ्यासामुळे, माझ्या इतिहासाच्या प्रेमाखातर मी हे माझ्या मनःचक्षूंसमोर उभं करु शकतो. पण ज्यांनी हे प्रत्यक्ष पाहिलं, अनुभवलं, सोसलं, भोगलं, त्या या एकाकी इमारती जर तो इतिहास सांगू लागल्या तर ...? असो, इतिहासात जर तरला काही

स्थान नाही. पण प्रत्येक किल्ल्यावर अशी एखादी इमारत असते, जी मला निशब्द करुन सोडते.



## ४६. आहट

क्या कोई गुजरा यहाँ से? इक आहटसी सुनाई पड़ी. बरसों गुजर गए यहाँ से किसी की परछाई गुजरे हुए. दरवाजा हमेशा बंद रहा करता था. घर की दुल्हन नीचे नदीपर पानी लेने जाया करती थी. दरवाजे के बाहर दो पहरी खड़े रहते थे. पूनम की रात घर की बहु बेटियाँ नीचे नदीपर घुमने जाया करती थी. उस वक्त कडा पहारा रहता था. मर्दों का इर्द गिर्द घूमना भी मना था. आज ये दरवाजा खूला छोडे सौ साल बीत गए. आज ना तो किसी की पायल छनकती, ना किसी का घुँघट सवरता है, ना किसी की चूडी झनकती है और ना किसी की गागर छलकती है. राह तक तक के ये सिढ़ियाँ भी पत्थर हो गयी.

पासवाले पेड़की टहनियॉं भी झुक झुक के अंदर झांकती है कि शायद कोई आयेगा. समय कटता नही मगर बीतता चला जाता है, अब तो आदत सी हो गयी है. दिनभर इन पत्तों की परछाईयोंसे खेलता हूँ और रातभर तनहाईयों से. कुछ हवासी गुजरी, कुछ सन्नाटा टूटा, इस लिए ऐसा लगा कि शायद यहाँ से कोई गुजरा.

इस लिए पूछा कि क्या कोई यहाँ से गुजरा? वक्त ही होगा शायद, उस के सिवा यहाँ से ऐसे बेवक्त कौन गुजरता है .....?



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

# ४७.        तिन्हीसांजा

रात्री उशीरापर्यंत गप्पांचा फड जमलेला असायचा. पहाटेचा गारठा सुटला की देवळात जाऊन, कोपरा धरून अंग टाकून द्यायचं ही नेहमीची सवय. पुन्हा सकाळपासून मित्रांबरोबर भटकंती सुरू. दहा साडेदहापासून उन्हाचा कडाका जाणवायला लागायचा. सगळं भगभगीत दिसू लागायचं. मित्रांची फोटोग्राफी आवरलेली असायची. कुणाच्यातरी झोपडीत तांदळाची भाकरी, बटाट्याचा रस्सा पोटात ढकलायचा आणि गप्प पुन्हा देवळाचा कोपरा धरून पडून रहायचं. बाहेर उन्ह लहालहा करत असायचं. झळा आतपर्यंत जाणवायच्या. डोळे मिटून पडून रहायचं. मधूनच कुणीतरी किल्ला पहायला आलेलं, एखादं दुकटं माणूस येऊन दर्शन घेऊन जाई. पडल्या पडल्या देवळाच्या दरवाज्यातून बाहेरचं दिसणारं चित्र, मेंदूवर स्पष्ट उमटायचं. त्या मोकळ्या जागेतून दिसणारं आकाश, झाडांच्या फांद्या, एखाद्या दगडातून कोरलेल्या चित्रासारख्या दिसायच्या.

चार साडेचारनंतर उन्हं मवारायची. दुपारच्या झळा मंद व्हायच्या. अडचणीला, सावलीला बसलेली पाखरं उडू लागायची. घराच्या ओढीनं थवेच्या थवे इकडून तिकडे जायचे. बाहेर येऊन बघावं तर भिंतीचा, तटाचा, पायाखालचा खडक न खडक तापलेला असायचा. तोंडावर

पाणी मारून एकदा उजव्या हातांच्या झोपडयांच्या दिशेने हाक मारायची. वसंता तांब्यात चहा घेऊन येईपर्यंत शिवसमाधीच्या डाव्या हाताच्या पायऱ्यांवर फतकल मारून बसायचं. सकाळी या दिशेला खेळली गेलेली आकाशातली रंगपंचमी आता पश्चिमेकडे टकमकाकडे सुरु झालेली असायची. पितळीतून चहा घ्यायचा अन चटचट पावलं उचलीत बाजारपेठ गाठायची.

कुठल्याशा दुकानाची भक्कम भिंत चढून बसून रहायचं. तो देवाघरचा चित्रकार भराभरा फटकारे मारत आकाशाचा मंडप रंगवायला घ्यायचा. क्षणाक्षणाला रंग बदलायचे. दोन डोळयात ते सारं सामावून घेता घेता पुरेवाट व्हायची. तो अस्ताला जाणारा सूर्य पाहताना भान हरपायला व्हायचं. कानावर अप्पांच्या मनीचं वाक्य ऐकू यायचं, "आप्पा नारायेन किती ग्वाड दिसतो न्हाई ......" हळूहळू ती सोन्याची लगड डोंगराआड दडून जायची. आकाशभर रंगांचे फटकारे उठलेले असायचे. अस्ताला जाणारी चुकार किरणं डोंगराआड दडून जायची. तिकडं जगदीश्वरात आणि राजसभेत एका सुरात बडवलेल्या नगाऱ्याचे आवाज ऐकू यायचे. चपला खरडत खरडत वसंताची झोपडी गाठायची. त्याची आई तिन्हीसांजेचा तुळशीपाशी दिवा लावून जाई. त्याचा उजेड आमच्या चेहऱ्यावर पडायचा. नकळत हात जोडले जायचे.

# ४८.	विनवणी

३४१ वर्ष झाली महाराज, तुम्ही देह ठेवून. पण आजही आठवण आली तरी घशात आवंढा दाटून येतो. आत्ता जिवंत असलेल्या कुणीही तुम्हाला पाहिलं नाही, अनुभवलं नाही. शिवरायाचे कैसे बोलणे, शिवरायाचे कैसे चालणे हे आम्हाला कसे ठाऊक असणार? मग असा कोणता चिवट धागा तुमच्या आमच्यात होता, जो जवळजवळ साडेतीनशे वर्ष न तूटता दिवसेंदिवस त्याचा पीळ घट्ट होत गेला. या महाराष्ट्राच्या मातीत जन्मणाऱ्या प्रत्येकाला तुमची एवढी ओढ का?

का आम्हाला असं वाटतं की तुम्ही राज्याभिषिक्त छत्रपति असूनही आम्हाला घरच्या वडीलधाऱ्या माणसांसारखे वाटता? का आयुष्यातलं प्रत्येक सुख, प्रत्येक दुःख तुमच्यासमोर येऊन सांगावं वाटतं? का समाधीसमोर हात जोडून उभं राहिलं की डोळ्यातून धारा सुरु होतात? मन हलकं वाटतं. का त्या समाधीच्या फरशीवर बसलं की आईच्या कुशीत बसल्यासारखं वाटतं? पूर्वी तर वर्षातून चार चार वेळेला यायचो, आता दोन वर्ष होऊन गेली, जीव कसा

कासावीस होतोय काय सांगू? दशावतारातला श्रीकृष्ण हा पूर्णावतार होता, त्याला आदर्श मानणारे तुम्ही, आमच्या दृष्टीने दहावे अवतारच होता आणि आहात.

अयोध्या, काशी, मथुरा मुक्त करण्याचं स्वप्न उराशी बाळगून आयुष्याची अवधी झाल्याने आपण एका चिरंजीवाच्या जन्मदिनी देहत्याग करून चिरंजीव झालात. पण तुमचं कर्तृत्व, तुमचं अस्तित्व, तुमचं ममत्व सारं सारं अजूनही आमच्या प्रत्ययाला येतयं, नव्हे नव्हे ती आमची वडिलार्जित संपत्ती आहे. ती वाढवण्याचा, ती जपण्याचा, तिचे वारस होण्याच्या पात्रतेचे आम्ही होऊ एवढाच आशीर्वाद द्या आणि लवकरात लवकर माहेरी बोलावून घ्या. सध्याच्या वातावरणात तुमच्या समाधीचा स्पर्शच फक्त जगण्याची, टिकून रहाण्याची प्रेरणा देऊ शकतो.

# ४९. वो शाम कुछ अजीब थी |

काही गोष्टींचे अर्थ कळायला काही काळ जाण्याची गरज असते. आम्ही कॉलेजला असताना खामोशीच्या गाण्यांची क्रेझ होती.

“हमने देखी है, इन आँखोकी महकती खूशबू ....
तुम पुकार लो, तुम्हारा इंतजार है ...
वो शाम कुछ अजीब थी ....”

मुळातच गुलजारसाहेबांचं थोडसं गूढ अर्थगर्भ काव्य, अत्यंत सुंदर कथा, धर्मेंद्र, वहिदा रेहमान, राजेश खन्नाचा अभिनय असं एक छान जमून आलेलं प्रकरण होतं ते. असो, मला सिनेमावर लिहायचं नाहीए. त्यातली गाणी हा माझा वीक पॉईंट होता. त्यातही 'वो शाम, कुछ अजीब थी' हे गाणं त्यावेळेस पूर्णपणे उमजलं नव्हतं. पहिल्या कडव्यात पूर्णपणे भूतकाळ आणि बहुतांशी तेच शब्द वापरून पुढच्या कडव्यात वर्तमानकाळ, गुलजारांनी ज्या ताकतीने लिहलाय त्याला तोड नाही. सिनेमात गाणं येतं, तेव्हाही त्याचे संदर्भ लागत नाहीत, संदर्भ लागतात सिनेमा संपताना आणि त्या नायिके तकेच आपणही शॉकमधे जातो. पण त्या उमलत्या

वयात त्या शॉकचा धक्का जेवढा बसत नाही किंवा बसला नाही किंवा समजला नाही म्हणू हवं तर तेवढा तो आत्ता पन्नाशी उलटल्यानंतर बसतो किंवा समजतो.

त्याकाळची काही स्वप्नं, काही इच्छा, काही व्यक्ति यांच्याबाबतीत आपण पहिला अंतरा गृहीत धरलेला असतो. त्या गृहीतकावर आधारीत काही भविष्याची स्वप्न पाहिली असतात. अचानक सगळं चित्र बदलतं, चित्रपटातल्या धर्मेंद्रसारखे आपण भानावर येतो, आपल्या ठरलेल्या भूमिकेबरोबर, आयुष्याबरोबर वाहात जातो. वहिदा तिथेच रहाते.

काही वर्षांनी राजेश खन्ना तिथे येतो, तोही काही काळाने भानावर येतो, निघून जातो, वहिदा तिथेच रहाते.

आपणमात्र वाहत्या आयुष्याबरोबर वाहात राहातो, मजेत जगतो आणि कधीतरी आपल्याला तिची आठवण येते, आपण आतून हलतो, मधल्या काळात काय घडून गेलं आपल्याला काही माहित नसतं, ना ही आपण जाणून घ्यायचा प्रयत्न करतो आणि परत एकदा तिला गृहीत धरायची चूक करतो, म्हणतो,

'मेरा खयाल है अभी

झुकी हुई निगाह में
दबी दबी हँसी भी है
दबी हुई सी चाह में
मैं जानता हूँ मेरा नाम
गुनगुना रही है वो
यही खयाल है मूझे
के पास आ रही है वो
वो शाम कुछ अजीब थी ....'

का रे बाबा, तिला तिचं काही आयुष्य नाही कां? तुला हवं असलं की तिला आठवायला आणि तुला नको असलं की तिला विसरायला, ती काय एक खेळणं आहे? मुळात तुझं तरी तिच्यात गुंतणं किती खरं आणि प्रामाणिक होतं? आणि समजा असलं तर ती गुंतली होती का तुझ्यात? का तेसुद्धा तू गृहीत धरूनच चालला होतास? अशा असंख्य प्रश्नांची मालिका पन्नाशीनंतर उभी राहते. ज्यांची उत्तरं, एक तर सापडत नाहीत किंवा आपल्याला हवी तशी मिळत नाहीत. मुळात हे प्रश्न मांडायचं धाडसच आपण करत नाही. त्यामुळं आयुष्याच्या नावेत बसून कुठल्या तरी दुसऱ्याच

वहिदाच्या मांडीवर डोकं ठेवून आपण तिसऱ्याच वहिदाला आठवत, खोटं खोटं म्हणत रहातो,

'मेरा खयाल है अभी
झुकी हुई निगाह में
दबी दबी हँसी भी है
दबी हुई सी चाह में
मै जानता हूँ मेरा नाम
गुनगुना रही है वो
यही खयाल है मुझे
के पास आ रही है वो
वो शाम कुछ अजीब थी
ये शाम भी अजीब है
वो कल भी पास पास
थी
वो आज भी करीब है ..
वो शाम'




फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

## ५०. जाने क्या सोचकर?

काही काही वेळा काही शब्दांचे अर्थ काही केल्या सापडत नाहीत. अंगाला तेल लावलेल्या पैलवानासारखे ते पकडीतून निसटून जातात. किनारामधे जितेंद्रच्या तोंडी किशोरच्या आवाजात एक गाणं आहे, “जाने क्या सोचकर नहीं गुजरा, इक पल रातभर नहीं गुजरा.” या इक पल रातभर नहीं गुजराने डोक्याचा भुगा केला. असा कुठला क्षण होता, ज्याने सगळी रात्र व्यापून टाकली होती?

मला लॉकडाऊनमधल्या कित्येक रात्री आठवल्या. कंटाळून झोपेची आराधना करीत अंथरूणावर अंग टाकून द्यावं तर मनाच्या अंगणात आठवणींची कार्टी धिंगाणा घालायला यायची. हरप्रयत्नाने सारवलेलं अंगण उखडून निघायचं. एखादं कार्ट रिकाम्या उखळातच जुन्या अप्रिय घटनांच कांडण मांडायचं. दणकन एखादा मुसळाचा घाव कडेवर बसायचा. दचकायला व्हायचं. घड्याळाचे काटे पुढे सरकायचेच नाहीत. सारं विश्व एका अनामिक भीतीच्या सावटाखाली गाढ झोपी गेलेलं असायचं.

इकडं पोरांनी फेर धरलेला असायचा. सगळं अंगण उखडून निघालेलं असायचं. एकेक पोरगं सुट्ट करुन घरी पाठवावं, तशा आठवणी सुट्टया करून घालवून द्याव्या लागायच्या. टक्क डोळे उघडे ठेऊन अंधारात बघायची सवय करुन घ्यावी लागायची. इक पल रातभर नहीं गुजराचा अर्थ कळायला लागायचा. हळू हळू पहाट व्हायची. आठवणींचा गोंधळ संपलेला असायचा. एक रिकामपण जाणवायचं. एकटेपणा जाणवायचा. अन मग हळूच पुढचा अंतरा मनात डोकावायचा.



"अपनी तनहाईका
औरोंसे ना शिकवा करना,
तुम अकेले ही नहीं हो
सभी अकेले है,
ये अकेला सफर नहीं गुजरा
जाने क्या सोचकर नहीं गुजरा
इक पल रातभर नहीं गुजरा ...."

फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

# ५१. जूस्तजू

माणूस गर्दीपासून सुट्टा असला आणि मन थोडसं शांत असलं की जुन्या आठवणींची गर्दी होते. आयुष्याचा चित्रपट फ्लॅशबॅकमधे जातो. आता यातले काही फ्लॅशबॅक वयोमानानुसार सांगता येण्यासारखे नसले तरी काही आठवणींचा फ्लॅशबॅक मनाला उभारी देऊन जातो. परवा दिवशीपासून इथे महाबळेश्वरला आल्यापासून खूप जुन्या आठवणींनी गर्दी केली आहे.

नाईट ऑफ लंडनमधलं एक गाणं रफीने खूप छान गायलं आहे.

'ओ माय लव्ह ...' ऐंशीच्या दशकातले कॉलेजचे दिवस. मध्यमवर्गीय असल्याने फार मोठया महत्वाकांक्षा नव्हत्या, पण खऱ्या अर्थाने जे जे सुंदर, उदात्त, उन्नत त्याच्या त्याच्या प्रेमात पडण्याचे दिवस होते. त्यातही आपल्याला झेपेल त्याच्याच भोवती स्वप्ने विणली जात. प्रत्येक स्वप्नांचा केंद्रबिंदू तोच असे. यावरच्या गाण्यातला एक अंतरा आहे. जो त्या काळात खूप संदर्भित होता. आता त्या

संदर्भाचे, संदर्भासहित स्पष्टीकरण  देणे शक्य नाही आणि योग्य ही नाही. त्याचे शब्द आहेत,

“सामने जो एक तू न हो,
दिलमें कोई आरजू न हो,
मंजिले हजार हो मगर,
मंजिलों की जूस्तजू न हो ...”

एखादं वेगवान कथानक असावं तसा तो जीवनाचा चित्रपट संपून गेला. पुढच्या काळात खरोखर मंजिले हजार झाल्या, त्यांच्यासाठी खूप पळापळही करुन झाली. पण ज्या गोष्टीची आरजू होती, ज्या आरजूची जूस्तजू होती ती गोष्ट हातातून निसटून गेली ती कायमचीच. आता पन्नाशी उलटून गेल्यावर या गोष्टींकडे बघताना आपली त्या काळातली धावपळ किती बालिश होती असं प्रामाणिकपणे वाटतं. आणि ज्या गोष्टींसाठी आपण धावपळ करत होतो त्या गोष्टींच्या परिघात आपल्याला स्थान होतं का नाही हा प्रश्न तर अलाहिदाच रहातो.

पण तो काळ मात्र त्या गोष्टींच्या आरजूत, जूस्तजूत खूप छान गेला एवढं मात्र नक्की. पुन्हा त्यात गंमत आहे. आरजू आणि जूस्तजू या दोन्हींतही सूक्ष्म फरक आहे.

आरजू खूप गोष्टींची असते, पण ज्या आरजूंसाठी प्रामाणिक प्रयत्न केले जातात, मन त्याविषयी प्रामाणिक असतं तीच जूस्तजू होऊ शकते. थोडं सेंटी झाल्यासारखं वाटतयं खरं. पण खरं सांगतो, गेल्या नऊ दहा महिन्यात इतक्या निवांतपणे विचार करायला वेळच मिळाला नव्हता. त्यातून इथलं वातावरण, सगळंच मनाची कवाडं उघडणारं आहे. म्हटलं, तुमच्याशी शेअर करायला काय हरकत आहे. जाता जाता या जूस्तजू शब्दाला खऱ्या अर्थाने अधोरेखित करणारं गाणं सांगतो,

जूस्तजू जिसकी थी,
उसको तो ना पाया हमनें,
इस बहाने से मगर देखली,
दुनिया हमनें .....

थोडा गैरसमज झाला असेल तर दूर करतो, मला खरंतर प्राध्यापक व्हायचं होतं पण झालो वकिल! त्याच्याबद्दल लिहिलयं बरं कां हे, नाहीतर तुम्हाला काहीतरी वेगळचं वाटायचं ........

# ५२.        हे पवित्र आत्म्यांनो!

जगाच्या इतिहासात आजपर्यंत अनेक कारणांनी नरसंहार झाले. कधी साम्राज्य विस्तारासाठी, कधी धर्मप्रसारासाठी, कधी नैसर्गिक आपत्तींमुळे, तर कधी राजकीय आणि सामाजिक विचारधारेचा विरोध म्हणून. मागच्या वर्षी पुन्हा एकदा सगळ्या जगावर आर्थिक सत्ता गाजवायच्या राक्षसी महत्वाकांक्षेतून वरवर नैसर्गिक वाटेल असे जैविक संकट परत निर्माण केले गेले आणि आत्ता या क्षणापर्यंत या संकटात जगभरातील कोट्यावधी लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

खरे तर ज्या राष्ट्राने हे संकट निर्माण केले, ते राष्ट्र विरुद्ध इतर सर्व जग असा एक संघर्ष, मानववंश वाचवण्याच्या हेतूने झालेला आपल्याला दिसायला हवा होता. परंतु आर्थिक अधिसत्ता गाजवायच्या राक्षसी हेतूने हे संकट निर्माण केल्याने, जगाच्या कानाकोपऱ्यात असणाऱ्या सर्व देशातील राक्षस या संकटाचा संधी म्हणून उपयोग करून घेण्यासाठी पुढे सरसावले.

कोणी औषधाच्या क्षेत्रात, कोणी धान्याच्या बाजारात, कोणी सरकारात, कोणी राजकारणात, कोणी समाजकारणात, सगळे जण आपापल्या परीने जिभल्या चाटीत पुढे सरसावले आणि वर्षभराच्या आत त्यांनी या पृथ्वीचा नरक करुन टाकला. एवढे होऊनही अद्याप त्यांची लालसा पूर्ण झालेली नाही. आपापल्या परीने या विश्वाचे लचके तोडण्यासाठी ही गिधाडे अजूनही तत्पर आहेत.

माणूस म्हणून जन्माला आलेल्या या राक्षसांचा नृशंस अवतार अवघ्या मानवतेला काळिमा फासून गेला. कुटुंबेच्या कुटुंबे उध्वस्त झाली. अनेक जण अनाथ झाले, अनेकांचे आधार कोसळले. राजकारण, समाजकारण, चित्रपट, नाटय, संगीत, उद्योगजगत अशा सर्व क्षेत्रातील आणि ज्यांचा या आर्थिक साम्राज्यवादाशी काहीही संबंध नव्हता, असे अनेक सामान्य नागरिक यांचा या राक्षसी महत्वाकांक्षेने बळी घेतला. होय, अक्षरशः बळी घेतला.

कोटयावधींच्या संख्येने बळी पडलेल्या हे पवित्र आत्म्यांनो, मी हात जोडून साश्रू नयनांनी तुम्हाला अभिवादन करतो, प्रणिपात करतो, तुमचे बलिदान कदापिही वाया जाणार नाही आणि त्या सर्वशक्तिमान परमेश्वराकडे

अशी एक याचना करतो की, या असंख्य बळी पडलेल्या आत्म्यांच्या, विसर्जित न होऊ शकलेल्या अस्थींमधून, एक असे वज्र निर्माण व्हावे, ज्या वज्राने हे संकट निर्माण करणाऱ्या आणि या संकटाचा फायदा करून घेणाऱ्या प्रत्येक राक्षसी वृत्तीचा आणि ती धारण करणाऱ्या व्यक्तींचा, असा भयानक अंत व्हावा की इथून पुढील काळात कोणीही निसर्गाच्या विरोधात जाऊन, त्याच्या आणि पर्यायाने ईश्वराच्या अधिकारात ढवळाढवळ करण्याचा मनात विचारसुद्धा आणू नये.

**हे सर्व शक्तिमान परमेश्वरा, हा जर नैसर्गिक न्याय या आत्म्यांना मिळाला नाही तर आधीच तुझ्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या या जगातून मानवता आणि पर्यायाने मानववंश कायमचा नाहीसा होईल आणि जर भक्तच शिल्लक राहिला नाही तर भगवंताच्या अस्तित्वाला तरी काय अर्थ राहिल?**



फोटो - सोशल मिडीयावरुन साभार.

## लेखकाचा परिचय

## ॲड. आनंद रा. देशपांडे.

- **शिक्षण** :- बी. कॉम. एल.एल.बी. एम. ए. (इतिहास)
- **माजी सदस्य** :- गडसंवर्धन समिती महाराष्ट्र शासन
- **माजी सदस्य**:- महाराष्ट्र राज्य नाट्य परिनिरीक्षण मंडळ
- महाराजा शिव-छत्रपती प्रतिष्ठाननिर्मित व श्रीमंत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे दिग्दर्शित "**जाणता राजा**" या महानाट्यात १९८८ पासून सहभाग.
- आत्तापर्यंत २७५ प्रयोगातून मध्यमवयीन शिवाजीमहाराज, सूत्रधार, शाहीर या भूमिका सादर.
- या प्रयोगांच्या निमित्ताने १९९७ साली अमेरिका व २०१५ साली इंग्लंडचा दौरा.
- पुण्यातील आंबेगाव येथे महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने साकारल्या जाणाऱ्या "**शिवसृष्टी**" या भव्य प्रकल्पाचा सल्लागार म्हणून जबाबदारी.
- दुर्गमहर्षी गोपाल नीलकंठ दांडेकर यांच्या साहित्यावर आधारित "**पुनर्भेट -गोनीदांच्या साहित्यकृतींची**" हे पुस्तक प्रकाशित.

- दुर्गभ्रमंतीतील अनुभवांवर आधारित "**कातळ मनीचा ठाव**" हे ललित लेखांचे पुस्तक प्रकाशित.
- गेल्यावर्षी विविध विषयांवरील स्फुट लेखांचा संग्रह असलेला "**काही जनातलं काही मनातलं**" हा लेखसंग्रह पुस्तकरुपाने प्रकाशित.
- गोनीदा दुर्गप्रेमी मंडळाच्यावतीने आयोजित केल्या जाणाऱ्या दुर्ग साहित्य संमेलनांचा संस्थापक सदस्य.
- विनय धुमाळे निर्मित व दिग्दर्शित लोकमान्य टिळकांच्या जीवनावर आधारित "**लोकमान्य**" या हिंदी दूरदर्शन मालिकेत आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांची भूमिका सादर केली
- मृणाल कुलकर्णी दिग्दर्शित "**रमा माधव**" व दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित "**फर्जंद**" आणि "**फत्तेशिकस्त"** या ऐतिहासिक मराठी चित्रपटातून भूमिका.
- इसवी सन १९९० पासून गेली तीस वर्षे, तीन राष्ट्रीयकृत बँका, सात सहकारी बँका, तीन खासगी वित्त कंपन्या आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन या राष्ट्रीय संस्थांचा कायदेशीर सल्लागार (विधी सल्लागार) म्हणून कार्यरत.

**ॲड. आनंद देशपांडे**

यांची ई साहित्यवरील पुस्तके

कव्हरवर क्लिक करा व वाचा







